



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ अमरावती, बुधवार 25 मार्च 2026 ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# कोणतेही युद्ध मानवतेच्या हिताचे नाही

## युद्ध सुरू राहिले, तर गंभीर परिणाम- पंतप्रधान मोदींनी केली चिंता व्यक्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेनंतर आज राज्यसभेत इराण युद्ध आणि पश्चिम आशियातील परिस्थितीवर महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली. भारताने नेहमीच संवादाचा मार्ग सुचवला असून सर्व संबंधित देशांशी भारत संपर्कात असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यसभेत बोलताना पंतप्रधान म्हणाले की, कोणतेही युद्ध मानवतेच्या हिताचे नसते. या संघर्षाचे समाधान संवादातूनच होउ शकते. भारत सातत्याने सर्व देशांना शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी प्रोत्साहित करत आहे. जर हा संघर्ष दीर्घकाळ चालला तर त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील. त्यामुळे भारत परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. पंतप्रधानांनी सांगितले की, भारत कोणत्याही क्षेत्रात इतर देशांवर जास्त अवलंबून राहू नये यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. शिपबिल्डिंगपासून रेअर अर्थ मिनरल्सपर्यंत अनेक क्षेत्रांत आत्मनिर्भरतेसाठी



पावले उचलली आहेत. या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला असून परिस्थितीतून सावरण्यासाठी वेळ लागेल असेही त्यांनी सांगितले.

***संकट ही देशाच्या धैर्याची परीक्षा-*** मोदी म्हणाले की, कोणतेही संकट हे देशाच्या धैर्य आणि प्रयत्नांची परीक्षा घेत असते. मागील ११ वर्षांत भारताने अशा संकटांना सामोरे जाण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. आवश्यक वस्तूंचा पुरवठा भारतात सुरळीत राहावा यासाठी सरकार प्रयत्न करत आहे.

***इन्फ्रास्ट्रक्चरवरील हल्ल्यांचा निषेध-*** पश्चिम आशियातील युद्धाला तीन आठवड्यांपेक्षा अधिक काळ झाला आहे. यामुळे जगात उर्जा संकट निर्माण झाले आणि त्याचा परिणाम भारतावरही होत आहे. भारताने नागरिक, नागरी पायाभूत सुविधा, उर्जा आणि वाहतूक व्यवस्थेवरील हल्ल्यांचा निषेध केला आहे. तसेच तणाव कमी करण्यासाठी आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

## परराष्ट्र धोरणांवरून राहुल गांधींची सरकारवर टीका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पश्चिम आशियातील युद्धाचे ढग गडद होत असतानाच आता भारतीय राजकारणात परराष्ट्र धोरणावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे. अमेरिका आणि इस्त्रायल सांगेल तेच पंतप्रधान मोदी करतील अशा बोच-या शब्दांत लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर हल्लाबोल केला. पंतप्रधान मोदी हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पूर्णपणे नियंत्रणात असल्याचा खळबळजनक आरोपही त्यांनी यावेळी केला. पश्चिम आशियातील संकट, इंधनाचा तुटवडा आणि मानवी हक्कांच्या प्रश्नावर केंद्र सरकारने बुधवारी संध्याकाळी ५ वाजता सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. मात्र, राहुल गांधींनी या बैठकीला उपस्थित राहणार



नसल्याचे सांगितले. माझा केरळमध्ये आधीच कार्यक्रम ठरलेला असल्याने मी या बैठकीला येउ शकणार नाही. सर्वपक्षीय बैठक व्हायला हवी, हे खरं आहे पण या संपूर्ण प्रक्रियेत एक मोठी रचनात्मक चूक झाली आहे. कारण ज्या पद्धतीने सरकार काम करत आहे, त्याचा पायाच चुकीचा आहे आणि ही चूक सुधारली जाउ शकत नाही, विशेषतः पंतप्रधान मोदी तर ती अजिबात सुधारू शकत नाहीत असे राहुल गांधी म्हणाले.

***भारत नव्हे, अमेरिका-इस्त्रायलचे हित***

पंतप्रधान मोदी तेच करतील जे अमेरिका, इस्त्रायला सांगेल. ते भारतीय शेतकरी आणि देशाच्या हितासाठी काम करणार नाहीत. अमेरिका आणि इस्त्रायल जे आदेश देतील, त्याचेच पालन मोदी सरकारकडून केले जात आहे.

## सीएपीएफ विधेयकावरून राज्यसभेत गदारोळ

नवी दिल्ली : राज्यसभेत केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ) संबंधित महत्त्वाचे विधेयक विरोधकांच्या तीव्र विरोधामुळे सादर होउ शकले नाही. विधेयकाची प्रत वेळेत न मिळणे आणि कढर अधिका-यांच्या नियुक्तीबाबतच्या तरतुदींवर विरोधकांनी आक्षेप घेतल्याने सरकारला हे विधेयक तुर्तास पुढे ढकलावे लागले.काल राज्यसभेत केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सामान्य प्रशासन) विधेयक सादर होणार होते. मात्र विरोधी पक्षांनी या विधेयकाला जोरदार विरोध केला. विशेषतः तृणमूल काँग्रेसने सांगितले की, संसद नियमांनुसार विधेयकाची प्रत किमान ४८ तास आधी खासदारांना देणे आवश्यक



असते, परंतु तसे झाले नाही. टीएमसीचे खासदार डेरेक ओब्रायन यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. त्यानंतर तृणमूल काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी सभागृहातून व?कआउट केले. काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांनीही सरकारवर घाईघाईने कायदा करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. कोणताही कायदा करण्यापूर्वी त्यावर सविस्तर चर्चा आणि विचार होणे आवश्यक असल्याचे विरोधकांनी म्हटले. विरोध वाढल्यामुळे सरकारने सध्या हे विधेयक सादर न करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत बैठक घेउन सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सरकार आता विरोधकांचा विरोध कमी करून सर्वानुमते विधेयक सादर करण्याचा प्रयत्न करत आहे. सरकार आणि विरोधकांमध्ये सहमती झाल्यानंतरच हे विधेयक पुन्हा राज्यसभेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.

***काय आहे विधेयक?-*** या विधेयकात पाच केंद्रीय सुरक्षा दलांना एकाच प्रशासकीय चौकटीत आणण्याचा प्रस्ताव आहे. यात केंद्रीय राखीव पोलिस दल, सीमा सुरक्षा दल, इंडो-तिबेटन बार्डर पोलिस, सशस्त्र सीमा बल आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल या दलांचा समावेश आहे. या सर्व दलांमध्ये भरती, पदोन्नती आणि पोस्टिंगची प्रक्रिया समान करण्याचा सरकारचा उद्देश आहे.

***आयपीएस अधिका-यांच्या नियुक्तीवरून वाद-*** हे विधेयक सर्वोच्च न्यायालयाच्या मागील वर्षी ऑक्टोबरमधील एका निर्णयानंतर आले आहे. त्या निर्णयात सीएपीएफमध्ये आयपीएस अधिका-यांच्या डेप्युटेशन कमी करण्याचे आणि सहा महिन्यांत कॅडर रिव्ू करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र नव्या विधेयकात वरिष्ठ पदांवर आयपीएस अधिका-यांची नियुक्ती वाढवण्याची तरतूद असल्यामुळे वाद निर्माण झाला आहे.

## देशाला रडवून गेला हरीश राणा

■ 13 वर्षांपासून होता कोमात,
■ 'एम्स'मध्ये घेतला अखेरचा श्वास

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशातमध्ये पहिल्यांदाच इच्छामरणाची परवानगी मिळालेल्या हरीश राणा याने मंगळवारी अखेरचा श्वास घेतला. मागील १३ वर्षांपासून तो कोमामध्ये होता. या काळात त्याला लाईफ सपोर्ट सिस्टीमचा आधार होता. मात्र, आई-वडिलांनी सुप्रीम कोर्टात त्याच्या इच्छामरणासाठी याचिका दाखल केली होती. कोर्टाने ही विनंती मान्य करत इच्छामरणास परवानगी दिली होती. सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर हरीशला १४ मार्च रोजी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत दाखल करण्यात आले होते. मागील दहा दिवसांपासून त्याचे खाणे-पिणे तसेच वैद्यकीय उपचार पूर्णपणे बंद करण्यात आले होते. ३१ वर्षीय हरीश राणाच्या इच्छामरणास कोर्टाने ११ मार्चच्या ऐतिहासिक निकालाने परवानगी दिली होती. हरीश हा मुळचा उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील आहे. १३ वर्षांपूर्वी अभियांत्रिकी शिक्षणासाठी चंदीगढ येथे ह?स्टेलमध्ये राहत होता. तो या हास्टेलच्या चौथ्या मजल्यावरील बाल्कनीतून खाली पडला होता. त्याच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली होती. तेव्हापासून तो कोमामध्ये आहे.

हरीशच्या आई-वडिलांनी मुलाच्या इच्छामरणाची याचिका सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. एम्सने तो कधीच बरा होण्याची कोणतीही चिन्हे नसल्याचे स्पष्ट केले होते.



कोर्टानेच याबाबत एम्सकडे अहवाल मागविला होता. या अहवालाच्या आधारे कोर्टाने ऐतिहासिक निकाल देत हरीश राणाचा लाईफ सपोर्ट हटविण्यास परवानगी दिली होती. कोर्टाच्या निकालानंतर हरीशचा एक व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला होता. गाझियाबाद येथील घरातील हे भावूक करणारे दृश्य होते. ब्रम्हाकुमार संस्थेतील एक महिला सदस्य हरीश कपळावर टिळा लावताना दिसत होत्या. अत्यंत शांतपणे हरीश म्हणत होत्या की, सर्वांना क्षमा करून णि सर्वांची माफी मागून आता शांतपणे विश्राम करा. या व्हिडीओमुळे अनेकांचे डोळे पाणावले होते.

## महिन्याला आता केवळ दोनदा गॅस बुकिंग

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर देशातील एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकारने काही महत्त्वाचे नियम लागू केले आहेत. या नव्या नियमांचा थेट परिणाम घरगुती गॅस वापरणा-या ग्राहकांवर होणार असून प्रत्येक ग्राहकाला या बदलांची माहिती असणे आवश्यक आहे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड(बीपीसीएल) ने जाहीर केलेल्या नव्या नियमानुसार, आता एका ग्राहकाला महिन्यात जास्तीत जास्त दोनच एलपीजी सिलिंडर बुक करता येणार आहेत. यापेक्षा जास्त सिलिंडर बुक करण्याचा प्रयत्न केल्यास सिस्टमकडून बुकिंग ब्लाक केली जाउ शकते किंवा अतिरिक्त तपासणी केली जाउ शकते. सरकारकडून आर्थिक वर्षात (१ एप्रिल ते ३१ मार्च) १२ अनुदानित सिलिंडर दिलो जातात. याशिवाय गरज असल्यास ग्राहक आणखी ३ नान-सबिसडी सिलिंडर खरेदी करू शकतो.



म्हणजेच एका कनेक्शनवर वर्षाला जास्तीत जास्त १५ सिलेंडर बुक करता येणार आहेत. यासोबतच बुकिंगच्या कालावधीतही बदल करण्यात आला आहे. आधी दुसरा सिलिंडर २१ दिवसांनी बुक करता येत होता, मात्र आता ही मर्यादा वाढवून २५ दिवस करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांना पुढील सिलेंडर बुक करण्यासाठी थोडा अधिक वेळ वाट पाहावी लागणार आहे. जर एखाद्या ग्राहकाने आपला वार्षिक कोटा पूर्ण केला असेल आणि तरीही अतिरिक्त सिलेंडरची गरज भासत असेल, तर त्यासाठी नवीन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ग्राहकाला हॅलो बीपीसीएल अपच्या माध्यमातून काही माहिती द्यावी लागेल. उदाहरणार्थ, घरात लग्न किंवा मोठा कार्यक्रम आहे का, पाहुण्यांची संख्या किती आहे इत्यादी. या माहितीनुसार ग्राहकाला अतिरिक्त सिलिंडर देण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

***नोंदणीकृत मोबाईल नंबर अनिवार्य-*** याशिवाय डिलिव्हरी प्रक्रियेतही कडक नियम लागू करण्यात आले आहेत. सिलिंडर डिलिव्हरीच्या वेळी ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर ओटीपी (डीएसी) येईल. हा कोड डिलिव्हरी बायला दिल्यानंतरच सिलिंडर मिळेल. तसेच बुकिंगसाठी नोंदणीकृत मोबाईल नंबर असणे अनिवार्य करण्यात आले आहे. सरकारने ई-केवायसी देखील बंधनकारक केली आहे.

***केवायसी, ई-केवायसी अत्यावश्यक-*** ज्या ग्राहकांनी केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांची सबसिडी थांबवली जाउ शकते किंवा बुकिंगमध्ये अडचणी येउ शकतात. एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि गैरवापर टाळण्यासाठी हे नियम लागू करण्यात आले आहेत. ग्राहकांनी या बदलांची योग्य माहिती ठेवून वेळेत प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे, अन्यथा गॅस बुकिंग आणि डिलिव्हरीमध्ये अडथळे येउ शकतात.

# खरातला भेटलेल्या राजकारण्यांची चौकशी होणार

**मुंबई/प्रतिनिधी-** संपूर्ण राज्यात चर्चेत असलेल्या अशोक खरात प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत निवेदन सादर केले. यावर बोलताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी, मुख्यमंत्र्यांनी विस्तृत निवेदन दिलं आहे. संस्थांच्या कार्यकारिणीतील लोकांची चौकशी होईल असं सांगितलं. अधिकारीही आर्थिकदृष्ट्या मदत करणा-यांचीही चौकशी होणार आहे. पण अधिका-यांना माहीत असूनही त्यांनी काहील केलं नाही. राजकारणातील काही लोकांचे नावं आणि फोटोसमोर आले आहे. हे पुरोगामी राज्य आहे. अशावेळी जे कोणीही यात आहे त्यांची चौकशी करणार का? असा प्रश्न विचारला. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले. ते नेमकं काय म्हणाले ते जाणून घेउयात. भास्कर जाधव यांच्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ज्या ज्या व्यक्तीविरोधात पुरावे मिळेल त्या सर्वांची चौकशी करू. आपण सर्व राजकारणात आहोत. कुणाचा फोटो कुणासोबत येतो हे पाहिलं आहे. फक्त कुणाचा फोटो कुणासोबत आहे यावरून कुणालाही आरोपी करता येत नाही. पण खरातच्या मोबाईलमधील डीलिटेड डेटाही काढत आहोत. त्यात कुणाचा संपर्क होता का? कुणी त्याच्याशी आर्थिक व्यवहार केला का? मेसेज केले का याची चौकशी केली जाईल. जाणीवपूर्वक आपण एसआयटीचा प्रमुख महिला अधिका-याला केलं आहे. महिला अधिका-याचा रेकार्ड चांगला आहे. कुणालाही पाठीमागे घालणार नाही. डायरेक्ट असो वा इनडायरेक्ट पाठबळ देणा-यांवर कारवाई करू. विजय वडेट्टीवार यांनी म्हटले की, काही अधिका-यांची नावे पुढे आली. ही सर्व चौकशी होत आहे.न्यायाधीशाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी. दोन तीन विषय आम्हाला माहीत आहे.



## अशोक खरातने ५ नरबळी दिले?



नाशिक प्रकरणातील भोंदू बाबा अशोक खरात याच्या पोलीस कोठडीमध्ये वाढ करण्यात आली आहे, त्याला पुन्हा पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, त्यामुळे आता अशोक खरात याच्या अडचणी वाढल्या आहेत. दरम्यान सुनावणीवेळी सरकारी वकिलांनी खळबळजनक दावा केला आहे. अशोक खरातने ५ नरबळी दिल्याचा संशय असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. सरकारी वकिलांच्या दाव्यानं खळबळ उडाली आहे. एका पीडित महिलेनं भोंदू जोतिषी अशोक खरात विरोधात अत्याचाराची तक्रार दाखल केली आणि हे संपूर्ण धक्कादायक प्रकारण समोर आलं आहे. अशोक खरातचं बिंग फुटलं. पोलिसांनी त्याच्याकडून जप्त केलेल्या पेन ड्राईव्हमध्ये तब्बल १०० व्हिडीओ सापडले असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान आज अशोक खरात याची पोलीस कोठडी संपल्यानं त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. यावेळी सरकारी वकिलांकडून धक्कादायक दावा करण्यात आला आहे. अशोक खरातच्या घराची झडती घेण्यात आली, त्याने बंदुकीच्या माध्यमातून ५ नरबळी दिल्याचा संशय आहे. त्याचे पुरावे मिळाले आहेत. त्याच्या मालमत्तासंबंधित कागदपत्रे मिळाले आहेत, अनेकांना त्याने फसविले आहे, त्याच्याविरोधात अनेक तक्रारी पुढे येत आहेत.

## उद्धव ठाकरेसाहेबांना निरोगी आयुष्य लाभो.!

### निरोपाच्या भाषणात शिंदेंकडून कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी-** शिवसेनेच्या विभाजनानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाकरेसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकमेकांवर कडकडून टीका केली. उद्धव ठाकरे यांचे विधान परिषदेचे आमदार म्हणून हे शेवटचे अधिवेशन आहे. त्या निमित्ताने आयोजित निरोपाच्या भाषणात एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरे यांचा पहिल्यांदाच साहेब असा उल्लेख केला आणि त्यांना शुभेच्छाही दिल्या आहेत. विधान परिषदेतील नउ सदस्य निवृत्त होत आहेत. त्यांच्या निरोपाच्या भाषणात एकनाथ शिंदे यांनी सर्वांच्या कार्याचे कौतुक केले. उद्धव ठाकरे यांच्याबद्दल बोलताना शिंदे म्हणाले, उद्धव ठाकरेसाहेब निरोप घेत आहेत. त्यांना निरोगी आयुष्य लाभो. त्यांच्या राजकीय आयुष्याला खूप शुभेच्छा. तसेच, एकनाथ शिंदे यांनी नीलम गो-हे यांच्या कार्याचेही कौतुक केले. उपसभापती पदावर काम करताना न्यायाची भूमिका घेतली. निलम गो-हे या २४ वर्षे सभागृहात आहेत. त्यांचा तोल कधी जात नाही, संयम कधी ढळत नाही. त्यांची विचारधारा पक्की आहे. अमोल मिटकरींविषयी बोलताना शिंदे म्हणाले, अमोल मिटकरी बस नाम ही काफी है, त्यांचे नाव अमोल आणि वाणी अमोघ आहे. ते विदर्भातील फायरब्रँड नेते आहेत. अजितदादांच्या निधनानंतर मिटकरींचे हळवे रुप आपण पाहिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत भरभरून बोलणारा वक्ता म्हणजे अमोल मिटकरी आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.



# धर्म बदलल्यास 'एससी' दर्जा संपुष्टात येणार

## सर्वोच्च न्यायालयाचा आरक्षणाबाबत ऐतिहासिक निकाल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशाच्या आरक्षण धोरणावर आणि सामाजिक संरचनेवर मोठा परिणाम करणारा एक ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवार दि. २४ मार्च रोजी दिला असून हिंदू , शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्तइतर कोणताही धर्म स्वीकारणा-या व्यक्तीला अनुसूचित जातीचा दर्जा मिळणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. महत्त्वाचे म्हणजे, धर्मांतर केलेल्या व्यक्तीला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती(अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत मिळणारे संरक्षणही न्यायालयाने नाकारले आहे.

न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. न्यायालयाने म्हटले की संविधानाच्या कलम ३ नुसार, जो व्यक्ती हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य धर्माचे पालन करतो, त्याला अनुसूचित जातीचा सदस्य मानले जाउ शकत नाही. धर्मांतराच्या क्षणापासूनच संबंधित व्यक्तीचा मूळ जातीचा दर्जा पूर्णपणे आणि तात्काळ संपुष्टात येतो.

सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाचा हा निर्णय कायम ठेवला. केवळ जातीचा दाखला जवळ असल्याने कोणताही फायदा मिळणार नाही, कारण धर्मांतरित व्यक्ती या कायद्यांतर्गत संरक्षणाचा दावा करू शकत नाही, असे कोर्टाने स्पष्ट केले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने



आपल्या निकालात काही अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवरही भाष्य केले. एखादी व्यक्ती एकाच वेळी ख्रिश्चन धर्माचे पालन करणे आणि अनुसूचित जातीचे असणे, असा दुहेरी दावा करू शकत नाही. तसेच धर्मांतर केल्यावर राज्य किंवा केंद्राकडून मिळणारे आरक्षणाचे लाभ, घटनात्मक संरक्षण आणि इतर सवलती तात्काळ थांबवायला हव्यात. जर एखाद्या व्यक्तीला पुन्हा हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मात येउन अनुसूचित जातीचा दर्जा हवा असेल, तर त्यासाठीच्या तीन कडक अटी पूर्णपणे सिद्ध कराव्या लागतील.

**निकालाचे सामाजिक पडसाद-** या निकालामुळे ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्म स्वीकारलेल्या दलित समुदायातील व्यक्तींना आता आरक्षणाचे लाभ घेता येणार नाहीत. तसेच, जातीवाचक अत्याचाराच्या तक्रारी करताना त्यांना एससी एसटी कायद्याचा आधार घेता येणार नाही. ख्रिश्चन धर्मात गेल्यानंतर जाती नष्ट होते, या तांत्रिक बाबीवर न्यायालयाने हा निकाल दिला असल्याने धर्मांतर विरोधी चर्चांना आता पुन्हा उधाण आले आहे.

**काय होते प्रकरण?-** हा खटला आंध्र प्रदेशातील पादरी चिंथदा आनंद यांच्या अपीलावर आधारित होता. आनंद यांनी अक्काला रामिरेड्डी आणि इतरांविरुद्ध जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी एससी एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने ही एफआयआर रद्द केली होती. आनंद हे गेल्या १० वर्षांपासून ख्रिश्चन धर्माचे पालन करत आहेत आणि चर्चमध्ये पादरी म्हणून प्रार्थना घेतात. ख्रिश्चन धर्मात जातीभेद अस्तित्वात नाही, त्यामुळे धर्मांतरानंतर त्यांनी आपला अनुसूचित जातीचा दर्जा गमावला आहे असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते.

## राज्यात पुन्हा अवकाळी पावसाचे संकट!

■ 5 जिल्ह्यांमध्ये मोठा धोका
■ हवामान विभागाचा मोठा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी-** गेल्या काही दिवसांपासून सतत हवामानात बदल होताना दिसत आहे. त्यामध्येच आज पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाने अत्यंत मोठा इशारा दिला. आजही काही जिल्ह्यांमध्ये पाउस हजेरी लावण्याची शक्यता आहे. पावसाचा यलो अलर्ट भारतीय



हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.मागील काही दिवसांपासून हवामानात सतत बदल होताना दिसत आहे. कधी उष्णता तर कधी पाउस अशी स्थिती आहे. गेल्या चार ते पाच दिवसांपासून अनेक भागात सतत पाउस कोसळत आहे. अवकाळी पाउस काही जाण्याचे नाव घेत नाही. त्यामध्येच अनेक भागात उष्णता देखील वाढत आहे. यादरम्यानच भारतीय हवामान विभागाने अत्यंत मोठा अंदाज वर्तवला आहे.

आज राज्यातील अनेक भागातील हवामानात चढ-उतार बघायला मिळेल. मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आजही वादळी वा-यासह पावसाचा इशारा देण्यात आला. कोकणात आज दमट आणि उष्ण वातावरण राहण्याचा अंदाज आहे. उष्णतेच्या लाटेचा मोठा इशारा देत यलो अलर्ट कोकणात देण्यात आला. वाशिम येथे राज्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली.

आज धाराशिव, लातूर, सोलापूर, नांदेड आणि लातूर या भागात विजांच्या कडकडाट, वादळी वा-यासह जोरदार पाउस होईल. या जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यातील अनेक भागात गेल्या आठवड्यापासून अवकाळी पाउस सतत हजेरी लावत आहे. या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# राज बुक डेपो संचालकावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या कारवाई करा

## ऑल ट्रेडर्स असोसिएशनची मागणी



**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील गुजरी बाजार येथील राज बुक डेपो चे संचालकावर आज २४ मार्च रोजी एका व्यक्तीने रॉड ने प्राणघातक हल्ला केल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.यामुळे या घटनेचा तीव्र निषेध करीत ऑल ट्रेडर्स असोसिएशन अचलपूर चे पदाधिकारी यांनी परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांना निवेदन देऊन त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे .

या घटनेमुळे व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे .या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की ,२५ मार्च रोजी गुजरी बाजार येथील राज बुक डेपो चे संचालक अरुण कुमार खंडेलवाल वय ६८ यांच्या एका व्यक्तीने लोखंडी रॉड ने प्राणघातक हल्ला करून दुकानातील वस्तू , काच चे मोठे नुकसान केले .यामुळे या हल्ल्यात अरुण खंडेलवाल व राज खंडेलवाल दोन्ही जखमी असून खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहे.या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पूर्वी सुद्धा अशा घटना घडल्याने कायदा ,सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा उल्लेख ही निवेदनात केला आहे.यामुळे तत्काळ त्या आरोपीला अटक करून गुन्हा दाखल करण्याची मागणी व्यापारी वर्गाकडून करण्यात आली आहे.आणि भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याचे मागणी सुद्धा करण्यात आली आहे .यावेळी अजय अग्रवाल,मनीष खंडेलवाल , आकाश श्रीवास्तव , पप्पू सिरोया,राम खंडेलवाल ,गणेश वर्मा ,पंकज गुप्ता, मयंक शर्मा,गिरीश दौलतानी, बजरंग खंडेलवाल ,कपिल साबू आदी उपस्थितीत होते.वृत्त लिहेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

# शहरातील बंद घरे चोरांचे टार्गेट

## कॉलनी परिसरात चोरीच्या घटनात वाढ

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- शहरात अनेक महिन्यापासून चोरीच्या घटनेमध्ये वाढ होत आहे. विशेष करून शहरातील कॉलनी परिसरात रात्रीच्या वेळेस चोरीच्या अनेक घटना झाल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे कॉलनी परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून अनेक प्रकरणात चोरांनी बंद घरातील किमती सामान चोरून नेल्याचे दिसून येत आहे. शहरात उन्हाळ्याच्या दिवसात लग्न समारंभ, धार्मिक कार्यक्रम, पर्यटन, बाहेरगावी जाणाऱ्यांची संख्या अधिक असते. त्यामुळे चोरीच्या घटनात सुद्धा वाढ झाल्याचे दिसून येते. कार्यप्रसंगात सहपरिवार बाहेरगावी गेल्यानंतर बंद असलेले घर चोरांच्या टारगेटवर राहते. त्यामुळे चोरांच्या धास्तीने अनेक कुटुंबातील लोक नातेवाईकाच्या कार्यक्रमात लग्न प्रसंगात सुद्धा जाण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्याकरिता या परिसरात रात्रीच्या वेळेस पोलीस ग्रस्त वाढविण्यात यावी अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे.



# पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास जाण्याकरिता मंत्रालयात बैठक

## -प्रलंबित निधी उपलब्ध करून देण्याबाबत आमदार राजेश वानखडे आग्रही



**अमरावती/प्रतिनिधीः-** जलजीवन मिशन अंतर्गत तिवसा विधानसभा मतदार संघातील भातकुली, अमरावती तालुक्यामध्ये प्रगतीपथावर असलेल्या १०५ गाव प्रादेशिक वाढीव पाणीपुरवठा योजनाच्या प्रलंबित देयक व योजना पूर्णत्वास जाण्याचे अनुषंगाने आमदार राजेश वानखडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानसभेमध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले होते. विधानमंडळामध्ये चर्चा घडवून आणली होती. तिवसा विधानसभेतील एकूण ५२ गावे ही खारपण पट्ट्यात येत असल्याकारणाने क्षारयुक्त पाण्याने ती बाधित असल्याचे नमूद करीत तातडीने या योजनेकरीता प्रलंबित निधी उपलब्धबकरून देण्याबाबत पाणीपुरवठा मंत्र्यांना विनंती केली व योजना कधीपर्यंत पूर्णत्वास जाणार आहे या बाबत विचारणा केलेली होती. त्याच अनुषंगाने आज पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे उपस्थितीत जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीबाबत मंत्रालयामध्ये बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीला पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार राजेश वानखडे, आमदार केवलराम काळे, राज्य जलजीवन मिशन अभियान संचालक तथा सदस्य सचिव माजीप्रा रंगा नायक , मुख्य मुख्य अभियंता एस एस गव्हाणकर यांचे सह पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या चर्चेदरम्यान योजनेची सद्यस्थिती, रखडलेली कामे तसेच कंत्राटदारांची प्रलंबित देयके परिणामी योजनेची संथ झालेली गती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांना भेडसावत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी आमदार राजेश वानखडे यांनी पाणीपुरवठा मंत्र्यांना केली.

या बैठकीच्या निमित्ताने गुलाबराव पाटील पाणीपुरवठा मंत्र्यांनी १०५ गाव प्रादेशिक वाढीव पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित देयके लवकरच अदा करून कामांना गती देण्यात येईल असे सांगितले. तसेच ही योजना डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासनही सभागृहात दिलेले होते. परंतु केंद्र शासनाचा निधी अप्राप्त असल्यामुळे योजनेच्या गतीवर परिणाम झाल्याचे मान्य करीत असे असताना सुद्धा राज्याने स्वनिधीतून याकरता निधी उपलब्ध करून देण्यात आलेला असल्याची बाब नमूद केले. ही योजना पूर्ण झाल्यानंतर तिवसा विधानसभा मतदारसंघातील भातकुली व अमरावती तालुक्यातील खारपानपट्ट्यातील गावांमधील हजारो नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होणार असून पाणीटंचाईच्या समस्येवर मोठा दिलासा मिळणार आहे.

यापुढे मंत्री महोदयांनी सांगितले की जल जीवन मिशन अंतर्गत केंद्र शासनाचा वतीने मिळणारा निधी न मिळाल्यामुळे योजनेला विलंब झालेला आहे. परंतु केंद्रीय निधीची वाट न बघता महाराष्ट्र शासनाने व स्वनिधीतून या योजनेकरिता गेल्या वर्षात १३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून आता केवळ ११ कोटी रुपयांचे देयके प्रलंबित आहेत. ही देयके सुद्धा लवकरात लवकर अदा करण्याची कारवाई शासन स्तरावर सुरू आहे. निधी उपलब्ध करून घेण्यात अडचणी निर्माण झाल्यास मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर बैठकीचे आयोजन करून त्यांना या योजने करता अधिक निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे सुद्धा नमूद केले. यावर जल जीवन मिशन संदर्भात सभागृहामध्ये अन्य सदस्यांनी सुद्धा भूमिका घेतल्याने सभागृहाच्या एकूणच भावनेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्तरावर बैठक आयोजित करून जलजीवन मिशनच्या व १०५ गावे पाणीपुरवठा योजनेबद्दल या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावर याबाबत बैठक आयोजित करून निश्चित तोडगा काढण्यात येणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत नियमित निधी उपलब्ध झाल्यास योजनेचे काम पूर्ण जाऊन नागरिकांना मुबलक पाण्याची व्यवस्था करण्याबाबत मंत्री महोदयांनी आश्वासित केलेले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### मेळघाटच्या नागरिकांचे जीवनमान

यावी. तसेच इंटरनेट सेवा नसलेल्या गावासाठी हजेरी नोंदणीसाठी पर्यायी उपाययोजना करण्यात यावी. मनरेगा अंतर्गत मिळणारे वेतन विनाविलंब मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

मेळघाटात प्रामुख्याने वन क्षेत्र असल्याने याठिकाणी होणारे रस्ते सुधारण्यासाठी वन विभागाची परवानगी गरजेचे आहे. त्यामुळे वन विभागाने यासाठी पुढाकार घेऊन रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. मेळघाटात सिंचनाची सुविधा निर्माण झाल्यास येथील स्थलांतरण होणार नाही. तसेच शेतीमधील पिकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. मेळघाटातील २२ गावाच्या पारंपारीक विजेच्या प्रश्नाबाबत राज्याकडून केंद्रीय वन्यजीव मंडळाला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. केंद्रीय मंडळाची परवानगी प्राप्त झाल्यानंतरच या ठिकाणी विजेची कामे होण्यास मदत मिळणार आहे.

आरोग्य सुविधा पुरविण्यासोबतच याठिकाणी सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय होण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. तसेच उपकेंद्र स्तरावर रूग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच एकशिक्षक असणाऱ्या शाळांमध्ये वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच पेसा क्षेत्रातील शिक्षकांची रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतील. सार्वजनिक दळणवळणाची सुविधा परिणामकारक होण्यासाठी सेमाडोह येथून बसची सुविधा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिल्या.

### जुन्या वादातून संतोषी नगरात

हल्ला झाला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला आहे तर त्याचा एक मित्र किरकोळ जखमी आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### श्रीराम नवमी निमित्य निघणार

प्रथम बक्षीस १५ हजार, द्वितीय ११ हजार,तृतीय ९ हजार,चतुर्थ ७ हजार, पाचवा पुरस्कार ५ हजार आणि ५ प्रोत्साहन पुरस्कार दिले जाणार आहे. शोभायात्रा समिती अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध उद्योजक रोहित देशमुख, कार्याध्यक्ष चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया, स्वागत अध्यक्ष संजय बत्रा ,पुरुषोत्तम बजाज, राजेश शादी, डॉ. प्रकाश विश्वकर्मा, रविराज देशमुख, प्रवीण सावले ,नगरसेविका लविना हर्षे,एड. प्रशांत देशपांडे, खामगाव बँकेचे संचालक विशाल कुलकर्णी, सुधीर बोपुलवार ,अमर लुल्ला, आकाश पाली ,गुरुदयासिंह बावरी, दुर्गेश ठाकूर ,अश्विन चौधरी ,शुद्धमती आसरे ,वैष्णवी सोनवणे ,अमृता दहातोंडे ,भैय्या आवारे, लक्ष्मीकांत खंडेलवाल, पवन श्रीवास्तव ,संदीप बाजड, नानकराम नेभनानी, डॉ. रवी भूषण, विनोद कोष्टी, डॉ. अरुण मुंडे, कार्यकारणी सदस्यांमध्ये रवी सेठ पंजापी, रामचंद्र गुप्ता, जयेश राजा, एड. सचिन देवरकर,निर्मल बजाज, निरंजन दुबे ,चेतन शिरभाते, दिलीप पोपट, सचिन डहाके, हेमंत मालवीय, निलेश टवलारे ,सागर व्यास, कैलास गिरोळकर ,पप्पू जोशी, अशोक बसेरिया, विनय शिंगरे, निशाद जोध, अनिल शर्मा यांचा सहभाग आहे. शोभायात्रेमध्ये मातृशक्ति, दुर्गा वाहिनी, प्रखंड कार्यकारिणी स्वयंसेवक आपली सेवा देणार आहे. शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी अनिल साहू, विशाल राऊत, आदित्य रोडे,सुरेश चिकटे, बंटी पारवानी, राजीव देशमुख, अर्चना देवडिया, लिना शर्मा, सिध्दु सोलंके, शंतनु भंडारकर, विजय शर्मा, विशाल राऊत, विजय खडसे, शरद अग्रवाल, दीपक पाठक, ज्ञानेश्वर पातसे, आदित्य रोडे, कैलाश कंकरानिया प्रवीण गोनयका, जयप्रकाश अग्रवाल, श्रीरंग वडनेरकर, योगिता कळंबे, वैशाली शेलारे, निखिल विश्वकर्मा, दुर्गेश ठाकुर, सतिश कुरील, यश गुप्ता, मयुर जयस्वाल, अनिल शर्मा, विजय शर्मा, दीपक पारवानी आदी प्रयत्न करत आहे. पत्रकार परिषदेमध्ये चंद्रकुमार जाजोदिया, रोहित देशमुख ,अनिल साहू, पुरुषोत्तम बजाज ,राजेश शादी, प्रवीण सावले, विशाल कुलकर्णी आदि उपस्थित होते.

### सुपर हॉस्पिटलमधील एमआरआय

आहे. निवेदनात म्हटले आहे की,एमआरआय मशीन बंद असल्याने रुग्णांना खाजगी सेंटरमध्ये जावे लागत आहे जिथे त्यांना आठ ते दहा हजार रुपये खर्च करून एम आर आय करावे लागत आहे. तातडीच्या उपचाराची गरज असलेल्या रुग्णांना निदानासाठी बाहेर जावे लागत आहे. यामुळे त्यांची आर्थिक लूट होत आहे. २० कोटी रुपयांतून ही मशीन सुपर मध्ये लावण्यात आलेली आहे. अजून पर्यंत मशीन सुरू नाही झाली, यामुळे रुग्णांना अनेक अडचणी येत आहे. याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर मशीन सुरू करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रहार चे छोटू महाराज वसू ,बंटी रामटेके गोलू पाटील, प्रशांत देशमुख, अकबर भाई, मनोज शिरभाते, शेषराव धुळे, अजय तायडे ,नंदू वानखडे, सचिन तायडे, कुणाल खंडारे आदि उपस्थित होते.

### नगरसेवक सय्यद राशिद अली

त्यांना वारंवार जीवाने ठार मारण्याची धमकी देत आहे. २० मार्च रोजी दुपारी २ वाजता त्यांना मोबाईल क्रमांक ९४२०९२०८८८ वरून फोन आला होता. त्यांनी फोन रिसीव करतात समोरच्याने आरिफ पानवाला बोलत आहे असे म्हटले. त्याच्यासोबत बोलत असताना आरोपी सोनू याने फोन घेतला आणि त्यांना मारण्याची धमकी दिली. याची तक्रार त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानंतर २२ मार्च रोजी सायंकाळी ७.४० नगरसेवक सय्यद राशिद अली पठाण चौकातून शहराध्यक्ष हाजी इरफान खान पठाण यांच्या निवासस्थानी ईद-ए-मिलन कार्यक्रमासाठी जात होते. त्यावेळी समाजकंटकाने ताज नगर येथील मज्जिद समोर त्यांना अडवून एकटा भेटल्यावर मारण्याची धमकी दिली. यावेळी त्यांच्यासोबत एमआयएम कार्यकर्ता तौसिफ होता. त्यांनी हाजी इरफान यांच्या घरी पोचल्यावर नागपुरी गेट पोलिसांना घटनेची माहिती दिली. एका लोकप्रतिनिधीला धमकवणे हे गंभीर असून समाजकंटकाविरुद्ध लोकप्रतिनिधी ॲक्ट ५०६(२) अन्वये गुन्हे नोंदवून त्यांच्या विरुद्ध तातडीने कार्यवाही करण्यात यावी. भविष्यात कुठलीही दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे नगरसेवक राशीद अली यांना सुरक्षा देण्यात यावी व आरोपी विरुद्ध कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी एमआयएम नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

### परतवाडा शहरातील गुजरी

शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तीन दिवसांपूर्वी वाहन लावण्याच्या कारणावरून हल्लेखोर व खंडेलवाल यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी खंडेलवाल यांनी ११२ वर फोन करून पोलिसांना बोलावले होते. त्यानंतर संबंधित व्यक्ती तेथून निघून गेला होता. मात्र आज अचानक येऊन त्याने लोखंडी रॉडने हल्ला केल्याचे सांगण्यात आले. या घटनेनंतर शहरातील व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त करत आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ऑल ट्रेडर्स असोसिएशनच्या वतीने पोलिसांना निवेदन देण्यात आले आहे. परतवाड़ा पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

### अवैधरित्या गॅस रिफिलिंग

पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहिती मिळाली की, लालखडी वॉटर सप्लायच्या मागे भिवंडी येथे एक इसम अवैधरीत्या घरगुती वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडर मधून प्रवासी ऑटो रिक्षा मध्ये गॅस रिफ्लिंग करत आहे. यावरून गुन्हे शाखेच्या पथकाने येथे धाड मारली. त्यावेळी आरोपी मोहम्मद सलमान शेख हमीद त्याच्या प्रवासी ऑटो मध्ये आरोपी शेख फरीद शेख नजीर राहत्या घराच्या शेडमध्ये अवैधरित्या घरगुती वापरण्यात येणाऱ्या एलपीजी गॅसची रिफिलिंग करताना मिळून आले. पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून १ रिकामा भारत कंपनीचा सिलेंडर किंमत १२०० रुपये, एक गॅस रिफिलिंग करिता वापरण्यात येणारा इलेक्ट्रिक मोटर २५०० रुपये, वजन काटा १८००रुपये व ऑटो एमएच २७ डीझेड ०८५४ किंमत २ लाख असा एकूण २ लाख ५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, श्याम घुगे ,सहायक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक निरीक्षक मनीष वाकोडे, हवालदार सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, नाझीमुद्दीन सय्यद, रणजीत गावंडे यांनी ही कारवाई केली.

### ग्रामीण भागात अवैध रेती

**दर्यापुर येथे ट्रॅक्टरसह कारवाई-** दर्यापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रसाद हॉटेल ते पेट्रोल पंप मार्गावर विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरद्वारे रेती वाहतूक करताना १ ब्रास रेती (५,५०० रुपये) जप्त करण्यात आली. चालक अविनाश दुधंडे व क्लीनर संजय हाडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून सुमारे ३.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**मंगरुळ दस्तगिर येथे ट्रक पकडला-** बोरगाव धांडे मार्गावर टाटा ट्रक (एमएच २७ डीएस ५२७९) मधून ९ ब्रास रेती (५४ हजार रुपये) जप्त करण्यात आली. चालक किसन पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून वाहन मालक अभिजीत केसरवाणी व शिवा खवळ हे फरार आहेत. एकूण ३०.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**बेनोडा येथेही कारवाई-** माणीकपुर चौफुली मार्गावर टाटा ट्रकमधून ७ ब्रास रेती (७० हजार रुपये) जप्त करण्यात आली. चालक गोपाल उईके व क्लीनर निखील धुर्वे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून वाहन मालक स्वराज बांबल फरार आहे. या कारवाईत ३०.७० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### शिवटेकडी विकासासाठी महापालिकेचे

आले. यामध्ये आकर्षक लँडस्केपिंग, हरित क्षेत्राचा विस्तार, पादचारी मार्गांची सुधारणा, विश्रांतीसाठी बाकांची व्यवस्था, प्रकाशयोजना अधिक सक्षम करणे, तसेच स्वच्छतेची नियमित देखभाल यांसारख्या बाबींवर चर्चा झाली. नागरिकांना सुरक्षित आणि सुखद अनुभव मिळावा यासाठी सुरक्षा व्यवस्थेतही सुधारणा करण्यावर भर देण्यात आला. याशिवाय, येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी आणि शिवप्रेमींसाठी अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे, माहिती केंद्र, पार्किंग व्यवस्था, तसेच मार्गदर्शक फलक यांसारख्या मूलभूत सुविधांची उभारणी आणि उन्नती करण्याचे नियोजन करण्यात आले. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम आणि ऐतिहासिक माहिती देणाऱ्या डिजिटल माध्यमांचा वापर करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.

कामांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक आर्थिक तरतूद, कामांचे दर करार आणि टप्प्याटप्प्याने काम पूर्ण करण्याचे नियोजन यावरही सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी प्रशासनाने काटेकोर धोरण आखण्याचा निर्णय घेतला.

सभेत उपस्थित सर्व मान्यवरांनी शिवटेकडीचा विकास हा केवळ भौतिक सुविधांपुरता मर्यादित न ठेवता, तो सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या आदर्श प्रकल्प म्हणून विकसित करण्याचा निर्धार व्यक्त केला. येत्या काळात शिवटेकडी हे अमरावती शहराचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरेल आणि शहराच्या पर्यटन नकाशावर ठळकपणे स्थान मिळवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. शिवटेकडीच्या विकासामुळे नागरिकांना दर्जेदार विरंगुळ्याचे ठिकाण उपलब्ध होणार असून, पर्यटकांची संख्या वाढून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प अमरावतीच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या बैठकीस अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पक्षनेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, शिवटेकडी व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक दिनेश बुब, नगरसेवक प्रदीप हिवसे, नगरसेविका राधा कुरील, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, राजु कुरील, निरीक्षक मुकेश खारकर, महेश जोशी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महानगरपालिकेत २०२६-२०२७

अधिक परिणामकारक करण्याचे आवाहन केले.

बैठकीत नगरसेवक व अधिकाऱ्यांनी शहरातील विविध विभागांच्या गरजा, निधीचे संतुलन तसेच नागरिकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विकासकामांच्या प्राधान्यक्रमावर चर्चा केली. स्वच्छता व्यवस्था, रस्ते व पायाभूत सुविधा, महानगरपालिका शाळा, आरोग्य केंद्रे तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या सुधारण्यासाठी निधी वाढविण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण सूचना मांडण्यात आल्या.

बैठकीत प्राप्त सूचनांच्या आधारे संबंधित अधिकारी अर्थसंकल्पात आवश्यक सुधारणा करणार असून सुधारित अर्थसंकल्प पुढील आमसभेच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे. यामुळे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प अधिक पारदर्शक, नागरिकाभिमुख आणि कार्यक्षम होईल, असा विश्वास समिती सदस्यांनी व्यक्त केला.

सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पामध्ये शहर विकास, पायाभूत सुविधा बळकटीकरण, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील सुधारणा यांसह विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून बैठकीत मांडलेल्या सूचना नागरिकांसाठी लाभदायी ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या बैठकीस नगरसेवक प्रशांत वानखडे, मिलींद बांबल, विनोद तनवाईस, प्रशांत महल्ले, दिपक साहू, सल्लाउद्दीन इक्राममुद्दीन, नाझीम खान करीम खान, नगरसेविका पद्मजा कौंडण्य, पंचफुला चव्हाण, मंजुषा जाधव, स्मिता सूर्यवंशी, ललिता रतावा, अस्मा फिरोज खान, प्रियंका पाटणे, मीनल सवाई, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मुख्य लेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय फिस्के तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जनता दरबार ठरतोय प्रभावी

कारवाईचे आदेश देण्यात आले. दरम्यान, नांदगावपेठ पोलीस ठाणे हद्दीतील दागिने फसवणूक प्रकरणात सीपींच्या थेट आदेशानंतर महत्त्वाची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात एमपीआयडी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून दोन महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले. जनता दरबारात फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींमध्ये वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ऑनलाइन ठगी, बँक फसवणूक आणि आर्थिक गुन्ह्यांबाबत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंदवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर तांत्रिक साधनांचा वापर करून गुन्हे जलदगतीने उघड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महिला सुरक्षेलाही प्राधान्य देत संबंधित प्रकरणांवर तत्काळ आणि कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून सर्व पोलीस ठाण्यांना संवेदनशीलतेने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जनता दरबाराच्या माध्यमातून पोलीस प्रशासन आणि नागरिकांमधील संवाद अधिक प्रभावी करण्याचा उद्देश असल्याचे सीपी राकेश ओला यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी पोलीस प्रशासन सातत्याने कार्यरत राहील आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### धोकादायक केबल्स हटविण्याची

संयुक्त नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. वारंवार सूचना देऊनही नियमांचे पालन न झाल्यामुळे आता प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या पथकांकडून शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा, शाळा परिसर तसेच गर्दीच्या भागांमध्ये पाहणी करण्यात येत असून लोंबकळणाऱ्या व धोकादायक केबल्स हटविण्याचे काम वेगाने सुरू आहे. काही ठिकाणी अत्यंत खराब अवस्थेतील केबल्स तात्काळ काढून टाकण्यात आल्या असून उर्वरित ठिकाणी सुरक्षित व्यवस्थापन करण्यात येत आहे.निरीक्षणादरम्यान अनेक भागांमध्ये केबल्स नियमबाह्य पद्धतीने बसविण्यात आल्याचे आढळले. रस्त्यांवर व सार्वजनिक ठिकाणी लटकणाऱ्या केबल्समुळे वाहनचालक, पादचारी तसेच आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले होते.

महानगरपालिकेच्या या मोहिमेमुळे शहराचे सौंदर्यीकरण होण्यास मदत होणार असून रस्त्यांवरील अस्ताव्यस्तता कमी होणार आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संबंधित सेवा पुरवठादारांना अंतिम इशारा देत नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. भविष्यात नियमभंग आढळल्यास दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेच्या या व्यापक कारवाईमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत शहरातील अनियमित केबल व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २५ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## अनसिंग गावातील जल जीवन मिशनमध्ये गंभीर गैरव्यवहार?

### ८ कोटी ७३.७४ लाखांचा निधी खर्चूनही योजना अपूर्ण

***वाशिम :** तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या अनसिंग गावातील पाणीपुरवठा योजनेतील गंभीर अनियमितता, प्रचंड विलंब आणि निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात युवा सामाजिक कार्यकर्ते यश सतीश चव्हाण यांनी आज दिनांक २४ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.*

*अनसिंग गावासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली ही पाणीपुरवठा योजना सन २०२२ मध्ये सुरू करण्यात आली होती. करारानुसार ही योजना सन २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र २०२५ संपत आले असतानाही ही योजना अपूर्णच आहे.*



यामुळे गावातील सुमारे १५ हजारांहून अधिक नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी नागरिकांचे आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक मोठे नुकसान होत आहे.यापूर्वीही या प्रश्नावर अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला होता. दि. १० जानेवारी २०२५ रोजी आंदोलनानंतर उपविभागीय अभियंत्यांनी दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. त्यानंतर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वाशिम यांनी दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी पत्राद्वारे दि. ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वार्डनिहाय पाणीपुरवठा सुरू

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे निष्काळजीपणा.!**

करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र दोन्ही आश्वासने पूर्ण करण्यात आलेली नाहीत. यावरून संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांची जाणीवपूर्वक दिशाभूल करण्यात आली आहे.या योजनेसाठी आतापर्यंत तब्बल ८. कोटी ७३.७४ लक्ष रुपयांचा निधी कंत्राटदाराला अदा करण्यात आला आहे. एवढा मोठा निधी खर्च होऊनही प्रत्यक्ष काम ६० टक्क्यांपेक्षा कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे आर्थिक गैरव्यवहार, संगनमत आणि शासकीय निधीच्या अपहार केला आहे यासोबतच, योजना पूर्ण होण्यापूर्वीच संपूर्ण गावात टाकण्यात आलेल्या पाइपलाईनमध्ये मोठ्या प्रमाणावर लिकेज आढळून आले आहे. यावरून काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे स्पष्ट होत असून, ही योजना भविष्यात पूर्णपणे अपयशी ठरण्याचे दिसून येते आहे.या पार्श्वभूमीवर संपूर्ण योजनेची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी करणे, जबाबदार अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करणे, कंत्राटदाराचा करार रद्द करून त्याला काळ्या यादीत टाकणे, तसेच निकृष्ट कामासाठी अदा केलेला निधी वसूल करणे यांचा समावेश आहे. तसेच, खराब झालेली पाइपलाईन बदलून दर्जेदार काम करून निश्चित कालमर्यादेत नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाकडे तात्काळ लक्ष न दिल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात येईल,असे निवेदनात यश चव्हाण यांनी इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे अनसिंगकरांचे लक्ष लागले आहे.

## आक्रमक भूमिकेचा विजय

### नगरसेवक अजय श्रीवास यांच्या इशा–याने पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

प्रभाग क्र. ५ मधील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून भेडसावत असलेली पाणीटंचाई अखेर दूर झाली असून, यासाठी नगरसेवक अजय श्रीवास यांच्या ठाम आणि आक्रमक भूमिकेचा मोठा वाटा ठरला आहे.

महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाने अचानक पाणीपुरवठा खंडित केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. २३ मार्च रोजी नगरसेवक अजय श्रीवास यांनी प्रभागातील महिला व नागरिकांसह थेट प्राधिकरणाच्या कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. अधिकाऱ्यांनी काही ग्राहकांकडे थकबाकी



असल्याचे कारण पुढे केले, मात्र 'जे नियमित बिल भरतात त्यांच्यावर अन्याय का?' असा थेट सवाल श्रीवास यांनी उपस्थित केला.

'पाणीपुरवठा तात्काळ सुरू करा, अन्यथा २४ मार्चपासून उपोषण!' असा इशारा देत श्रीवास यांनी प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरले. या आक्रमक पवित्र्याचा परिणाम तात्काळ दिसून आला. त्याच दिवशी रात्री ८ वाजता महात्मा फुले नगर, वाल्मीक नगर, रविदास नगर आणि धारावी वस्ती येथे पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. याबाबत अधिकाऱ्यांनी श्रीवास यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी प्रस्तावित उपोषण मागे घेतले.

पाणी ही जीवनावश्यक गरज पुन्हा उपलब्ध झाल्याने प्रभागातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगरसेवक अजय श्रीवास यांचे आभार मानले.

## रामललाच्या प्रकट दिनी दारूबंदीची मागणी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

येत्या २६ मार्च २०२६ रोजी संपूर्ण देशभर 'राम नवमी'चा उत्सव मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा केला जाणार आहे.प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणून हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो.मात्र,अशा पवित्र दिवशी वाशिम जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच धार्मिक भावनांचा आदर करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व देशी आणि विदेशी दारूची दुकाने,तसेच अवैध दारूविक्री पूर्णपणे बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी 'विठाई मायनॉरिटी बहुद्देशीय प्रतिष्ठान'च्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात संस्थेचे अध्यक्ष प्रदिप वसंतराव खंदारे यांनी वाशिम जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर केले आहे. राम नवमीच्या निमित्ताने वाशिम शहरासह संपूर्ण जिल्ह्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.या दिवशी रामभक्त मोठ्या संख्येने मिरवणुकांमध्ये सहभागी होतात.शहरातील वातावरण भक्तीमय झालेले असते.अशा वेळी दारूची दुकाने उघडी राहिल्यास अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.


## शेतकऱ्यांचे पीक विमा दावे वेळेतच मिळावेत

### लोकसभेत खा. संजय देशमुखांची मागणी

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

यवतमाळ–वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी लोकसभेत तारांकित प्रश्न क्रमांक ४५९ द्वारे प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY) अंतर्गत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीक विमा दाव्यांच्या निकाली होणाऱ्या विलंबाचा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला.शेतकऱ्यांना पीक विमा दावे वेळेतच मिळावेत अशी मागणी लोकसभेत खा. देशमुख यांनी केली आहे.

खासदार देशमुख यांनी विशेषतः महाराष्ट्रातील यवतमाळ, वाशिम व परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा दाव्यांच्या संदर्भात येणाऱ्या अडचणींकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले. तसेच राज्य सरकारकडून प्रीमियम अनुदान वेळेवर न दिल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई



उशिरा मिळत असल्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

केंद्रीय कृषी आणि किसान कल्याण मंत्री श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सरकारकडून दिलेल्या उत्तरानुसार, खरीप २०२४ हंगामासाठी महाराष्ट्रात एकूण ४, ७४०. ५८ कोटी रुपयांच्या दाव्यांपैकी ९९ टक्के रक्कम वितरित करण्यात आली असून केवळ १ टक्के रक्कम प्रलंबित आहे. यवतमाळ, वाशिम व परभणी जिल्ह्यांमध्ये सुद्धा सुमारे ९९.७७ टक्के दाव्यांचा निपटारा झाल्याचे सांगण्यात आले.

तसेच पीक विमा दावे जलद व पारदर्शक पद्धतीने निकाली काढण्यासाठी राष्ट्रीय पीक विमा पोर्टल (NCIP), डिजीक्लेम मॉड्यूल, CCE अॅप तसेच सॅटेलाइट आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.

यावर प्रतिक्रिया देताना खासदार श्री. देशमुख म्हणाले की, 'सरकारच्या आकडेवारीनुसार बहुतेक दावे निकाली निघाले असले तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वेळेत आणि पूर्ण नुकसानभरपाई मिळणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः यवतमाळसारख्या आत्महत्या ग्रस्त जिल्ह्यात शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळणे ही काळाची गरज आहे.'

तसेच त्यांनी केंद्र व राज्य सरकारला मागणी केली की, उर्वरित प्रलंबित दावे तातडीने निकाली काढावेत आणि भविष्यात शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ वेळेवर व पारदर्शक पद्धतीने मिळेल याची खात्री करावी.

## कृत्रिम पाणी टंचाईचा आरोप



**मानोरा :** तालुक्यातील गव्हा ग्रामपंचायत हद्दीत कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केल्याचा आरोप करत संबंधित प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी गटविकास अधिकारी, यांच्याकडे प्रशासक राहुल भगत यांनी २३ मार्च ला निवेदनद्वारे केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, गव्हा गावातील प्रभाग क्रमांक १, २ व ३ तसेच नदीच्या उत्तरेकडील भागात पाणी टंचाई असल्याची तक्रार पंचायत समितीकडे केली आहे. मात्र ही तक्रार राजकीय आकसापोटी करण्यात येत असून गावाची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनातून भगत यांनी केले आहे.

दरम्यान, गावात पाणी उपलब्ध असून विंधन विहीर दुरुस्त करण्यात आली आहे. तसेच मागील वर्षी खोदलेल्या विंधन विहिरीला पाणी लागले असून ग्रामस्थ नियमितपणे पाणी भरत असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

## उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी दक्ष राहावे - जिल्हाधिकारी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**गत दोन आठवड्यापासून उन्हाची तिव्रता अचानक वाढली असून उष्णतेच्या बाबतीत वाशिम जिल्हा नेहमीच अग्रस्थानावर असतो. यावर्षीसुध्दा तापमान वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघाताबाबत काळजी घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात शुक्रवारी (दि. २०) रोजी आयोजित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले, दिवसा व रात्रीच्या उकाड्यात वाढ झाली असून सामान्यपेक्षा तापमान जास्त राहण्याची शक्यता आहे. उष्णतेची लाट लक्षात घेता प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. दुपारी १२ ते ४ या वेळात कोणतेही कार्यक्रम घेऊ नयेत. लहान मुले, वयोवृध्द नागरिक आणि व्याधीग्रस्त नागरिकांची विशेष काळजी घ्यावी. प्रत्येक स्तरावर उष्माघाताबाबत जनजागृती करावी. शाळा, अंगणवाडी आदींच्या वेळेत बदल करण्याचे शिक्षण विभागाने निर्देश द्यावेत, तसेच आरोग्य यंत्रणाही सतर्क ठेवावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी सांगितले की, ग्रामीण भागात पाणीपुरवठा, सावलीची व्यवस्था व जनजागृती मोहिमा प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जाईल. ग्रामपातळीवर आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्त्यांमार्फत उष्माघाताबाबत माहिती पोहोचविण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांनी सांगितले की, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार तातडीने प्रतिसाद देण्यासाठी नियंत्रण कक्ष सक्रिय ठेवण्यात येणार आहे.

**उष्माघातासंदर्भातील आजाराची लक्षणे**

चक्कर येऊन पडणे, फेफरे येणे किंवा झटके येणे, झोपेतून उठण्यास त्रास होणे, गोंधळल्यासारखे बोलणे किंवा वागणे, श्वासाची व हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे, शरीराचे तापमान १०५ अंशांपेक्षा अधिक होणे, स्नायूंमध्ये पेटके येणे, चिडचीड होणे, डोकेदुखी, अशक्तपणा, मळमळ व उलट्या होणे तसेच अधिक घाम येणे ही उष्माघाताची प्रमुख लक्षणे आहेत.

**उष्मालाटेपासून बचावासाठी घ्यावयाची दक्षता काय करावे :**

पुरेसे पाणी प्यावे; तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी घ्यावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. सूर्यप्रकाशापासून बचावासाठी घरातील पडदे व झडपांचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.

## एकबुर्जी धरण परिसरात अनधिकृत पाणी उपशावर प्रशासनाचा मोठा घाव

### विद्युत पंप जप्त, नियमभंग करणा–यांना इशारा

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कठोर भूमिका घेत येथील एकबुर्जी धरण प्रकल्पाच्या शिवारात अनधिकृत पाणी उपसा करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई केली. महसूल विभाग, पाटबंधारे विभाग, नगरपरिषद यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या धडक कारवाईत नियमबाह्य पद्धतीने सुरू असलेला उच्च क्षमतेचा विद्युत पंप जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शेतकऱ्याने शेतासाठी विद्युत कनेक्शन मिळविण्यासाठी अर्ज सादर केला होता. मात्र, संबंधित अर्जास अधिकृत मंजुरी मिळालेली नसताना देखील शेतात ६.४० ते



१० एच.पी. क्षमतेचा विद्युत पंप बसवून थेट धरणातून पाणी उपसा सुरू ठेवण्यात आला होता. ही बाब गंभीर स्वरूपाची मानली जात असून, जलस्त्रोतांच्या अनधिकृत वापराचा हा प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आला होता. दरम्यान, शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता, उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी धरणातील पाणी साठा पुरेशा प्रमाणात राखणे अत्यंत गरजेचे आहे. याच उद्देशाने प्रशासनाने संबंधित शेतकऱ्यांना वारंवार सूचना देत पाणी उपसा तात्काळ थांबविण्याचे तसेच कमी करण्याचे आदेश दिले होते. मात्र, संबंधितांकडून या सूचनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले.

## कारंजा सराफ असोसिएशनच्या अध्यक्षपदी मंगेश कडेल यांची सर्वानुमते निवड!



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

शहरातील सराफा व्यावसायिकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेल्या कारंजा सराफ असोसिएशनच्या बैठकीत मंगेश कडेल यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण सराफा व्यावसायिकांमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगेश कडेल हे शहरातील एक परिचित आणि विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व असून, सर्वसामान्य नागरिकांशी त्यांचा दांडगा संपर्क आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे सराफा व्यावसायिकांना नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रसंगी माजी अध्यक्ष आकाश कऱ्हे यांनी पुष्पगुच्छ देऊन मंगेश कडेल यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बैठकीला शहरातील अनेक सराफा व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मंगेश कडेल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,

'सराफा व्यावसायिकांच्या कोणत्याही अडचणी असतील, तर त्यांचा पाठपुरावा करून त्या सोडविण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.' त्यांच्या निवडीबद्दल सराफा व्यावसायिकांसह संपूर्ण शहरात अभिनंदनाचा वर्षाव होत असून, या नव्या नेतृत्वाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

## जुगार अड्डा उद्ध्वस्त ; ७.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम-अकोला मार्गावरील सिध्द पाटील ढाब्यावर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत जुगार अड्डा उघडकीस आला असून १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत रोख रक्कम, जुगार साहित्य, मोबाईल व दुचाकी असा एकूण ७ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच ढाब्यावर अवैध दारू विक्री होत असल्याचेही समोर आले असून राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्वतंत्र कारवाई करत दारू जप्त केली.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २४ मार्च रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल यांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वाशिम व वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने सकाळी सिध्द पाटील ढाब्यावर छापा टाकला. यावेळी चार आरोपी ५२ पत्त्यांवर पैशांची हार-जीत करताना आढळून आले, तर इतर काही जण



पोलिसांना पाहताच पळून गेले.

**सिध्द पाटील ढाब्यावर पोलिसांची धाड**

या प्रकरणी नाझीम खाँ अजीज खाँ पठाण (वय ४२, रा. सोपीनगर, इदगाह नगर, वाशिम), गणेश मोहनराव हेंद्रे (वय ५१, रा. टिळक चौक, वाशिम), सिध्देश्वर पुंडलीक लोनसुने (वय ५२, रा. दत्तनगर, अकोला रोड, वाशिम), गजानन किसन चौधरी (वय ३८, रा. लाखाळा, वाशिम), शेख खाजा शेख हनीफ, देवीदास वानखेडे (रा. चामुंडा देवी परिसर, वाशिम), लक्ष्मण काळे (रा. काळेफाईल), शेख इकबाल (रा. गोटे कॉलेजजवळ), दत्ता लठाड (मॅनेजर), युवराज (फॅन्सी बॅग व्यवसाय), शेख अशपाक खाजा (नातेवाईक), शामा सुरवसे (नोकर), समशेर खाँ आरेफ खाँ पठाण (रा. बिलाल नगर), सोनू खाँ फिरोज खाँ पठाण (रा. बिलाल नगर), मुजाहिद खाँ आसिफ खाँ (रा. बिलाल नगर), शेख जावेद शेख लखन (रा. गोपाल टॉकीज मागे), जॉन (रा. अकोला नाका) व अददू (रा. बुरहानपुरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान आरोपींकडून ३२ हजार ६०० रुपये रोख रक्कम, जुगार साहित्य, मोबाईल फोन तसेच दुचाकी वाहने असा एकूण ७,७५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, घटनास्थळी पाहणी करताना ढाब्यावर अवैध दारू विक्री सुरू असल्याचा संशय आल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाला पाचारण करण्यात आले. विभागाने देशी व विदेशी दारू असा २७ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पुढील कारवाई केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे व अप्पर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक श्रीदेवी पाटील, उपनिरीक्षक राहुल गंधे, पोलीस हवालदार प्रविण राऊत, भिमराव गवई, प्रशांत अंभोरे, तसेच पोलीस कर्मचारी अनिल बोरकर, नितीन ससाणे, दिपक भंडगे यांच्यासह उपविभागीय कार्यालयातील अरविंद राठोड, गणेश बाजड, स्वप्नील शेळके, निखिल चोपडे, संदीप मळघणे व आरसीपी पथकाने सहभाग घेतला.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११७ ■ बुधवार, २५ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## इंधनासाठी हाहाकारःवर्ध्यात पेट्रोल पंपांवर उसळली झुंबड

### -रांगांमध्ये अडकले शहर, पेट्रोलसाठी नागरिकांची धावाधाव

**-५० चे ५०० झाले; भीतीपोटी टाक्या फुल्ल, पंपांवर तुफान गर्दी**







**वर्धा । जनमाध्यम :** आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस तुटवड्याच्या चर्चेनंतर आता पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्याच्या अफवांनी वर्धा शहरात अक्षरशः गोंधळ उडवला आहे. मंगळवारी दुपारनंतर अचानक सर्वच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची झुंबड उडाली. शहरातील बहुतांश पंपांवर लांबलचक रांगा लागल्या असून, अनेक पंपांनी 'नो स्टॉक'चे फलक लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे संपूर्ण शहरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. इंधन मिळेल की नाही या भीतीने वाहनधारकांनी पेट्रोल पंपांकडे धाव घेतली. विशेष म्हणजे, रोज केवळ ५० रुपयांचे पेट्रोल भरणारे वाहनधारकही आता ५०० रुपयांचे पेट्रोल भरताना दिसत आहेत. गरज नसतानाही टाक्या फुल्ल करण्याकडे नागरिकांचा कल वाढल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे.

काही ठिकाणी रात्री उशिरापर्यंत वाहनांच्या रांगा कायम होत्या. एका पंपावर इंधन संपल्याची माहिती मिळताच वाहनधारक दुसऱ्या पंपावर धाव घेत असल्याने शहरात 'इंधनासाठी भटकंती'चे चित्र निर्माण झाले आहे. या गोंधळात सर्वसामान्य नागरिक मात्र नाहक त्रास सहन करत आहेत.

दरम्यान, काही पंपचालकांनी साठा असूनही 'इंधन संपले' असे सांगत कृत्रिम तुटवडा निर्माण केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पेट्रोल-डिझेलच्या संभाव्य दरवाढीच्या पार्श्वभूमीवर जादा दराने विक्री करण्यासाठी साठेबाजी केली जात असल्याचीही चर्चा रंगली आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळत आहे.

याआधी व्यावसायिक गॅस तुटवड्याच्या काळात साठेबाजी व काळाबाजाराच्या तक्रारी समोर आल्या होत्या. प्रशासनाने कारवाई केल्यानंतर परिस्थिती काहीशी सुरळीत झाली होती. मात्र आता पेट्रोल-डिझेलच्या बाबतीतही तशीच परिस्थिती निर्माण होत असल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पुरवठा विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून इंधनाचा साठा, वितरण व विक्री यावर नियंत्रण ठेवणे अपेक्षित असताना केवळ एजन्सीकडून मिळालेल्या माहितीनुसार कागदी घोडे नाचवले जात असल्याची टीका होत आहे. अफवांना आळा घालून काळाबाजार रोखण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## तळेगाव-चाकण महामार्गाला 'ग्रीन सिग्नल'; औद्योगिक विकासाला नवी चालना



**मुंबई जनमाध्यम :** पुणे जिल्ह्यातील वाहतूक कोंडी कमी करून औद्योगिक विकासाला गती देणारा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तळेगाव ते चाकण या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरी उन्नतीकरणास मान्यता देण्यात आली असून, यामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातील महामार्गांचे जाळे अधिक सक्षम करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

तळेगाव ते चाकण दरम्यान ० ते २६ किलोमीटर अंतरात ४ पदरी उन्नत तसेच ४ पदरी समांतर महामार्ग उभारण्यात येणार आहे. पुढे चाकण ते शिक्रापूर या २६ ते ४३ किलोमीटर टप्प्यात ४ पदरी समांतर महामार्गाची उभारणी करण्यात येणार आहे. हा प्रकल्प डीएफबीओटी (डिझाईन, फायनान्स, बिल्ट, ऑपरेट अ‍ॅन्ड ट्रान्सफर) पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे चाकण औद्योगिक वसाहतीतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. तसेच मालवाहतुकीला वेग मिळून उद्योगांना चालना मिळेल आणि रोजगारनिर्मितीला मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

## रेल्वे पोलिसांनी जप्त केलेल्या मोबाईलचा लिलाव

**वर्धा जनमाध्यम :** न्यायालयाच्या आदेशानुसार, रेल्वे पोलिस स्टेशन वर्धा येथे जप्त केलेल्या मोबाईल फोनचा लिलाव ३० मार्च रोजी आयोजित केला जाणार आहे.

या लिलावात एकूण १० गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या विविध कंपन्यांच्या मोबाईलचा समावेश आहे. लिलावाचे आयोजन रेल्वे पोलिस स्टेशनच्या प्रांगणात दुपारी १२ वाजता होईल.

रेल्वे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्यांनी इच्छुक सर्वांना लिलावास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या कार्यक्रमाद्वारे जप्त केलेला मुद्देमाल योग्य व्यक्तींमध्ये हस्तांतरित होईल अशी अपेक्षा आहे.

## उच्च शिक्षणातील प्रश्नांवर अडबाले यांची मंत्र्यांशी चर्चा

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील उच्च शिक्षण विभागातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची विधान भवन येथे भेट घेऊन निवेदन सादर केले.



या भेटीत गडचिरोली येथे सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालय स्थापन करण्याची मागणी प्रमुखत्वाने मांडण्यात आली. तसेच नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणातील रिक्त पीठासीन अधिकारी पद तातडीने भरण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या डीसीपीएस योजनेअंतर्गत शासनाच्या हिस्स्याचा निधी नियमितपणे जमा करण्याची मागणीही करण्यात आली. २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे अडबाले यांनी नमूद केले.

याशिवाय १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त प्राध्यापकांच्या जुन्या निवृत्ती उपदानासाठी सेवा जोडण्याबाबत परिपत्रक काढण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी दिलीप कडू, अनिल भारसाकळे व नंदकिशोर नवरे उपस्थित होते.

### एक गाडी, दोन तालुके...

## पाण्यासाठी ग्रामस्थांची वणवण; हॅन्डपंप दुरुस्ती ठप्प



**सेलू जनमाध्यम :** उन्हाळ्याची चाहूल लागताच ग्रामीण भागात पाणीटंचाईचे सावट गडद होत असताना प्रशासनाची यंत्रणा मात्र अपुरी पडत असल्याचे चित्र समोर आले आहे. सेलू आणि देवळी या दोन तालुक्यांतील शेकडो गावांसाठी केवळ एकच हॅन्डपंप दुरुस्ती गाडी उपलब्ध असल्याने नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः भटकंती करावी लागत आहे.

वाढत्या तापमानामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत असून अनेक गावांतील हॅन्डपंप कोरडे पडले आहेत. या पार्श्वभूमीवर तातडीने दुरुस्ती होणे अपेक्षित असताना, एकाच गाडीवर संपूर्ण यंत्रणा अवलंबून असल्याने कामांचा ढीग साचत चालला आहे. एका तालुक्यातील काम पूर्ण होईपर्यंत दुसऱ्या तालुक्यातील तक्रारींचा डोंगर वाढत असल्याचे वास्तव आहे.

दरम्यान, गावागावातून पंचायत समितीकडे तक्रारींचा ओघ वाढला आहे. मात्र गाडी लवकरच येईल या ठराविक उत्तरामुळे ग्रामस्थांचा संयम सुटत चालला आहे. महिलांना व शेतकऱ्यांना पाण्यासाठी लांब अंतर कापावे लागत असून, दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे.

दोन तालुक्यांसाठी एक गाडी म्हणजे प्रशासनाचा निष्काळजीपणा. आताच ही अवस्था असेल तर मे महिन्यात पाणी कुठून आणायचे असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

भूगर्भातील पाण्याची पातळी घटल्याने हॅन्डपंपमध्ये तांत्रिक बिघाड वाढले आहेत. त्यातच एका गाडीला दोन्ही तालुक्यांत फिरावे लागत असल्याने वेळेचा मोठा अपव्यय होत आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढण्यापूर्वीच प्रशासनाने अतिरिक्त दुरुस्ती गाड्यांची व्यवस्था करावी, अन्यथा पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## ब्राम्हणीतील शेतकऱ्याची नैराश्यातून आत्महत्या

**सेलू जनमाध्यम:** ब्राम्हणी येथील ५५ वर्षीय शेतकरी दिलीप चंदू गावंडे यांनी मंगळवार सकाळी १० वाजताच्या सुमारास घराशेजारी झाडाला गळफास लावून आपले जीवन संपवले.

माहितीनुसार, गावंडे गेल्या काही दिवसांपासून शारीरिक आजार आणि मानसिक तणावामुळे त्रस्त होते. अचानक आलेल्या नैराश्यातून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगी आहे.

घटनेची बातमी मिळताच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. ब्राम्हणी गावात शोककळा पसरली असून, शेजारी व परिचितांनी दुःख व्यक्त केले.

आत्महत्येची कारणे तपासण्यासाठी सेलू पोलिस, ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल तपास करत आहेत. ही घटना गावात धक्कादायक ठरली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचे लोकार्पण

**मुंबई जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचा आज विधीपूर्वक लोकार्पण करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुरू झालेल्या या नव्या बस सेवेच्या उद्घाटन सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधिमंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, तसेच टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक व अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू उपस्थित होते.



'राजमाता जिजाऊ' बस सेवा महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जिजाऊंच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या या सेवेत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार आहेत. प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळेल, असेही सांगण्यात आले. एसटी महामंडळाच्या ताफ्यात पूर्वीपासून 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा बस सेवांचा समावेश होता. 'राजमाता जिजाऊ' ही सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर ठरणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री पवार यांनी बसचे पूजन करून फीत कापली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास करत सेवेची सुरूवात केली. लोकार्पण सोहळ्यात बसच्या समोर घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिकात्मक स्वरूपामुळे कार्यक्रम ऐतिहासिक व प्रेरणादायी ठरला.

या नव्या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम, प्रवासी-केंद्रित आणि आधुनिक बनण्यास मोठा हातभार लागणार आहे.

## सिमेंट रस्ता तयार... पण साईडपट्ट्यांचा पत्ता नाही

### -खडकी आरोग्य केंद्रासमोरील प्रकार; अपघाताचा धोका वाढला

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील खडकी गावातून परसोडा मार्गावर दोन वर्षांपूर्वी सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आले. मात्र, रस्त्याच्या कडेला आवश्यक असलेल्या साईडपट्ट्या पूर्णपणे गायब झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः आरोग्य केंद्रासमोरील या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असताना अपघाताची भीती अधिकच वाढली आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला मुरूम टाकून साईडपट्ट्या मजबूत करणे अपेक्षित होते. मात्र कंत्राटदाराने या कामाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. भरधाव वेगाने जाणारी वाहने आणि साईडपट्ट्यांचा अभाव यामुळे कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.



दरम्यान, या मार्गावर गट्टू बसविण्याचे कामही सुरू असून ते निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार पुढे येत आहे.

काही ठिकाणी नालीचे काम अर्धवट सोडण्यात आले असून, तर काही ठिकाणी साहित्याचे ढिगारे रस्त्यावरच पडून आहेत. उघड्यावर पडलेल्या सळ्या आणि संथगतीने सुरू असलेले काम नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते पंकज चतुर (रा. परसोडा) व अमित उदापुरे (रा. खडकी) यांनी कामाचे चित्रीकरण करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार नोंदवली आहे. बोगस काम तात्काळ थांबवून चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी अभिनव उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी : मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी विविध अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, नवी मुंबई येथील सिडकोच्या जागेवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र उभारण्यात आले असून, या केंद्राचे उद्घाटन त्यांनी केले. या केंद्राद्वारे राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरे आयोजित केली गेली. यामध्ये हृदयरोग तज्ञांकडून एकूण २,५०७ तपासण्या करण्यात आल्या, तर जन्मजात हृदयरोग (सीएचडी) उपचारासाठी ३,२२६ बालकांवर उपचार करण्यात आले.

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पुणे जिल्ह्यातील जुन्नर व सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यांसह आदिवासी बहुल भागांमध्ये विशेष आरोग्य उपक्रम राबविले गेले. पुण्यातील शहरी झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या, तर रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आरोग्य सेवा पोहचविण्यावर भर देण्यात आला. विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये जन्मजात हृदयरोग तपासणीसाठी मेगा शिबिरे सुरू आहेत, ज्यामुळे दुर्गम भागातील बालकांनाही अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होत आहे.

नवी मुंबईत बांधकाम व वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्यात आले आहेत, तर अंगणवाडी सेविकांसाठी नॉन-कम्युनिकेबल डिसीज (एनसीडी) व कर्करोग तपासणी प्रकल्पही सुरू आहेत.

आजपर्यंत ३,५०० हून अधिक आशा, अंगणवाडी सेविका, सहाय्यक परिचारिका व वैद्यकीय अधिकारी यांना क्षमता विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक व परिणामकारक करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

## चिराग डायमंड परिसरात ईद मिलन समारोह, समाजात एकतेचा संदेश

**वर्धा जनमाध्यम :** अनमोल नगर येथील चिराग डायमंड परिसरात साजरा करण्यात आलेला ईद मिलन समारोह उत्साहपूर्ण व आपुलकीच्या वातावरणात पार पडला. या कार्यक्रमातून कौमी एकता, सामाजिक सलोखा आणि बंधुत्व वाढवण्याचा संदेश दिला गेला.

कार्यक्रमात कु. फियाना चीनी हिने नमाजचे महत्त्व व सखोल अर्थ स्पष्ट केले. तिने सांगितले की नमाज ही फक्त धार्मिक कृत्य नाही, तर ईश्वराच्या समोर पूर्ण समर्पणाची इबादत आहे. इस्लाममध्ये दिवसातून पाच वेळा फज्र (सूर्योदयाआधी), जुहर (दुपारी), असर (दुपऱ्यानंतर), मगरिब (सूर्यास्ताआधी) व ईशा (रात्री) नमाज अदा केली जाते. ही प्रक्रिया नियत, तकबीर, कियाम, रुकू आणि सजदा या पाच टप्प्यांत होते, जी आत्मशुद्धी, विनम्रता व आध्यात्मिक शांतीची शिकवण देते. कार्यक्रमात चिराग डायमंड परिवारातील लहान सदस्य मास्टर माहिन सौदागर यांनी बकरी ईद व ईद-उल-फितर यातील फरक, ईद सणाचे सामाजिक व धार्मिक महत्त्व याबद्दल प्रभावी वाणी दिली. त्यांनी कुरानच्या आयतांचेही संदर्भ देऊन उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार श्री. नरेश भुरेलाल नवलानी यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा हिंगणघाट, मौजा नं. १८८, प. ह. नं. ६, ता. हिंगणघाट व जि. वर्धा नगर पालिका कक्षेत येणारा गुरूनानक वार्ड येथील ब्लॉक कं. १२ मधिल शिट कं. ३५,३७ नगर भुखंड कं. ४५४/९१ एकूण आराजी ६९.७० चौ. मी. म्हणजेच ७५०.०० चौ. फुट असुन त्याची


चतुःर्सिमा :- पुर्वेसः मोहित आर्या यांचे मकान,
पश्चिमेसः नाला व नंतर रोड,
उत्तरेसः गल्ली व नंतर मकान, दक्षिणेसः गल्ली, (लिगल व टेक्नीकल प्रमाणे) व चतुःर्सिमा :- पुर्वेसः निंरकारी भवन,
पश्चिमेसः खाली जागा नंतर नाला,
उत्तरेसः गल्ली व नंतर जैस्वानी यांचे मकान, दक्षिणेसः रोड, (मोक्याप्रमाणे)

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १२,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**अ‍ॅड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

# चिंचुका, बनावट खडे, नकली साप अन् 'एल्विश हनी'चा वापर करत भाविकांना गंडवले

**नाशिक/ प्रतिनिधी-** स्वतःला कॅप्टन म्हणवणा-या अशोक खरातने श्रद्धा, भीती आणि अंधविश्वासाचा आधार घेत भोळ्या-भाबड्या लोकांना जाळ्यात ओढत मोठा आर्थिक आणि लैंगिक शोषणाचा कारभार उभा केल्याचे समोर आले आहे.



**योग आणि ध्यान वर्ग-** तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, बाजारात सहज मिळणारे चिंचोके आणि बनावट खडे दैवी शक्तीच असल्याचे सांगून खरात हजारो ते लाखो रुपयांना विकत होता. एका चिंचोक्यासाठी तब्बल एक लाख रुपये उकळल्याच्या घटना समोर आल्या आहेत.एकूणच, चिंचोके, खडे, नकली साप आणि महागडा मध अशा विविध माध्यमांतून अशोक खरातने फसवणुकीचे जाळे उभे केले होते. आता या प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जात आहे, तसतसे आणखी धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नकली सापाने भीती निर्माण-** नाशिकच्या धार्मिक प्रतिमेचा फायदा घेत खरातने सर्पपूजाचा प्रकार राबवला. दरबारात तंत्र-मंत्राच्या नावाखाली तो ध्यानस्थ बसत असे आणि काही वेळाने २० फुटांचा नाग प्रकट झाल्याचा आभास निर्माण केला जात असे. प्रत्यक्षात हा साप बनावट असून, रिमोट किंवा इतर यंत्रणेद्वारे तो हलवला जात असल्याची माहिती तपासात समोर येत आहे.

**एल्विश हनीच्या नावाखाली उकळपट्टी-** फसवणुकीचा आणखी एक धक्कादायक प्रकार म्हणजे तुर्की मध किंवा एल्विश हनी विक्री. हा मध कामोत्तेजक आणि शक्तिवर्धक असल्याचा दावा करत खरात अनेक उद्योजक आणि राजकीय नेत्यांना विकत होता. विशेष म्हणजे, एका किलो मधाची किंमत तब्बल ९ लाख रुपये ठेवली जात होती. हा मध तुर्कीच्या समुद्रातील खोल गुहांमधून मिळतो, असा खोटा दावा केला जात होता.

**ट्रस्टमार्फत पैशांचा व्यवहार-** या माध्यमातून मिळालेली मोठी रक्कम खरात आपल्या ट्रस्टच्या नावावर जमा करत असल्याचेही तपासात उघड झाले आहे. या व्यवहारांद्वारे काळा पैसा पांढरा करण्याचा प्रकार झाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आता या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे. दरम्यान, सिन्नरच्या मिरगाव येथे मंदिर उभारून खरातने आपला दरबार सुरू केला होता. ज्योतिष, अंकशास्त्र, पूजाविधी यांच्या नावाखाली तो लोकांच्या समस्या सोडवण्याचा दावा करत असे.

# मंत्रालयातही जादूचे पाणी देणारे अशोक खरात नामक अधिकारी!

## ■ मुनगंटीवारांचा वार ■ अध्यक्षांनी उगारले कारवाईचे अस्त्र

**मुंबई/प्रतिनिधी-** भोंदूबाबा अशोक खरात याचे दररोजन नव कारनामे समोर येत असतानाचा विधिमंडळातही त्याचे पडसाद उमटत आहेत. अनेक राजकीय नेत्यांचाही अशोक खरात गुरू होता. काही मंत्रीही खरातकडे गेल्याचे समोर आले आहे. त्यावरूनच आज भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्र्यांसह अधिका-यांवरही आसूड उगारला आहे. त्याला कारणीभूत ठरला विधिमंडळ आश्वासन समितीचा अहवाल.



आश्वासन समितीचे अध्यक्ष रवी राणा यांनी समिती अहवाल सादर करत असताना अधिकारी बैठकांना अनुपस्थित राहत असल्याबाबत नाराजी व्यक्त केली. तब्बल मंत्री विधिमंडळात दिलेली तब्बल ५ हजारांहून अधिक आश्वासने प्रलंबित असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी अधिकारी समितीसमोर येत नसल्याचे सांगितले. तसेच यापुढे अधिकारी उपस्थित न झाल्यास हक्कभंग आणू, असा इशाराही त्यांनी दिला.

राणांच्या या विधानानंतर सुधीर मुनगंटीवार यांनीही अधिका-यांना धारेवर धरले. ते म्हणाले, जशी अंधश्रध्दा तशी अंधबुध्दीही धोक्याची आहे. हे अधिकारी म्हणजे अशोक खरातची आधुनिक रुपे आहेत. आश्वासन समितीसमोर अधिकारी मंत्र्यांना पटवतात. फक्त अशोक खरातच मंत्र्यांना फसवितो असे नाही. अधिकारीही फसवतात आणि मंत्री आश्वासन समितीकडे पत्र देतात की मी आश्वासन मागे घेतोय.छत्रपती शिवाजी महाराजांसमोर दिलेले आश्वासन अधिकारी आम्ही हे पूर्ण करणार नाही, असे सांगतात. या घटनांवर आज लक्ष दिले नाही आणि जादूचे पाणी असेच लोकशाहीवर भारी झाले तर हे वाईट आहे. या सभागृहाला जर कामचोर अधिकाही घाबरत नसतील तर कारवाईचा निर्णय घ्यावा. हा विषय गंभीरपणे घ्यावा, अशी विनंती मुनगंटीवार यांनी केली.

**IPS सातपुतेंनी जारी केले २ मोबाईल क्रमांक अन् ३ पोलीस अधिका-यांची नावे...**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही त्याची गंभीरपणे दखल घेतली. समित्या या विधिमंडळाच्या आत्मा समजल्या जातात. समितीचे कामकाज करण्याबाबत अधिकारी विलंब करत असतील किंवा समितीसमोर येत नसतील तर यापेक्षा गंभीर बाब होउ शकत नाही. हे मुळीच सहन केले जाणार नाही. यापुढे जर कोणत्याही समितीत अधिका-याची अनुपस्थिती माझ्याकडे कळविण्यात आली तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल, असा इशारा अध्यक्ष नार्वेकर यांनी दिला.

# राजमाता जिजाऊ बस सेवेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफयात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज राजमाता जिजाउ या बस सेवेचा लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बस सेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली.

विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या बस सेवा लोकार्पण सोहळयास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधामंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जान मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक आदी उपस्थित होते.




**राजमाता जिजाउ- बस सेवा**

राजमाता जिजाउ या नावाने सुरू करण्यात आलेली ही बस सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाबाई यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणा-या राजमाता जिजाउंच्या स्मरणार्थ ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफयात यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, हिरकणी आणि यशवंती अशा विविध सेवांचा समावेश असून, राजमाता जिजाउ ही बस सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेचे लोकार्पण झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास करत बससेवेची सुरूवात केली. यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाउ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

# सोशल मीडियाच्या विळख्यातून मुलांची होणार सुटका!-आशिष शेलार

## ■ विधानसभेत मोठी घोषणा ■ टास्क फोर्सची स्थापना

**मुंबई/प्रतिनिधी-** पुढील तीन महिन्यांत टास्क फोर्सचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, महाराष्ट्र शासन सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून अंतिम कायदेशीर आणि तांत्रिक उपाययोजना लागू करेल. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे अल्पवयीन मुलांवर होणारे मानसिक, शारीरिक आणि शैक्षणिक दुष्परिणाम रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक पाउल उचलले आहे. अशा प्रकारचे निर्बंध घालणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असून, विधानसभेत आशिष शेलार यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली. मुलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी एज व्हेरिफिकेशन आणि स्क्रीन टाइम लिमिट यांसारख्या उपाययोजनांवर सरकार आता ठोस काम करणार आहे.




आशिष शेलार यांनी सांगितले की, या समस्येचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी २ फेब्रुवारी २०२६ रोजी एका विशेष टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, कंपन्यांचे प्रतिनिधी, विद्यार्थी आणि पालकांचा समावेश आहे. हा टास्क फोर्स केवळ निर्बंधांचाच नाही, तर डिजिटल सेफटी शिक्षणाचाही अभ्यास करून पुढील तीन महिन्यांत आपला सविस्तर अहवाल सादर करणार आहे.

**प्रमुख प्रस्तावित उपाययोजना: Social Media**

अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरासाठी वयाची खातरजमा करणे सक्तीचे होणार. मुलांच्या सुरक्षिततेसाठी स्क्रीन टाइम मर्यादित ठेवण्याचे धोरण आखले जाणार. नियमांचे उल्लंघन करणा-या सोशल मीडिया कंपन्यांवर कडक कायदेशीर कारवाईची तरतूद. शाळा स्तारावर जबाबदार डिजिटल सवयी विकसित करण्यासाठी विशेष शिक्षण दिले जाणार आहे.

**संतुलित दृष्टिकोनावर भर – Social Media**

सरसकट बंदी हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नसून, शिक्षण आणि तंत्रज्ञान यांचा समतोल राखणे आवश्यक आहे, असे शेलार यांनी स्पष्ट केले. आयटी कायद्यातील कलम ६६ आणि ६९ चा प्रभावी वापर करून राज्यासाठी सक्षम धोरण तयार केले जात आहे. केंद्र सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालातही मुलांच्या सोशल मीडिया वापरामुळे देशाच्या उत्पादकतेवर होणा-या परिणामांची दखल घेण्यात आली आहे. दरम्यान, पुढील तीन महिन्यांत टास्क फोर्सचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, महाराष्ट्र शासन सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून अंतिम कायदेशीर आणि तांत्रिक उपाययोजना लागू करेल.

# माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी राज्यात अभिनव उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी-** महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी विविध अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, नवी मुंबई येथील सिडकोच्या जागेवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र उभे राहिले आहे. या केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री सत्य साई संजीवनी केंद्रामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांद्वारे विविध जिल्हा रुग्णालयांमध्ये हृदयरोग तज्ज्ञांकडून एकूण २,५०७ टू-डी-इको तपासण्या करण्यात आल्या. तसेच जन्मजात हृदयरोग (सीएचडी) उपचारासाठी राज्यभरातील आरबीएसके पथकांमार्फत ३२२६ बालकांवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र येथे उपचार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार श्री सत्य साई संजीवनी केंद्रांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि सातारा जिल्ह्यातील जावळी या आदिवासी बहुल तालुक्यांना दत्तक घेउन तेथे विशेष आरोग्य उपक्रम राबविले. तसेच पुण्यातील शहरी झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आरोग्य सेवा पोहचविण्यात येत आहेत.



विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये बालकांमधील जन्मजात हृदयरोग तपासणीसाठी मेगा शिबिरे सुरू असून, दुर्गम भागातील बालकांनाही अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होत आहेत. नवी मुंबई येथे बांधकाम कामगार तसेच वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच अंगणवाडी सेविकांसाठी नान-कम्युनिकेबल डिसीज (एनसीडी) आणि कर्करोग तपासणी प्रकल्पही सुरू करण्यात आला आहे. याशिवाय, आजपर्यंत आशा, अंगणवाडी सेविका, सहाय्यक परिचारिका आणि वैद्यकीय अधिकारी अशा ३५०० हून अधिक शासकीय कर्मचा-यांना क्षमता विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

# महालक्ष्मी सरस महिलांसाठी बाजारपेठेचा मोठा ब्रँड- मुख्यमंत्री





**नागपूर/प्रतिनिधी-** महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ विक्रीचे ठिकाण नसून महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ म्हणून कार्य करत आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यात उमेद माल उभारण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या प्रदर्शनाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून महालक्ष्मी सरस हा प्रदर्शनाचा ब्रँड अधिक मजबूत होत आहे. राज्यात शंभर कोटी रुपयाचा व्यवहार बचत गटाच्या माध्यमातून होत असल्याचेही मुख्यमंत्रीयांनी यावेळी सांगितले केले.प्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृपाल तुमाने, कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर आदी लोकप्रतिनिधी उपस्थिती होती. महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये सुमारे ४०४ स्टाल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत १० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. ही विक्री पुढील काळात आणखी वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. राज्यात ३ ठिकाणी महालक्ष्मी सरस प्रदर्शन भरविण्यात येते आणि या माध्यमातून सुमारे १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते यामुळे महिलांच्या उद्योगाना मोठी चालना मिळत असून पुढे त्यांना अधिक संधी निर्माण करून देण्याचे काम शासन करणार आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून महिला अर्थव्यवस्थेच्या प्रमुख घटक बनल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात लखपती दीदी अभियानांतर्गत १ कोटी महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये उमेद माल उभारण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे माल उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले. नागपूर येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन अत्यंत उत्तम झाले असून यासाठी १०० पैकी १०० गुण आयोजकांना देतो आणि महिलांसाठी महालक्ष्मी सरस च्या माध्यमातून मिळणारी हक्काची बाजारपेठ दरवर्षी नागपुरात उपलब्ध करून दिली जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# 1500चा सिलिंडर थेट 5000ला! ब्लॅकचा धंदा फुल स्विंगमध्ये, टँकरमधून अवैध रिफिलिंगचा पर्दाफाश

**मुंबई/प्रतिनिधी-** अमेरिका-इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध पुकारलं, या युद्धाला आता २४ दिवस पूर्ण होत आलेत. या युद्धाचा सर्वात अगोदर कोणता परिणाम झाला असेल तर, तो गॅस टंचाईवर! भारताला याचा सर्वात अगोदर झळ बसली आहे. घरगुती गॅसची टंचाई जाणवू नये यासाठी व्यावसायिक गॅस वापरावर निर्बंध आणण्यात आले. यातूनच काळ्या बाजारात व्यावसायिक सिलिंडरचे भाव दीड हजार रुपयांवरून थेट ५००० रुपयांवर गेले आहेत. व्यावसायिक गॅस टंचाईचा मुद्यावर उद्योजकांनी अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबरोबर बैठक घेउन, समस्या मांडल्या. याच दरम्यान, पोलिसांनी अवैध रिफिलिंगवर कारवाई करत, दोन कोटी एक लाख रुपयांच्या मुद्देमालासह गॅसने भरलेले तीन टँकरसह चौघांना अटक केली आहे.

अहिल्यानगरच्या औद्योगिक क्षेत्रात व्यावसायिक गॅस टंचाई निर्माण झाली आहे. यावर उपाययोजना कराव्यात अशी मागणी उद्योजकांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्याबरोबर बैठक घेउन केली. उद्योजकांनी आता कामकाजाचा आठवडा पाच दिवसांवर आणण्याचा निर्णय घेतला आहे. यावर कधीपासून अंमलबजावणी होते, याकडे आता लक्ष लागलं आहे.




**गॅस टंचाईचा सर्वाधिक फटका छोट्या-**मोठ्या उद्योजकांना बसला आहे. चहा, वडापावच्या टप-यांपासून ते खानावळीपर्यंत, हॉटेल, रेस्टॉरेंट यांना गॅस टंचाईचा फटका बसला आहे. यातून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा काळा बाजार वाढला आहे. दीड हजाराचा सिलिडर थेट ५००० रुपयांवर गेला आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरची बुकिंग करून देखील, सिलिंडर वेळेपर्यंत नसल्याच्या तक्रारी आहेत. याचाच फायदा काळा बाजारात घेतला जात असून, वेळेवर, लगेच सिलिंडर हवा असल्यास ५००० रुपये घेतले जात आहेत. हा प्रकार म्हणजे, 'चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला', असं झालं आहे. त्यामुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनी थेट चुली मांडायला सुरवात केली आहे.

गॅस टंचाईच्या काळात अवैध रिफिलिंगचे प्रकार वाढले आहे. गॅस पुरवठा करणा-या टँकरमधूनच थेट गॅस काढला जात असल्याच्या प्रकार अहिल्यानगर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. गॅसने भरलेले तीन टँकर, चार आरोपीसंह सुमारे २ कोटी १ लाख ९ हजार ६२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती, स्थानिक गुन्हे शाखे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दिली.

**चौघांविरोधात गुन्हा**-पुणे ते अहिल्यानगर रोडवर कामरगांव शिवार (ता. नगर) इथं तीन गॅस टँकरमधून अवैधरित्या व्यावसायिक गॅस टाक्या भरताना स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी कारवाई केली. सचिन आबा बोधले (वय ३१, रा. दहिवडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव), माणिक बालाजी गुट्टे (वय ३२, रा. दैठणे ता. परळी, जि. बीड), उल्हास जिवन कवडे (वय ३२, रा. कन्हेरवाडी, ता. कळंब जि. धाराशिव) आणि अमृत बाळासाहेब ठोकळ (वय ३३, रा. कामरगांव, ता. नगर) या चौघांना अटक करण्यात आली आहे.

# जेव्हा तुम्ही भाजपमध्ये मंत्री असाल तेव्हा इथे या

## खरात-बच्चू कडूंचा व्हीडीओ व्हायरल

**नाशिक / प्रतिनिधी-**प्रहार पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू यांचा एक व्हीडीओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये अशोक खरात कडू यांना जेव्हा तुम्ही भाजपमध्ये मंत्री असाल तेव्हा इथे या असा सल्ला देताना दिसत आहे. व्हीडीओत खरात बच्चू कडू यांना नारळ आणि शाल देखील देत आहे. शिवाय बच्चू कडू खरातच्या पाया पडल्याचेही दिसत आहे. त्यामुळे आता कडू यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी दररोज नवे आणि धक्कादायक खुलासे होत आहेत. या भोंदूबाबाच्या दरबारात राज्यातील बड्या नेत्यांनी रांगा लावल्याचे फोटो आणि व्हीडीओ आता समोर येत आहेत. याच फोटो आणि व्हीडीओमुळे राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.खरात लोकांना कसं फसवायचा आणि त्यांच्याकडून कोट्यवधी रुपये कमवायचा हे समोर येत आहे. कधी चिंचोके तर कधी मधाच्या नावाखाली त्याने आपल्या भक्तांची फसवणूक केल्याचे आता उघड झाले आहे.मात्र, हळूहळू या बाबाच्या दर्शनाला गेलेल्या आणखी काही बड्या नेत्यांचे फोटो आणि व्हीडीओ समोर येत आहेत.



दरम्यान, पोलिसांच्या तपासात अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. ज्यामध्ये खरातने सिन्नरच्या मिरगाव येथे दरबार सुरू केला होता. ज्यामध्ये तो ज्योतिष, अंकशास्त्र, पूजाविधीच्या नावाखाली लोकांच्या समस्या सोडवण्याचा दावा करत त्यांची आर्थिक फसवणूक करत होता. शिवाय विविध बहाण्यांनी महिलांना एकटे बोलावून त्यांचे लैंगिक शोषण केले जात असल्याचे समोर येत आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# युध्दाचा प्रभाव

कोणत्याही युद्धाचे दोन प्रकारचे परिणाम संभवतात. एक म्हणजे दृश्य आणि दुसरा अदृश्य परिणाम. दृश्य परिणाम आपण रोजच पाहतो आणि तो आहे गॅस टंचाई. लांबचलांब लागलेल्या गॅस सिलिंडरसाठी रांगा, छोट्या तालुक्यापासून ते मोठ्या महानगरापर्यंत हीच परिस्थिती. त्यात इराणने आखाती देशांवर सुरू केलेल्या ड्रोन आणि इतर साधनांद्वारे सुरू केलेल्या हल्ल्यामुळे मनुष्यहानी होते ती निराळीच. पण तो वेगळा भाग झाला. आणखी एक परिणाम या युद्धाचा अत्यंत घातक आहे आणि तो भारताच्या अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे. भारताचे बेंचमार्क निर्देशांक युद्ध सुरू होऊन चौथ्या आठवड्यात ८ टक्क्यांपेक्षा खाली आले. होर्मुझची खाडी मार्ग बंद झाला कारण तो इराणमधून जातो. अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या जहाजांसाठी हा मार्ग पूर्ण बंद आहे. पण भारत इराणचा मित्र देश. मात्र तरीही या मार्गातून होणारी तेल आणि गॅसची वाहतूक भारतासाठी पुरेशी नाही. भारताची ५४ टक्के क्रूड ऑइल आणि ६० टक्के नैसर्गिक वायू यांची वाहतूक याच खाडीमार्गातून होते, तर द्रवरूप पेट्रोलियम वायूची ९० टक्के आयात होर्मुझच्या मार्फत होते. भारताला यामुळेच शुद्ध स्वरूपातील नॅप्था, विमानांना लागणारे टर्बाईन तेल आणि गॅसॉईल यांची कमतरता भासत आहे. याचे परिणाम अन्न उत्पादनावर होत आहेत. त्यामुळे व्यापारी तूट, महागाई, वित्तीय तूट आणि याच्या जोडीला निम्नकरांचे दर यामुळे शेतीवर परिणाम होतो. अर्थात शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतोय. हे एक दुष्टचक्र आहे आणि उच्च ऊर्जेच्या किमतीमुळे खतांच्या किमती वाढत आहेत आणि त्यामुळे अन्नपदार्थांच्या किमती वाढतात आणि चलनाची घसरण होते. ज्याला करन्सी डिप्रिसिएशन म्हणतात. महागाई आणि इंधन टंचाईने मेटाकुटीस आलेली जनता यांच्यासमोर अवघड आव्हान उभे राहील. या युद्धाचा आणखी एक परिणाम समोर येत आहे तो म्हणजे चालू खात्यातील तूट जीडीपीच्या म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या १.९ ते २.२ टक्के आहे. याचा परिणाम भारतात जो १३० अब्ज डॉलरचा रेमिटन्स येतो तो आता येणार नाही, तर संभाव्य व्यापारी अडथळे १५ ते २० बेसिस पॉइंट्सपर्यंत जाईल आणि यामुळे मध्यवर्ती बँकेला वित्तीय अस्थिरता आणि महागाई यांचे व्यवस्थापन करावे लागेल. म्हणजे परिणामी पुन्हा जनतेलाच याचा फटका बसणार. सध्या तेलाचे दर १०० डॉलर बॅरलवर गेलेत. जहाजांचा मार्ग होर्मुझच्यामार्फत बंद झाला. त्यामुळे भारताची व्यापारी तूट अधिक विस्तृत झाली. वाढत्या तेलाच्या किमतीमुळे महागाईचा दबाव अर्थव्यवस्थेवर आल्याने वाहतूक आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमतीत वाढ अपेक्षित आहे. भारताची सहसा ४० टक्के रेमिटन्स आखाती मार्गाद्वारे येतो. पण तो मार्ग बंद झाल्यामुळे भारताच्या १० दशलक्ष लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे त्याचे व्यापक प्रमाणावर विस्थापन होऊ शकते. आखाती संघर्ष आणि संलग्न शिपिंग व्यत्ययामुळे कार्गो हालचालींना उशीर होतो आणि परिणामी मालवाहतुकीच्या खर्चात अतोनात वाढ होते. त्यामुळे निर्यातीचा खर्च वाढून निर्यात कोसळते. असे हे दुष्टचक्र आहे. त्याशिवाय आणखी एक परिणाम म्हणजे चलन अस्थिर होते. भांडवली खर्च वाढल्यामुळे डिप्रिसिएशन म्हणजे चलनाचा घसारा वाढून चलनाचे मूल्य आणखी घसरते. वाढत्या क्रूड तेलाच्या किमतीमुळे त्याचा कॅस्केडिंग इफेक्ट म्हणजे साखळीवर प्रभाव होऊन निर्यात आणि इतर सर्वच घटकावर परिणाम होतो. अनेक ठिकाणी म्हणजे टेक्स्टाईल्स, लेदर आणि ज्वेलरी या क्षेत्रात याचा परिणाम जाणवू लागला. काही आठवड्यांपूर्वी भारताचे आर्थिक चित्र सुखद होते. भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊ घातली होती. भारतीय अर्थव्यवस्था चीनसारख्या बलाढ्य राष्ट्राच्या स्पर्धेत उतरली होती. ब्रिटनला मागे टाकले होते. जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाली होती. लवकरच जपानला मागे टाकून भारत चौथ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था होण्याच्या तयारीत होता. आखाती देशांशी असलेले सौहाद्राचे संबंध एकेकाळी भारतासाठी गर्वाची बाब होती ती आता भारताच्या गळ्यातील फास बनली आहे. आखाती देशांशी असलेल्या संबंधांमुळे भारताला जो लाभ होता तो आता भारतासाठी तोटा ठरू लागला आहे. याचा अर्थ इतकाच की, अमेरिका आणि इराण युद्ध हे भारतासाठी मोठे वादळ ठरू लागले. केवळ गॅस आणि तेलाचीच आयात होर्मुझच्या आखातातून होते असे नाही खतांची आयातही याच मार्गाने होते. शेतकरी संकटात सापडले. परिणामस्वरूप भारताचे सर्वंकष नुकसान झाले. पण पश्चिम आशियातील युद्ध म्हणजे भारतासाठी द एंड नाही. कारण यातूनच भारताला ऊर्जेसाठी संक्रमण शोधता येईल आणि आयात स्त्रोतांमध्ये विविधता आणता येईल. कारण ती भारताची गरज आहे. त्याचबरोबर भारतात एलपीजी टैंकर आणण्यासाठी सुरक्षित मार्ग शोधावा लागेल. हे आव्हान आहे पण ते पार केल्यावरच आपली ताकद जगाला कळून येईल. या युद्धाचा एक चांगला परिणाम असा, की ऊर्जेच्या पेचप्रसंगामुळे भारताला आपली सौर आणि पवन ऊर्जेकडे वळता येईल. त्यामुळे क्रूड तेलावरील आपले अवलंबित्व कमी होईल. तसेच खते, रसायने आणि औषधी यांसाठी बाजारातील अस्थिरता हाताळण्यासाठी अधिक चांगले काम करता येईल. होर्मुझची खाडी चालू ठेवण्यासाठी भारताचे प्रयत्न सुरू आहे. एलपीजी वाहनांना होर्मुझच्या खाडीतून येण्यास इराणने अडसर आणलेला नाही. हे पंतप्रधान मोदी यांचे कर्तृत्व आहे. भारताचे इराणशी असलेले चांगले संबंध अद्यापही तसेच आहेत आणि त्यांना कसलाही अडसर आलेला नाही. या युद्धामुळे कोणताही देश फटका बसल्यावाचून राहणार नाही. १९७० जे ऑइल शॉक्स आणि रशिया-युक्रेन युद्धापेक्षाही भयंकर मोठा परिणाम या युद्धाचा होणार आहे हे आयोगाचे म्हणणे नक्कीच खोटे नाही.

# शेती कर्जमाफीचे दुष्टचक्र

**महाराष्ट्र सरकारने शेतकरी बांधवांसाठी नवीन कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. ३० लाख शेतकऱ्यांचे प्रत्येकी दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करून देणारी ही ताजी योजना आणि यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा आढावा...**

२६-२७च्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी नवीन कर्जमाफी योजना जाहीर केली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज संपूर्णपणे माफ होईल. या योजनेचा लाभ साधारण ३० लाख शेतकऱ्यांना होऊ शकेल. या ३० लाखांपैकी साधारण २० लाख शेतकरी नियमितपणे कर्जफेड करणारे, तर साधारण १० लाख शेतकरी थकबाकीदार आहेत. या योजनेमध्ये सरकारने साधारण ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. इतका मोठा खर्च असूनसुद्धा सरकारची वित्तीय परिस्थिती मजबूत असल्यामुळे सरकारी खजिन्यावर फारसा ताण येणार नाही आणि शेतकरी बांधवांचे हितरक्षण करण्यासाठी सरकार तो ताण सहन करेल. काळजी करण्याचे कारण नाही, असा सरकारचा विश्वास आहे. या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने गेल्या दहा वर्षामध्ये जाहीर केलेल्या एकूण कर्जमाफीयोजनांचा एकत्र आढावा घेणे संयुक्तिक ठरेल.

**शेतकरी कोणास म्हणावे ?**

'शेतकरी' या शब्दाची सरकारी किंवा कायदेशीर व्याख्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये एकच आणि एकजिनसी नाही. तथापि या लेखामध्ये आपण सरकारी व्याख्या थोडी बाजूस ठेवून अर्थशास्त्रीय व्याख्या स्वीकारणार आहोत. कारण अनेक अर्थशास्त्रीय अभ्यास, सर्वेक्षण यामधून अर्थशास्त्रीय व्याख्या स्वीकारलेली असते. त्याप्रमाणे'ज्या व्यक्तीच्या एकूण उत्पन्नापैकी निदान पन्नास टक्के उत्पन्न शेतीतून मिळालेले असेल अशा व्यक्तीलाच शेतकरी म्हणावे.'

**महाराष्ट्रातील एकूण कर्जमाफी योजना**

सन २०२६-२७ची कर्जमाफी योजना जमेस धरून २०१७ ते २०२६ या काळात एकूण पाच कर्जमाफी योजना जाहीर झाल्या आहेत. गेल्या दहा वर्षांतील विविध कर्जमाफी योजनांची वारंवारिता आणि त्यामध्ये खर्च झालेली एकूण रक्कम याचा विचार केला तर महाराष्ट्र राज्य सातत्याने पहिल्या तीन-चार राज्यांमध्ये राहिले आहे. (इतर राज्ये कर्नाटक, तेलंगण, उत्तर प्रदेश) वारंवारितेबाबत मात्र महाराष्ट्राचा गेल्या दहा वर्षामध्ये सातत्याने पहिला क्रमांक आहे. राज्यामध्ये २०१७ मध्ये दोन, २०१९ मध्ये दोन आणि आता २०२६ मध्ये एक अशा कर्जमाफी योजना झाल्या आहेत. या योजनासाठी खर्च झालेल्या एकूण रकमेमध्येसुद्धा महाराष्ट्र आघाडीवर आहे. उपलब्ध आकडेवारीप्रमाणे २०१७मध्ये ३४,००० कोटी, २०१९ मध्ये २२,००० कोटी आणि आता पुन्हा प्रस्तावित योजनेसाठी ३५,००० कोटी अशी एकूण रक्कम खर्च झाली आहे किंवा २०२६-२७ मध्ये व्हावयाची आहे. ही एकूण बेरोज ९१,००० कोटी होते. मात्र यामध्ये अत्यंत समाधानाची गोष्ट अशी की अंमलबजावणीचे प्रमाण मात्र इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रामध्ये अतिशय समाधानकारक राहिलेले आहे. सर्व योजनांचा एकत्रित विचार करता अंमलबजावणीचे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा जास्त राहिले आहे. यामध्ये कोणत्या शेतकऱ्याला दरडोई किती मिळाले असावेत, ह सरकारी आकडेवारी उपलब्ध होत नाही. आपणच थोडी (कंटाळवाणी) आकडेमोड करू. सरकारी मदत बहुतेक वेळा लहान शेतकऱ्यांना दिली जाते. (ज्याचे कसणुकीचे क्षेत्र पाच एकरपेक्षा कमी आहे.) २०२१च्या शेतीच्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्रामध्ये लहान शेतकरी एकूण १ कोटी ७० लाख इतके असून एकूण शेतकऱ्यांमध्ये लहान शेतकऱ्यांचे प्रमाण साधारण ८५ टक्के आहे.

९१ हजार कोटी या संख्येला १ कोटी ७० लाख या संख्येने भागल्यास भागाकार ५३,५२९ येतो. याचा अर्थ सोपा आहे. २०१७ ते २०२७ या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक लहान शेतकऱ्याला कर्जफेडीसाठी सरकारकडून साधारण ५३,००० रुपये मिळाले. दर वर्षी निदान पाच हजार रुपये! याबाबतीत तरी महाराष्ट्रातील लहान शेतकरी इतर राज्यांतील लहान शेतकऱ्यापेक्षा भाग्यवान दिसतो. मात्र हे कागदावरील गणित आहे हे विसरू नये.

**शेती विकास झाला का?**

सरकारच्या कर्जमाफी योजनांसंबंधीच्या माहितीवरून कोणासही असेच वाटेल, की



महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमुक्त होण्याच्या मार्गावर आहे. जे अक्षम आहेत त्यांचे कर्ज सरकार फेडते आणि सक्षम आहेत ते स्वतःच कर्जफेड करत आहेत. एकूण परिस्थिती समाधानकारक आहे. शेती विकासही समाधानकारक असणार. परंतु दुर्दैवाने तसे मुळीच दिसत नाही, याबाबत सर्वांना विषण्ण करणारी गोष्ट म्हणजे आपल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या. दुर्दैवाने महाराष्ट्र जसा कर्जमाफी योजनांमध्ये आघाडीवर आहे तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येसुद्धा. आपण केवळ आघाडीवरच नाही, तर प्रथम क्रमांकावर आहोत. २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात ४,१५१ (प्रथम), कर्नाटक २.४२३ (दुसरा).

आपण दुसऱ्या नंबराच्या दुप्पट आहोत. (२०२३ मध्ये गुजरात मात्र ५६४ आत्महत्या.) आपल्या राज्यातील बहुतेक शेतकरी आत्महत्या विदर्भातील कापूस उत्पादकांच्या आहेत. कर्जाचे (जड झाले) ओझे हे मुख्य कारण आहे.

दूसरे असे की औद्योगिकीकरण, आर्थिक विकास, परदेशी गुंतवणूक यामध्ये महाराष्ट्र (मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक) अव्वल असला तरी शेती - विकासाबाबत तसे म्हणता येत नाही. कारण गेल्या दहा वर्षात शेती विकासाचा वार्षिक सरासरी दर महाराष्ट्रामध्ये साडेतीन ते साडेचार टक्के एवढाच राहिला आहे. (याच काळात गुजरातमध्ये मात्र शेती विकास दर साधारण सहा टक्के राहिला आहे.) त्याचप्रमाणे उद्योगधंदे प्रगत असूनसुद्धा शेतीवरील कामगारांचे प्रमाण (भाऊगर्दी) लक्षणीयरीत्या कमी करणे आपल्याला जमलेले नाही. आजसुद्धा साधारण ५५ टक्के कामगार शेतीवर अवलंबून आहेत. महाराष्ट्राचा शेती विकास तसा वाईट कमी नाही. परंतु एका बाजूस विकास आणि दुसऱ्या बाजूस आत्महत्या हा विरोधाभास लक्षात घेतल्यावर जो विकास झाला तो शेतकऱ्यामधील आर्थिक विषमता वाढविणारा झाला असावा, या विचाराला पुष्टी मिळते. त्यामुळे कर्जमाफीमध्ये उदार हस्ते मदत केल्यानंतरसुद्धा कर्जमुक्ती आणि समतापूर्ण शेती विकास साधण्यासाठी त्याचा विशेष उपयोग झाला नसावा, विशेषतः इतर काही राज्यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये एकसुद्धा कर्जमाफी न देता उत्कृष्ट शेती विकास साधला आहे हे लक्षात घेतल्यावर आपले दुःख अधिकच बोचते.

**असे का झाले?**

शेतकऱ्याला विशेषतः लहान शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वकष शेती विकासाची गरज आहे. शेती विकासासाठी शेतीमध्ये भरघोस गुंतवणुकीची गरज आहे. येथेच आपण कमी पडलो आहोत. महाराष्ट्रात शेती विकासासंबंधीची गुंतवणूक विशेषतः सरकारी गुंतवणूक कमी पडते, असे तज्ञांचे निरीक्षण आहे. उदाहरणार्थ, दीर्घ मुदतीचे सिंचन, वीज निर्माण इ. पायाभूत सोयीसाठी गुंतवणूक करण्याऐवजी महाराष्ट्राने शेतीवरील अनुदाने देणे, कर्जमाफी जाहीर करणे, मोफत वीजपुरवठा इ. अल्प मुदत योजनांवर भर दिला. आजमितीससुद्धा महाराष्ट्राचे सिंचन प्रमाण साधारण १८ ते २० टक्के असून ते गुजरात (४५ टक्के), मध्य प्रदेश (साधारण ४३ टक्के), कर्नाटकपेक्षा (साधारण ३० टक्के) कमी आहे. धरणांची संख्या महाराष्ट्रात देशामध्ये सर्वाधिक असूनसुद्धा महाराष्ट्राची शेती पावसावरच अवलंबून आहे. शेती मागासलेली राहते, शेतकरी अक्षमच राहतो आणि पुन्हा पुन्हा कर्जफेडीच्या योजना येतात. भविष्यात हे सर्व बंद निदान कमी करण्यासाठी शेतीमध्ये अधिक गुंतवणूक, पायाभूत सोयी निर्मिती आणि कर्जमाफीऐवजी व्याजमाफी, कर्ज मुदत वाढवणे, शून्य व्याजाने कर्ज देणे इत्यादी उपायांचा विचार करावा, असे सुचविल्यास चुकीचे होणार नाही असे वाटते.(साभार-म.टा)

**डॉ. अनिल पडोशी**
(लेखक गोवा राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)

## अश्लीलतेचा प्रसार आणि कर्म-फळाचे वास्तव!

'ओनली फॅन्स' या महिलांचे अश्लील कंटेन्ट विकणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मचा मालक Leonid Radvinsky याचे वयाच्या ४३ व्या वर्षी कॅन्सरने निधन झाले. जगाभ रातील अनेक महिला पैसे कमावण्याचे सोपे माध्यम म्हणून सगळी नीतिमत्ता गुंडाळून या प्लॅटफॉर्मवर आपले अश्लील फोटो आणि व्हिडिओ प्रसारित करतात, आणि लोक पैसे देऊन हा कंटेंट पाहतात. आकर्षण, कुतूहल आणि सहज उपलब्धता यामुळे हा प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढत गेला.

या सगळ्यामुळे जगभरातील, विशेषतः तरुण पिढीवर खोल परिणाम झाला. नातेसंबंधांविषयी चुकीच्या अपेक्षा निर्माण होणे, स्त्रीकडे पाहण्याचा उथळ दृष्टीकोन तयार होणे, मानवी मानसिकतेत बदल होवून या अश्लीललतेचे व्यसन लागणे आणि नैतिक मूल्यांवर परिणाम होणे हे त्याचे काही गंभीर दुष्परिणाम आहेत. भारतीय तत्त्वज्ञानानुसार 'जसे कर्म तसे फळ' हा अटळ नियम आहे. त्यामुळे कोणताही मार्ग निवडताना त्याचे दीर्घकालीन नैतिक आणि सामाजिक परिणाम लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ पैसा आणि प्रसिद्धी यासाठी समाजाच्या मूल्यांशी तडजोड करणे शेवटी नुकसानकारक ठरू शकते.

अश्लीलता पसरवणाऱ्या महिला आणि त्याला प्रोत्साहन देणारा समाज या दोन्ही घटकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की खरे समाधान आणि यश हे नैतिकतेच्या मार्गानेच मिळते. कर्माचे फळ अटळ आहे आणि ते प्रत्येकाला भोगावेच लागते. प्रत्येक वेळी वाईट कर्मासाठी पुनर्जन्म घ्यावा लागेल असे नाही; काही कर्मांची फळे याच जन्मात भोगावी लागतात हे Leonid Radvinsky यांच्या उदाहरणावरून लक्षात येते.

**अनिकेत शेटे**

## शिक्षणासाठी गड्या आपला देशच बरा!

अलीकडेच शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने घट होत असून केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अहवालानुसार गेल्या दोन वर्षांत ही संख्या ३१ टक्क्यांनी घटली आहे. या अहवालानुसार २०२३ मध्ये ९.०८ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशात गेले होते, मात्र ही संख्या २०२४ मध्ये ७.७ लाखांवर आणि त्यानंतर २०२५ मध्ये ६.२६ लाखांपर्यंत खाली आली आहे. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड किंगडमसारख्या देशांमधील अनिश्चित बनलेली व्हिसा धोरणे, राहणीमानाचा वाढता खर्च आणि नोकरीच्या कमी संधी अशा अशाश्वत कारणांमुळे शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचा ओघ कमी होत आहे. दुसरीकडे परदेशी विद्यापीठांची भारतात प्रस्तावित असलेली केंद्रे, देशांतर्गत उच्च शिक्षणाचे वाढते पर्याय, भारतीय विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता आणि क्षमता वाढत असल्यामुळे सुधारत असलेली जागतिक क्रमवारी यामुळेही शिक्षणासाठी परदेशात जाण्याचे आकर्षण कमी होत आहे. त्यामुळे 'शिक्षणासाठी गड्या आपला देशच बरा!' असे म्हणायची वेळ आली आहे.

**प्रदीप मोरे**

## सावधान हवामानातील धग?

यंदा कधी नव्हे ते उन्हाळ्यातील तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत त्यामुळे सूर्यदेव कोपले आहेत की काय ? असा देखिल सवाल उपस्थित होतो आहे. होळी सणानंतर देशाच्या बहुतांश भागात हवामानातील बदल होवून उष्णतेचे प्रमाण वाढले आहे सकाळी दहा नंतर उष्णतेचा पारा वाढत असून वयोवृद्धांपासून ते लहान बालकांपर्यंत अनेकांना याचा धक्का बसतो आहे. घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. पुढील काही दिवस तापमानाचा पारा असाच चढे राहिले असे हवामान खात्याकडून वर्तविण्यात आल्याने अनेकजण याची धास्ती घेतली आहे. गेल्या काही दिवसांत देशाच्या विविध भागात उष्माघाताचे बळी पडले असल्याचे समोर आले आहे. काही भागात वळीव पावसाने झोडपले असले तरी अजूनही उष्णतेची धग टिकून आहे. गेल्या काही दिवसांपासून रोज एक हवामान अंदाज वर्तवला जात आहे.

हवामान तज्ञ आपापल्या माहितीप्रमाणे हवामानाचा अंदाज वर्तवत असले तरी योग्य आणि अचूक अशी हवामानाची माहिती कोणालाच काही सांगता येईना असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. सद्याचा हवामानातील बदल आगामी काळात देखील गेम चेंजर ठरु शकतो. त्यामुळे भारत सरकारने हवामान बदलाच्या मुळाशी जाऊन ठोस निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

**राजू जाधव**

## हरवलेली शांती आणि संतांचा विचार

आज राज्यात एका भोंदू बाबावरून हल्लकल्लोळ सुरू आहे. भोंदू बाबा पूर्वीही समाजात होते आणि आजही आहेत, त्यामुळे यात विशेष फारसे काही नाही. पण अलीकडे त्यांचे प्रमाण वाढले आहे असे वाटते. कारण आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने भौतिक प्रगतीची शिखरे पादाक्रांत केली आहेत.

आज पैसा आहे, सत्ता आहे आणि अद्ययावत सोयी-सुविधाही आहेत. मात्र, या चकाकीच्या मागे एक दाहक वास्तव दडलेले आहे. ते म्हणजे समाजातील वाढती मानसिक अस्वस्थता. आश्चर्य याचे वाटते की, उच्चशिक्षित नोकरशहा, बलाढ्य राजकारणी आणि सत्ताधीश यांच्या हातांत आज विविध राशींच्या अंगठ्या, गंडेदोरे आणि मनगटावर अनेक प्रकारचे धागे दिसू लागले आहेत. हे सर्व नेमके कशाचे द्योतक आहे? राजकारणात आणि कॉर्पोरेट जगात आज 'गळेकापू' स्पर्धा आहे. 'आजचा राजा उद्याचा रंक' अशी परिस्थिती असल्याने भविष्यातील अनिश्चितता माणसाला सतत सतावत असते. जेव्हा माणसाचा स्वतःच्या कर्तृत्वावरचा विश्वास डळमळीत होतो, तेव्हा तो 'अदृश्य' शक्तींचा आधार शोधू लागतो. हातातील त्या अंगठ्या प्रत्यक्षात त्या व्यक्तीच्या मनातील तीव्र भीतीचे दर्शन घडवतात. कौटुंबिक कलह असो वा व्यावसायिक अपयश, ते सोडवण्यासाठी संयम, संवाद आणि प्रयत्नांची गरज असते. मात्र, मानवी स्वभाव अनेकदा कष्टापेक्षा 'शॉर्टकट' शोधतो. 'माझ्या आयुष्यातील समस्या माझ्या चुकांमुळे नसून ग्रहांच्या फेऱ्यामुळे आहेत,' असे मानल्याने स्वतःची जबाबदारी झटकणे सोपे जाते. यामुळे विवेकाऐवजी नशिबावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढते.

या अंधकारमय परिस्थितीत संत गाडगे महाराज यांचे कार्य दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरते.

बाबांनी आयुष्यभर आपल्या कृतीतून 'बुवाबाजी' आणि अंधश्रद्धेविरुद्ध लढा दिला.

आज राजकीय नेत्यांच्या हातात दिसणाऱ्या विविध राशींच्या अंगठ्या किंवा बुवाबाजीचे फॅड हे समाजातील बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण आहे. जोपर्यंत माणूस विवेकाची कास धरत नाही आणि सुखाची व्याख्या केवळ 'पैसा' न ठेवता 'समाधान' अशी करत नाही, तोपर्यंत ही अस्वस्थता अशीच वाढत राहील.

**अविनाश देशपांडे**

## ऑनलाइन गेमिंगच्या विळख्यात

अलीकडेच उत्तर प्रदेशातील गाजियाबाद शहरात घडलेल्या तीन बहिणींच्या आत्महत्येच्या प्रकरणावरून देशभरात खळबळ उडाली होती. या तिघी बहिणींना ऑनलाइन गेमिंगचे व्यसन जडले होते. त्यातही कोरियन लव्ह गेमिंगच्या त्या अतिआहारी गेल्याचे सिद्ध झाले आहे. कोरियन गेमचा नाद लागल्यापासून या मुलींनी शाळेमध्ये पाऊलदेखील टाकले नव्हते. आमचे लग्न कुठल्याही भारतीय मुलाशी होणे शक्य नसून आम्हाला कोरियनच आवडतात, असा स्पष्ट उल्लेख डायरीत असल्याचे पोलीस सांगत आहेत. सध्या या प्रकरणाच्या सर्व पैलूंचा बारकाईने अभ्यास सुरु असल्याचा खुलासा पोलीस प्रशासनाकडून होत आहे. गाजियाबादमध्ये घडलेल्या या ताज्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अलीकडेच केंद्र सरकारकडून ऑनलाइन गेमिंगच्या सापळ्यात अडकत चाललेल्या तरुण पिढीवर निर्बंध लादण्याचा विचार किती महत्वाचा आहे.

हे लक्षात घ्यायला पाहिजे. आधुनिक साधनांच्या वापराच्या आहारी जाऊन तरुण पिढी स्वतःला उध्वस्त करत चालली आहे.

मोबाइलवर रील्स करणे किंवा जीवघेण्या गेमिंगच्या प्रकारात अडकत जाणे अशी व्यसने अतिशय घातकच असतात. मुलांच्या मानसिक स्वास्थ्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. हेच यातून स्पष्ट होते.

**प्रा. मधुकर चुटे**

## भोंदूबाबा; पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली कीड

'कॅप्टन' म्हणवून घेणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात या वासनांधांचे विविध लीलांचे तपशील बाहेर येत असल्याने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणाशी संबंधित ५८ व्हिडिओ बाहेर पडल्याने आणि जवळपास १०० हून अधिक व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्याने या प्रकरणातील संवेदनशीलता आणि व्याप्ती खूप वाढलेली बघायला मिळत आहे. सामाजिक, राजकीय, प्रशासकीय अशा उच्चभ्रू क्षेत्रातील लोक या भोंदूबाबाचे भक्त असून या भोंदूबाबामुळे त्याच्या भोंदू भक्तांचेही धाबे दणाणले आहेत. या भोंदूबाबच्या चौकशीतून आखणी धक्कादायक गोष्टी समोर येतील ज्याने महाराष्ट्रात आणखी खळबळ माजेल अनेकांचे बुरखे फाटले जातील. या भोंदूबाबावर कठोरात कठोर कारवाई व्हायलाच हवी पण केवळ त्याच्यावरच नव्हे तर त्याच्या भक्तांवर देखील कारवाई व्हायला हवी कारण यांच्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय अवस्थेचे लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत.

या भोंदूबाबा आणि त्याच्या अंधभक्तांमुळे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात अशाप्रकारे भोंदूबाबांचे पेव फुटणे ही एकप्रकारे पुरोगामी महाराष्ट्राची अधोगतीच आहे. भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने समाजातील विवेक, विज्ञाननिष्ठा आणि कायद्याचा वचक पार धुळीस मिसळलेला बघायला मिळत आहे. अर्थात याला आपले राजकीय नेतेही तितकेच जबाबदार आहेत.

संविधानाची शपथ घेऊन आमदार, खासदार, मंत्री बनणारे आमचे नेते अशा भोंदूबाबांच्या कच्छपी लागत असेल तर या भोंदूबाबांवर कायद्याचा वचक कसा राहील? ज्या नेत्यांनी समाजासमोर आपल्या वर्तणुकीतून आदर्श निर्माण करायचा असतो तेच नेते तर जर अशा भोंदूबाबांचे पाय धुवत असतील तर भोंदूबाबांना कायद्याचा धाक कसा राहील ? जादूटोणाविरोधी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

या कायद्यासाठी डॉ नरेंद्र दाभोळकर यांनी हौतात्म्य पत्करले. आजची परिस्थिती पाहिली तर डॉ नरेंद्र दाभोळकर यांचे हौतात्म्य वाया गेले की काय ? लोकांच्या श्रद्धेचा (अंध) बाजार मांडून अशोक खरात सारखे भोंदू बाबा कॅप्टन फाईल बनवतात. अर्थात अशी फाईल असलेला अशोक खरात हा एकमेव भोंदूबाबा नाही. भोंदूबाबा म्हणजे पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली कीड आहे ही कीड मुळापासून उपटून टाकायलाच हवी.

**श्याम ठाणेदार**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान'

## उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी मानले आभार



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मरणार्थ राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबविण्याचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय जाहीर केला आहे. या अभियानांतर्गत वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान व नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींना प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयाबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

या अभियानाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यातील 'अ' वर्गातील यवतमाळ, 'ब' दिग्रस, पुसद, उमरखेड, वणी, 'क' वर्गातील घाटंजी, आर्णी, दारव्हा, नेर, पांढरकवडा या नगरपरिषदा व राळेगांव, कळंब, महागांव, मारेगांव, बाभुळगांव, झरी जामणी आणि ढाणकी या नगरपंचायत क्षेत्रातील मराठी शाळांची दर्जोन्नती, आरोग्य सुविधा, पर्यावरण व स्वच्छता तसेच पर्यटन विकासाला चालना देण्यास मदत होणार आहे.

निधीची तरतूद : राज्यातील महानगरपालिकांना प्रत्येकी 5 कोटी निधी देण्यात येणार असून नगरपरिषद व नगरपंचायतींना प्रत्येकी ₹ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी विविध नागरी विकास कामांसाठी वापरण्यात येणार आहे.

निधी वापराबाबत मार्गदर्शक तत्त्वे : अभियानांतर्गत किमान 50 टक्के निधी मराठी शाळांच्या दर्जोन्नतीसाठी खर्च करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उर्वरित निधी आरोग्य सुविधा (आरोग्य केंद्र, साहित्य, महिलांसाठी सॅनिटरी पॅड मशीन), पर्यावरण व स्वच्छता तसेच पर्यटन विकासासाठी वापरण्यात येणार आहे. ज्या नगरपरिषद किंवा नगरपंचायतींमध्ये शाळा नाहीत, त्यांनी 50 टक्के निधी आरोग्य सुविधांसाठी वापरणे बंधनकारक राहणार आहे.

अभियानाचा कालावधी व स्पर्धा : या अभियानाचा प्रारंभिक कालावधी एक वर्षाचा असून कामगिरीच्या आधारे तो वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. तसेच महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये विकास कामांवर आधारित स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

पारितोषिके : या स्पर्धांमधील विजेत्यांना महानगरपालिका स्तरावर प्रथम 10 कोटी, द्वितीय 7 कोटी व तृतीय 5 कोटी अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. तर नगरपरिषद व नगरपंचायत स्तरावर प्रथम 5 कोटी, द्वितीय 3 कोटी व तृतीय 2 कोटी अशी पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

उद्दिष्ट : या अभियानाचा मुख्य उद्देश नागरी भागात मूलभूत सुविधा मजबूत करणे, मराठी शाळांची गुणवत्ता वाढवणे, महिलांच्या आरोग्यासाठी सुविधा उपलब्ध करणे तसेच पर्यावरणपूरक आणि आत्मनिर्भर शहरे विकसित करणे हा आहे. या निधीमुळे यवतमाळ जिल्ह्यातील नागरी भागांच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळण्यास मदत होणार आहे.

"हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिक बळ मिळणार आहे. या निधीमुळे नागरी भागातील मराठी शाळांचा विकास, आरोग्य सुविधांची उपलब्धता, पर्यावरण संरक्षण व स्वच्छता आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. यासाठी मी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानतो." **– पा. ना. संजय राठोड**

# नेर हादरले ! किरकोळ वादातून दिवसाढवळ्या पान सेंटर चालकाची हत्या

## भरदिवसा चाकूचे ५-६ वार, कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

जनमाध्यम प्रतिनिधी

नेर - नेर शहरात आज दुपारी घडलेल्या थरारक हत्याकांडाने संपूर्ण परिसर दहशतीत ढकलला आहे. क्षुल्लक कारणावरून पेटलेल्या वादाने थेट जीवघेणा वळण घेत, 'अलीशान पान सेंटर अँड कोल्ड्रिंक'चे संचालक, ३७ वर्षीय शाहेबाज खान तसदीक खान पठाण यांची भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आली. इलीगंट इंग्लिश मीडियम शाळेजवळ आरोपींनी त्यांच्यावर चाकूने पाच ते सहा वेळा सपासप वार करत रक्ताच्या थारोळ्यात लोळवले.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास शाहेबाज खान यांचा परिसरातील काही तरुणांशी किरकोळ वाद झाला होता. तो वाद मिटल्याचे भासवत आरोपींनी सूडाची ठिणगी मनातच जपली आणि दुपारी संधी साधत अचानक हल्ला चढवला. हा हल्ला इतका वेगवान आणि क्रूर होता की, स्वतःचा बचाव करण्याची संधीही शाहेबाज यांना मिळाली नाही.घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने मदत करत त्यांना ग्रामीण रुग्णालयात हलवले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेने पठाण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शहरात संतापाची लाट उसळली आहे. भरदिवसा अशी निर्भीड हत्या होणे, ही कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.



मृतक शाहेबाज यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई-वडील व तीन भाऊ असा मोठा परिवार आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच नेर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, पोलीस निरीक्षक अनिल बेहरानी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. या घटनेतील आरोपींची ओळख पटवून त्यांना तात्काळ अटक करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. नेर शहरात सध्या तणावपूर्ण शांतता असून, पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# • वेचक

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समिती तर्फे डॉ. देवेंद्र पुनसे यांचा गौरव



यवतमाळ - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित दुसऱ्या पर्वातील त्रेचाळीसावे पूजन रविवारी दि.२२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता डॉ. देवेंद्र पुनसे व प्रा.पद्यजा पुनसे यांच्या शुभहस्ते यवतमाळ येथील म. फुले चौक,आझाद मैदान समोर उत्साहात पार पडले. यावेळी नुकत्याच झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत समाजातील एकमेव व्यक्तिमत्व म्हणून निवडून आल्याबद्दल डॉ.देवेंद्र पुनसे यांचा सहपत्नीक समितीतर्फे विशेष गौरव करण्यात आला.त्यासोबतच आशाताई राऊत यांचा कविता संग्रह प्रकाशित झाल्याबद्दल गौरव करण्यात आला, या कार्यक्रमास पवन थोटे, सुरेश भावेकर, लतिका शेळके, श्रेया शिंदे, माला पुनसे, उषा मुंदाने, राजेश गायनर विजय शिंदे, सुनील सोडगीर, प्रदीप पुनसे, बलदेव गायनर, किशोर शेळके, अंकुश गलाट, डॉ. श्याम गोरडे, डॉ. अशोक पुनसे, डॉ. राजीव मुंदाने, ज्ञानेश्वर करडे, रमेश उघडे आदी समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यवतमाळात कायदा सुव्यवस्थेवर आयजींचा धडक आढावा!

यवतमाळ - जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकले यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट देत कायदा व सुव्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. यावेळी आयोजित विशेष गुन्हेगारी बैठकीत त्यांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांना कठोर व स्पष्ट सूचना दिल्या. बैठकीदरम्यान अलीकडील चोरी, दरोडे, खून यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचे विश्लेषण करण्यात आले. गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी गस्त वाढवणे, संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे तसेच गुन्हेगारांविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश आयजी पोकले यांनी दिले. यासोबतच प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करून तपास कार्यात गती आणण्यावर त्यांनी विशेष भर दिला. या बैठकीला पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक ठाण्याच्या कामगिरीचा आढावा घेत जबाबदाऱ्या अधिक जबाबदारीने पार पाडण्याचे निर्देश देण्यात आले.दरम्यान, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लोहारा पोलीस ठाण्याचे स्टेशन हाऊस ऑफिसर रोहित चौधरी यांच्यासह १० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशंसापत्र देऊन सन्मान करण्यात आला. आय.जी पोकले यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत इतरांनीही त्यांच्याप्रमाणे कर्तव्यनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. आयजींच्या मार्गदर्शनानुसार काम करत जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याचा निर्धार पोलीस प्रशासनाने व्यक्त केला.

# सवना काळी (दौ), गुंज, एजी फिटरवरील सिंगल फेज तात्काळ सुरू करा





जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - तालुक्यातील गुंज या ठिकाणी असलेले ३३ केव्ही उपकेंद्रामधून शेतकऱ्यांसाठी मिळणारा सवना काळी गुंज या एजी फिटरवरील सिंगल फेज मागील पंधरा दिवसापासून बंद करण्यात आलेला आहे खडका या ठिकाणी उभारण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पामधून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु सदर सौर ऊर्जा प्रकल्पातून मिळणारा वीज पुरवठा सुद्धा सुरळीत चालत नाही ब्रेक डाऊन च्या नावाखाली तासंतास वीज पुरवठा बंद ठेवण्यात येतो शेतकऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पाची वीज मिळत असल्याने एजी वरील सिंगल फेज बंद करण्यात आला अशी माहिती वीज वितरण कंपनीकडून देण्यात येत आहे.

सौर ऊर्जा प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांना मिळणारी हक्काची वीज सुद्धा बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यावर प्रचंड अन्याय होत आहे शेत शिवारात जागलीसाठी रात्र काढणाऱ्या शेतकऱ्यांना जंगली हिंसक प्राण्यांचा सामना सतत करावा लागतो आहे तसेच परिसरात बिबट या हिंसक प्राण्यांचा वावर असल्याने शेतकऱ्यावरती अनेक वेळा हल्ला झाल्याच्या घटना परिसरात घडत आहे शेतामध्ये अनेक शेतकऱ्यांचे पाळीव जनावरांसाठी गोठे आहेत आतापर्यंत सिंगल फेज ची लाईन सुरळीत मिळत होती परंतु मागील दहा दिवसापासून ए जी फिटर वरील सिंगल फेज बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना हा त्रास सहन करावा लागत आहे आमच्या हक्काची विज भांडवलदार उद्योगपत्यांना पुरवल्या जात आहे शेती सुद्धा एक उद्योग आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्काची विज शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे शेतकऱ्यावर वीज वितरण कंपनीकडून होणारा अन्याय आम्ही सहन करणार नाही सवना काळी(दौ) गुंज ए जी फिटरवरील बंद केलेला सिंगल फेज तात्काळ सुरू करण्यात यावा सिंगल फेज सुरू करण्यात आला नाही तर शेतकऱ्यांच्या वतीने राज्य सरकार आणि वीज वितरण कंपनीच्या विरोधात राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन महागाव तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव शेतकरी नेते पंजाबराव खडकेकर भिमराव गोरे गजानन पायघन मदन जाधव प्रमोद पवार सचिन गोरे नितीन चिपडे बाळू राठोड लक्ष्मण गोरे लक्ष्मण गोरे शिवाजी लाहबर गुलाब मते नागेश दळवे सेवादास जाधव गोलू गोरे समर्थ पुंड शुभम पायघन श्रिकांत लहाबर आंनता शिंदे आदी शेतकरी उपस्थित होते.

राष्ट्रीय किसान मोर्चाने दिला आंदोलनाचा इशारा

# कॅप्टन खरात प्रकरणावर यवतमाळात जनआक्रोश !

## आमदार मंगुळकरांच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - अशोक उर्फ कॅप्टन खरात प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने संविधान चौक येथे जोरदार जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ पार पडलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले.

हे आंदोलन यवतमाळचे आमदार बाळासाहेब मंगुळकर यांच्या नेतृत्वात पार पडले. आंदोलकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी करत प्रकरणातील आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात कॅप्टन खरातविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करून जलदगती न्यायालयात खटला चालवावा, तसेच प्रकरणातील सर्व संबंधितांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. माजी महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचीही सहआरोपी म्हणून चौकशी करून आवश्यक असल्यास अटक करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.याशिवाय, पीडित महिलांना तात्काळ संरक्षण देऊन न्याय मिळवून देण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित करावी, तसेच प्रकरणातील अधिकारी, मध्यस्थ व प्रभावशाली व्यक्तींचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात शहर काँग्रेस पदाधिकारी, युवक काँग्रेस कार्यकर्ते, नगरसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोरदारपणे करण्यात आली.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर

## जि.प. शाळांच्या ४७ विद्यार्थ्यांची निवड

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ, : घाटंजी तालुक्यातील बेलोरा येथील जवाहर नवोदय विद्यालयासाठी इयत्ता ६ वी प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यंदाही जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. जिल्ह्यातून एकूण 80 विद्यार्थ्यांची निवड झाली असून, त्यापैकी तब्बल 47 विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळांमधील आहेत.

ही प्रवेश परीक्षा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) तर्फे 13 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल 17 मार्च 2026 रोजी जाहीर करण्यात आला. यंदाच्या निकालात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विशेष चमक दाखवत 93.75 टक्के यश मिळवले आहे, तर शहरी भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण केवळ 6.25 टक्के इतके राहिले आहे..

गतवर्षीच्या तुलनेत यंदा जिल्हा परिषद शाळांमधील निवडीत लक्षणीय वाढ झाली आहे. 2025-26 मध्ये 38 विद्यार्थी निवडले गेले होते, तर यंदा ही संख्या 47 वर पोहोचली आहे. याउलट खासगी शाळांमधील निवड 38 वरून 24 पर्यंत घसरली आहे.

इतर शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या 4 वरून 9 इतकी वाढली आहे.नवोदय विद्यालय समितीच्या निर्देशानुसार, निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेश प्रक्रियेबाबत लवकरच कळविण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य के. डी. धोपटे यांनी दिली.

"जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील 47 विद्यार्थ्यांची निवड ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी 93.75 टक्के यश मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा पाठिंबा यामुळे हा यशस्वी परिणाम साध्य झाला आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा." **– जिल्हाधिकारी विकास मीना**

# आ. तोडसाम यांच्याहस्ते कुणबी समाज सेवा संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन



जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - केळापूर तालुक्यातील तिरळे कुणबी समाज सेवा संघ (र.न. 143/F17099) कार्यालयाचा उद्घाटन सोहळा रविवारी (दि. 22 मार्च 2026) सकाळी 11 वाजता डीपी रोड, ग्रीन पार्क येथे उत्साहात पार पडला. आर्णी-केळापूर मतदारसंघाचे आमदार राजूभाऊ तोडसाम यांच्या शुभहस्ते हा सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष शंकर बडे विराजमान होते. विशेष अतिथी म्हणून प्राचार्य देविदास गायकवाड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक गोडे सर, विजय बोंद्रे, गणेश बुटे, नगरसेवक मंगेश वातीले, श्रीकृष्ण चरडे, विठ्ठलराव राऊत, विलास राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य देविदास गायकवाड यांनी कुणबी समाजाच्या विकासासाठी भेदभाव बाजूला ठेवून एकोप्याने काम करण्याची गरज अधोरेखित केली. अध्यक्षीय भाषणात शंकर बडे यांनी समाजासाठी जागेची पर्यायी व्यवस्था करून देण्यासाठी शासन स्तरावर सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. उद्घाटक आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी आपल्या भाषणात कुणबी समाज सेवा संघाच्या जनजागृती कार्याचे कौतुक करत, समाजभवनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी समाज सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष दिवाकर चौधरी यांनी समाजसेवेसाठी कटिबद्ध राहण्याचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला महिला व पुरुष समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यानिमित्त प्रस्ताविक संघाचे अध्यक्ष दिवाकर चौधरी यांनी विविध विषयांवर प्रकाश टाकत सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन आशुतोष चौधरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुधाकर गोडे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल ताडे, शशिकांत मुंगल, अरुणभाऊ जळके तसेच इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/१८८/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०९/०२/२०२६

जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख मुसा सदाम शेख चाँद रा. उमरखेड यांनी त्यांचे स्व:ताचे नामे शेख मुसा सदाम शेख चाँद मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** १०.०९.१९९७ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २८/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# स्मार्ट कार्डसाठी पुसद बसस्थानकावर नागरीकांची गर्दीच गर्दी

## ज्येष्ठ महिला व पुरुषांचे भर उन्हात बेहाल



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) सवलत योजनांचा लाभघेण्यासाठी आवश्यक असलेले स्मार्ट कार्ड काढण्यासाठी पुसद बसस्थानकावर सकाळ पासून ते सायंकाळ पर्यंत लाभार्थ्यांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यातच प्रशासनाने एकच मशीन ठेवल्यामुळे गर्दी वाढत आहे यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची संख्या मोठी असून, नियोजनाच्या अभावामुळे कडाक्याच्या उन्हात या प्रवाशांना तासन् तास ताटकळत उभे राहावे लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शासनाने महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवासाची सुविधा दिल्याने स्मार्ट कार्डची मागणी प्रचंड वाढली आहे. एसटी महामंडळाने डिजिटल व्यवहाराला चालना देण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे या कार्डसाठी १९९/ रुपये घेतल्या जात आहेत मात्र,पुसद आगारात कार्ड नोंदणीसाठी असलेल्या मर्यादित खिडक्या आणि तांत्रिक अडचणींमुळे कामाचा वेग मंदावला आहे. मोठ्या प्रमाणात नागरीकांच्या रांगा लागत असल्यामुळे उभे राहण्यासाठी सावलीची किंवा बसण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने ७०/८० वर्षांच्या वृद्धांना काठीचा साहारा घेत ताटकळत उपाशी पोटी उभे राहावे लागत आहे. घरकाम आणि शेतीची कामे सोडून आलेल्या महिलांना दिवसभर रांगेत उभे राहूनही अनेक वेळा आल्या पावली आपल्या गावी परतावे लागत आहे. बसस्थानक परिसरात पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय नसल्याने लाभार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. यासाठी पुसद बस स्थानक आगार प्रमुखांनी ज्येष्ठ नागरिकांच्या मागणीनुसार दोन मशीन ठेवून त्यांचे होत असलेली गैरसोय दूर करावी असे तालुक्यातील ज्येष्ठ महिला व पुरुष नागरिकांची मागणी आहे.

## हजारो अर्जाचे निराकरण, नागरिकांचा वेळ आणि मनःस्ताप थांबला

पुसद - तालुक्यातील माळ पठारावरील बेलोरा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान दिनांक 24 मार्च रोजी राबविण्यात आले. या अभियानामध्ये हजारो अर्जांचे निराकरण करण्यात आले. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा वेळ आणि होणारा मनस्ताप थांबला आहे. सर्वसामान्यांना कामासाठी तालुक्यात चकरा माराव्या लागतात. यात नागरिकांची हेळसांड होते. यासाठीच महाराजस्व अभियान हाती घेण्यात आले. शासन आपल्या दारी' हा उपक्रम या ठिकाणी राबविण्यात आला.. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार सी डी राठोड मॅडम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी संजय राठोड उपस्थित होते. याचबरोबर पोस्ट कार्यालयाकडून लोंढे तर सरपंच रूपाली संजय पोले. तसेच मंडळ अधिकारी आर. डी. जाधव उपस्थित होते. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्राममहसूल अधिकारी, महसूल सेवक, पोलिस पाटील आणि विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या महाराज व शिबिरात विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांचे उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, नॉन क्रिमिलियर, अधिवास प्रमाणपत्र आदी दाखले वाटप करण्यात आले. तसेच या शिबिरात संजय गांधी योजना, श्रावण बाळ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. शेतकऱ्यांचे सातबारा दुरुस्त करणे तसेच पोट खराब बाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालय वडकी
पं.स. राळेगाव जि.प. यवतमाळ

जाहीर हर्रास सन-२०२६-२०२७

सर्व इच्छुकांना कळविण्यात येते कीग ग्रामपंचायत वडकी पं.स. राळेगाव जि.प. यवतमाळ येथील आठवडी बाजार हर्रास सन-२०२६-२०२७ करिता जाहीर हर्रास दिनांक २७/०३/२०२६ रोज शुक्रवार वेळ:-१२.०० आणि दैनिक गुजरी जाहीर हर्रास दिनांक ३०/०३/२०२६ रोज सोमवार वेळ:-१२.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय वडकीग येथे आयोजित केला आहे. हर्रास संबंधित सर्व अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय वडकी चे नोटीस बोर्ड वर पहावयास मिळतील. तरी सर्व इच्छुकांनी सदर आठवडी बाजार आणि दैनिक गुजरी हर्रास करिता हजार राहावे हि विनंती.

| प्रशासक | प्रशासकीय समिती सदस्य | ग्रा.पं. अधिकारी |
|---|---|---|
| सौ. कलावती ऊ. कोरडे | श्री. शैलेश अं. बेलेकर | पी. एस. खडसे |

# समाजमाध्यमांच्या विळख्यातील बालपण

**जितका सोशल मीडिया, इंटरनेटचा वापर प्रभावी, सकारात्मक ठरला आहे, तितकेच त्याच्या अतिरिक्त वापरामुळे नुकसान देखील होताना दिसते. या बदलत्या स्थितीत कर्नाटक सरकारने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला आहे, तर आंध्र प्रदेशात १३ वर्षांखालील मुलांसाठी अशीच मर्यादा लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे.**



डिजिटल युगाने आपल्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया ही साधने आता केवळ प्रौढांपुरती मर्यादित राहिली नाहीत, तर लहान मुलांच्या जीवनाचाही अविभाज्य भाग बनली आहेत. जितका सोशल मीडिया, इंटरनेटचा वापर प्रभावी, सकारात्मक ठरला आहे. तितकेच त्याच्या अतिरिक्त वापरामुळे नुकसानदेखील होताना दिसते. या बदलत्या स्थितीत कर्नाटक सरकारने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला आहे, तर आंध्र प्रदेशात १३ वर्षांखालील मुलांसाठी अशीच मर्यादा लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. मुलांचे मानसिक आरोग्य, शिकण्याची क्षमता आणि डिजिटल सवय पाहता कडक नियम करणे गरजेचे ठरले. या पार्श्वभूमीवर मुलांवर सोशल मीडियाचा होणारा परिणाम आणि त्यावर उपाययोजना यांचा सखोल विचार करणे अत्यंत गरजेचे ठरते.

आजची पिढी डिजिटल नेटिव्ह म्हणून ओळखली जाते. म्हणजेच, ही मुले जन्मापासूनच तंत्रज्ञानाच्या सानिध्यात वाढत आहेत. मोबाईल हाताळणे, ॲप्स वापरणे, व्हिडीओ पाहणे ही त्यांच्यासाठी सहज गोष्ट झाली आहे. सुरुवातीला हे सर्व निरुपद्रवी वाटते; परंतु हळूहळू ते सवयीचे रूप धारण करते आणि नंतर व्यसनात परिवर्तित होते. हीच स्थिती आज अनेक घरांमध्ये पाहायला मिळते. सोशल मीडियाचा सर्वात मोठा परिणाम मुलांच्या मानसिकतेवर होत आहे. १६ वर्षांखालील वय हा व्यक्तिमत्त्व घडण्याचा, आत्मविश्वास निर्माण होण्याचा आणि भावनिक स्थैर्य विकसित होण्याचा काळ असतो; मात्र सोशल मीडियामुळे मुलांची विचारप्रक्रिया कृत्रिम जगाशी जोडली जात आहे. ते स्वतःची तुलना सतत इतरांशी करतात. इतरांचे आकर्षक फोटो, महागड्या वस्तू, यशस्वी जीवन पाहून त्यांना स्वतःबद्दल असमाधान वाटू लागते. हा न्यूनगंड हळूहळू त्यांच्या मनावर ताण निर्माण करतो.

याचबरोबर लाईक्स आणि फॉलोअर्स या संकल्पना मुलांच्या मनात खोलवर रुजत आहेत. त्यांच्या पोस्टला किती प्रतिसाद मिळतो, यावर त्यांचा आनंद किंवा दुःख अवलंबून राहू लागते. एका इन्फ्ल्युएन्सर मुलीने फॉलोअर्स कमी झाल्याने आपले जीवन संपवले होते, ही गोष्ट विसरता येणार नाही. ही बाह्य मान्यतेवर आधारित मानसिकता अत्यंत धोकादायक आहे. कारण, यामुळे मुलांची स्वमूल्याची भावना कमकुवत होते. ते स्वतःच्या क्षमतेपेक्षा इतरांच्या प्रतिक्रियांना जास्त महत्त्व देऊ लागतात. मानसिक आरोग्याच्या दृष्टीने पाहिले, तर सोशल मीडियाचा अतिरेक नैराश्य, चिंता, एकटेपणा आणि असुरक्षितता वाढवतो. अनेक संशोधनांमध्ये असे आढळून आले आहे की, जास्त वेळ सोशल मीडियावर घालवणाऱ्या मुलांमध्ये नैराश्याची लक्षणे अधिक दिसतात. त्यांना वास्तव जीवनात आनंद मिळण्याऐवजी आभासी जगातच समाधान मिळू लागते. परिणामी, त्यांचा वास्तवाशी संपर्क कमी होतो.

मुलांच्या वर्तनातही मोठे बदल दिसून येतात. ते चिडचिडे, उतावळे आणि कमी संयमी होत आहेत. मोबाईल काढून घेतल्यास रागावणे, आक्रमक वागणे ही लक्षणे आता सामान्य झाली आहेत. मोबाईल दाखवल्याशिवाय मुले सध्या जेवत नाहीत, ही 'हर घर की कहाणी' पाहायला मिळते. प्रत्यक्ष संवादाची सवय कमी होत चालली आहे. मित्रांसोबत खेळणे, कुटुंबासोबत वेळ घालवणे याऐवजी ते स्क्रीनसमोर वेळ घालवणे पसंत करतात. यामुळे सामाजिक कौशल्यांचा विकास अडथळ्यात येतो. आरोग्याच्या दृष्टीने मोबाईल आणि सोशल मीडियाचा परिणाम अत्यंत गंभीर आहे. सतत स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डिजिटल आय स्ट्रेन ही समस्या वाढत आहे. डोळे कोरडे पडणे, डोकेदुखी, दृष्टी कमी होणे या समस्या लहान वयातच दिसू लागल्या आहेत. त्याचबरोबर रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरण्याची सवय झोपेच्या पद्धतीवर परिणाम करते. अपुरी झोप ही मेंदूच्या विकासासाठी घातक ठरते. शारीरिक हालचालींचा अभाव हा आणखी एक मोठा धोका आहे. बाहेर खेळण्याऐवजी मुले मोबाईलवर गेम्स खेळण्यात किंवा व्हिडीओ पाहण्यात वेळ घालवतात. यामुळे लठ्ठपणा, शारीरिक तंदुरुस्ती कमी होणे आणि प्रतिकारशक्ती कमी होणे या समस्या वाढतात. बालपणातील सक्रिय जीवनशैली कमी होत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे.

सोशल मीडियावर उपलब्ध असलेला अयोग्य कंटेंट हा मुलांसाठी गंभीर धोका आहे. हिंसक व्हिडीओ, अश्लील सामग्री, चुकीची माहिती आणि अफवा यांचा त्यांच्या मनावर नकारात्मक प्रभाव पडतो. लहान वयातच चुकीच्या गोष्टींचा प्रभाव त्यांच्या वर्तनात दिसू लागतो. सायबरबुलिंग ही समस्या तर दिवसेंदिवस वाढत आहे. ऑनलाईन छळ, टोमणे, अपमान यामुळे मुलांचे मानसिक आरोग्य गंभीरपणे बिघडू शकते.

या सर्व पार्श्वभूमीवर सरकारकडून सोशल मीडियावर बंदी घालण्याचा निर्णय हा मुलांच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे; मात्र केवळ बंदी हा अंतिम उपाय नाही. कारण, तंत्रज्ञान पूर्णपणे टाळणे शक्य नाही. त्यामुळे योग्य वापर आणि मर्यादा यावर भर देणे अधिक आवश्यक आहे. मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवण्यासाठी सर्वप्रथम पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पालकांनी स्वतः मोबाईलचा वापर नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे. कारण, मुले पाहून शिकतात. घरातील मोठी मंडळी सतत मोबाईलमध्ये गुंतलेली असतील, तर मुलांकडून वेगळ्या वर्तनाची अपेक्षा ठेवणे योग्य नाही. घरात नो मोबाईल झोन किंवा स्क्रीन फ्री टाईम निश्चित करणे उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ, जेवणाच्या वेळी, अभ्यासाच्या वेळेत किंवा झोपण्यापूर्वी मोबाईल वापरण्यास बंदी घालणे. यामुळे मुलांची सवय हळूहळू बदलू शकते.

मुलांना पर्यायी उपक्रमांकडे वळवणे हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. क्रीडा, वाचन, कला, संगीत, निसर्गभ्रमण अशा उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढवणे आवश्यक आहे. यामुळे त्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास होतो, तसेच त्यांचे लक्ष मोबाईलपासून दूर जाते. संवाद हा या समस्येचा कळीचा मुद्दा आहे. मुलांशी मोकळेपणाने बोलणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. सोशल मीडियाचे फायदे आणि तोटे समजावून सांगितल्यास ते अधिक जबाबदारीने तंत्रज्ञान वापरतात. शाळा आणि शैक्षणिक संस्था यांनीही या विषयात सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. डिजिटल साक्षरता, सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर याबाबत मुलांना शिक्षण देणे आवश्यक आहे. यामुळे ते सजग नागरिक बनतील.

एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मुलांना पूर्णपणे बंदी घालण्याऐवजी त्यांना संतुलित वापर शिकवणे अधिक उपयुक्त ठरते. कारण, भविष्यात तंत्रज्ञानाशिवाय जीवनाची कल्पना करता येणार नाही. त्यामुळे त्याचा योग्य वापर करण्याची सवय लहानपणापासूनच लागणे गरजेचे आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील निर्णय हे समाजासाठी एक इशारा आहेत. या निर्णयांकडे केवळ राजकीय किंवा प्रशासकीय पातळीवर न पाहता सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणे आवश्यक आहे. मुलांचे बालपण सुरक्षित, निरोगी आणि आनंदी ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शेवटी, एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे-मुलांना तंत्रज्ञानापासून पूर्णपणे दूर ठेवणे हा उपाय नाही; पण त्याच्या अतिरेकापासून त्यांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शन, प्रेमळ संवाद आणि सकारात्मक वातावरण यांच्या साहाय्याने आपण पुढील पिढीला अधिक सक्षम, आत्मविश्वासी आणि निरोगी बनवू शकतो. हीच या निर्णयामागील खरी भावना आहे आणि ती प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे.

**कावेरी गिरी**

# चैत्रगौरी



भारतीय माणूस म्हणजे उत्सवप्रिय. सणांमध्ये... उत्सवांमध्ये रमणारा. आज आपल्या सणवार साजरे करण्याच्या पद्धती कालानुरूप बदलत असल्या तरी या सणांच्या निर्मितीमागे असणाऱ्या सांस्कृतिक, सामाजिक व निसर्गाशी जोडलेल्या संदर्भांचा सूक्ष्मपणे विचार केला की जाणवते, हे सण म्हणजे माणसाच्या जगण्याचे सृष्टीचक्राचे अद्भुत... नयनरम्य सोहळेच! मानवी भावभावनांचा एक उद्गार म्हणजेच आपले सण!

चैत्रगौर म्हणजे चैत्र मासात केली जाणारी पार्वतीची पूजा. पार्वती म्हणजे सृजनाचे शक्तिकेंद्र... नवनिर्मितीचे प्रतीक. या चैत्र गौरीचे नि निसर्गाचे आपल्याला नाते दिसते. चैत्र महिना म्हणजे वसंताच्या आगमनाचा. सर्व ऋतूंचा राजा असणाऱ्या या वसंत ऋतूला भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये 'कुसुमाकर' असे म्हटले आहे. त्याचे कारणही तसेच आहे. वसंतात निष्पर्ण झाडांना पालवी फुटू लागते. विविधरंगी फुलांची जणू रंगपंचमीच आपल्याला वसंतात पाहायला मिळते. शिशिराची पानगळ संपून सृजनाचे कोंब वसंताच्या आगमनाने चैत्र महिन्यात फुटू लागतात आणि म्हणूनच चैत्र मास म्हणजे सृष्टीच्या नवचैतन्याचा... सृजनाचा देखणा सोहळाच वाटतो. सृजनाचं प्रतीक म्हणूनच की काय सृजनशक्तीची... आदिमायेची पार्वतीची पूजा बांधणारं चैत्रमासातलं हे चैत्रगौर!

चैत्रगौरीचे नाते सृष्टीच्या चक्राशी आहे तसंच ते स्त्रीच्या भावभावनांशीही आहे. आजच्या काळात फार कमी घरांमध्ये चैत्रगौर साजरी केली जात असेल. पण पूर्वी माहेरवाशिणीला चार दिवस विसावण्यासाठी... माहेरी आणण्यासाठीच की जणू काय चैत्रगौर या सणाची रुजवात झाली असावी, असे वाटते. चैत्रातली ही गौर म्हणजे माहेरी आलेली पार्वती. या सणाच्या निमित्ताने विवाहित स्त्रिया लग्नानंतर असलेल्या जबाबदाऱ्यांचे ओझे जणू सासरच्या पायरीवर ठेवून पुन्हा एकदा आपले लाड पुरवून घ्यायला... चार क्षण विसावायला जणू एक मुग्ध बालाच होऊन आपल्या माहेरी येतात. या सणाला माहेरवाशिणीला मायेने माहेरी आणतात. तिला गोडधोड खाऊ घालतात. तिचं कोडकौतुक करतात. सणांच्या मुळाशी असलेले हे गर्भितार्थ जेव्हा आपल्याला उलगडतात तेव्हा या सणांचा गोडवा आपल्याला अधिकच जाणवू लागतो.

आता ही चैत्रगौर विराजमानही कुठे होते, तर झोपाळ्यावर. झोपाळा म्हटलं की आपल्याला आठवतं ते आपलं बालपण. कसलीच चिंता नाही. काळजी नाही. जबाबदारी नाही. निश्चिंत असणारे बालपणीचे ते दिवस. बालपणी झोपाळ्याशी जडलेलं नातं ती पौगंडावस्थेत येईपर्यंत अलवारपणे जोडलेलं असतं. कुमारवयातील झोपाळ्यावर झुलणारी कुमारिका 'दिवस तुझे हे फुलायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे' या गीतातील शब्दांप्रमाणे आपलं बालपण मागे टाकून स्वतःच्या नाजूक, अलवार भावनांमध्ये कधी गुरफटायला लागते कळतच नाही.

या वयातला झोका म्हणजे तिच्या मुग्धतेची... अलवारतेची स्पंदनंच! जबाबदारीचे भान येईपर्यंत झोपाळ्याप्रमाणे लयीत झुलणारं... स्त्रीचं हे मुग्ध मन! माहेरवाशीण गौराईही जणू मुग्धा होऊन चैत्रात माहेरी आल्यावर परत एकदा आपल्या बालपणापासूनच्या सगळ्या आठवणींतच जगते. तसेच ती आता माहेरी आली आहे त्यामुळे आता निवांत आहे. निश्चिंत आहे हीच भावना कुठेतरी गौराईच्या झोपाळ्यातून व्यक्त होते. चैत्रगौराचं एक वैशिष्ट्य म्हणजे चैत्रगौरातलं चैत्रांगण. आता आपल्याला अंगणच नाही. पण पूर्वी अंगणामध्ये चैत्रांगण साकारलं जायचं. या आदिमायेची... शक्तीची जाणीव करून देणारी शंख, चक्र व गदा ही शस्त्रे; हत्ती, कासव, नाग, गरुड ही वाहने चैत्रांगणातून काढली जात. त्याचबरोबर ओम्, स्वस्तिक, आंबा, श्रीफळ, उंबर, पिंपळ यांच्या रांगोळ्या म्हणजे चैत्रांगण. राधा-कृष्ण, तुळस यांचाही चैत्रांगणात समावेश असे.

चैत्रांगणाला असलेले सांस्कृतिक, पौराणिक संदर्भ यांचे तपशिलात जाऊन विश्लेषण करायचे म्हटले, तर एक वेगळाच लेख लिहावा लागेल, इतकी प्रतिकात्मकता या चैत्रांगणात आहे. या ऋतूत मिळणारी फळे व या ऋतूमानातील आहारानुसार गौरीला नैवेद्य अर्पण केला जातो. कैरी घालून वाटलेली हरभऱ्याची डाळ, कैरीचे पन्हे, बत्तासे, टरबूज, कलिंगड, भिजवलेले हरभरे असा नैवेद्य देवीला अर्पण करतात. चैत्रगौरातला सगळ्यात हृद्य प्रसंग म्हणजे चैत्र गौरीचे विसर्जन. माहेरी आलेली माहेरवाशीण सासरी परतताना भरल्या डोळ्यांनी... जड अंतकरणाने... नि जड पावलांनी आपला परतीचा प्रवास सुरू करते. डोक्यावर गौराईला घेऊन गाणी म्हणत पाणवठ्यावर या गौराईला निरोप दिला जातो.

**अश्विनी शिंदे - भोईर**

# श्रद्धेच्या आड दडलेले अंधश्रद्धेचे वास्तव

अलीकडील काळात काही घटनांमध्ये श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आले आहेत. या घटना केवळ व्यक्तीगत गुन्ह्यांच्या चौकटीत मर्यादित नसून त्या समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला दैवी शक्ती असलेली म्हणून सादर करते, चमत्कारांचे दावे करते आणि लोकांच्या समस्यांवर 'दैवी उपाय' सुचवते, तेव्हा काही लोक त्या व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेत काही भोंदू लोक महिलांचे मानसिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण करतात. महिलांच्या संदर्भात अंधश्रद्धेचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक दबाव यामुळे अनेक महिला अशा भोंदू व्यक्तींच्या जाळ्यात अडकतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या; जसे की आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक ताणतणाव, संततीप्राप्तीचे प्रश्न यावर उपाय शोधताना त्या अशा लोकांकडे वळतात. हीच परिस्थिती शोषणाला कारणीभूत ठरते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या कायद्याने अशा प्रकारच्या कृत्यांना स्पष्टपणे गुन्हा घोषित केले आहे. जादूटोणा, बुवाबाजी, खोटे चमत्कार, फसवणूक, तसेच शारीरिक आणि मानसिक छळ यांना या कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. तरीही, अशा घटना घडत राहतात, याचा अर्थ कायद्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत. सैद्धांतिकदृष्ट्या, ही जबाबदारी पोलीस, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्यावर असते. परंतु, या यंत्रणा स्वतंत्र आणि निष्पक्ष असल्या पाहिजेत. जर त्यांच्यावर राजकीय दबाव असेल किंवा त्यांच्यात प्रामाणिकतेचा अभाव असेल, तर त्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# भयाण श्वापदांचे श्वादल उर्फ 'ओॲसिस'

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा. प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६ स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सीपना कॉलेज अमरावती येथे, कामगार कल्याण केंद्र गांधी चौक यांनी १९ वे नाटक 'ओॲसिस' सादर केले.

इरफान मुजावर लिखित व हर्षल ससाणे यांच्या दिग्दर्शनात 'ओॲसिस' नाटकाचा प्रयोग सुरू करताना भयान स्वप्नात वाळवंटातील सामाजिक श्वापदाचे मध्यमवर्गीय कुटुंबावरिल टोमणांचे हल्ले सादर झाले. मध्यमवर्गीय कुटुंबाची स्वप्ने साकारण्यासाठी उभयतांचे होणारे ताणतणाव व सामंजस्यचे समतोलात नाटकाचा गाभा आणताना वाळवंटातील हिरवळ दर्शकापुढे आणण्याचा प्रयत्न दिग्दर्शकाने केला. तो व ती आणि इतर कलावंताचे समन्वयात नाटकाचे प्रायोगिक सादरीकरण करताना कुटुंबातील घडणाऱ्या प्रत्येक घटनेत कुटुंब नियोजनाची गरज आर्थिक चणचणीत कशी उद्धवते, त्यासाठी करावी लागणारी तरतुदेचे इमले.यामध्ये ती त्याला कशा प्रकारे समजून घेताना निव्वळ स्वप्नाच्या आधारे संसाराच्या गुलाबी रात्रीला किंवा रजेच्या दिवसाला सादर करताना नाटकात मध्यमवर्गीय कुटुंबकेंद्रीय होते.तिच्या बॉस कडून चिकन बिर्याणीसाठी झालेली अवहेलना म्हणजे

सामाजिक टोमण्याची किंवा उपहास,उपेक्षा, दर्जा व वर्गवारीची



वागणूक दाखवताना काल्पनिक अभिनय सादर झाले.ज्यात पोळी बनवण्यापासून तर कार

## एक टक नाटक
### समीक्षण

चालक,हॉटेल मधील जेवण, मॉल मधील कपड्यांचे खरेदी,परिधान केलेल्या शॉर्ट स्कर्टचे प्रदर्शन.खाजगी नोकरी करून संसाराचा गाडा ओढताना एका मुलीचा बाप फॅमिली प्लानिंग करताना अनावधानाने झालेल्या गर्भधारणेसाठी पत्नीला गर्भपात करण्यासाठी प्रवृत्त करतो.यावेळी पिझ्झा आणि गर्भपाताची गोळी सारख्याच भावात दर्शवताना माणुसकीची तुलना कशी करावी?

यावेळी पत्नी म्हणून झालेली घुसमट आणि पती म्हणून होत असलेला आतल्या मनाचा द्बूभंगपना, तर मुलीचे पाळणाघरात असताना अचानक झालेल्या दंगली प्रसंगी सामाजिक असहकाराची जाणीव मनात आक्रोश निर्माण करते.शेवटी मनाचा खंबीरपणा आणि परिस्थिती झुंजणायची ताकद या समाजाला लाजवते.त्यामुळे कुठेतरी वाळवंटात हिरवळ फुलवण्याचा प्रयत्न यशस्वी होतो.अशा प्रकारचे कथानक उभे करताना दिग्दर्शकाने प्रायोगिक,मेलोड्रामा वापरण्याचा प्रयत्न केला.कथानकाचे स्वरूप भावनिक व सामाजिक परिस्थीतीच्या जवळ नेताना आभासी पात्रांची लुळबुळ होती.अभिनयाची पकड घेताना तो एक उच्चशिक्षित मध्यम वर्गीय कुटुंबातील व्यक्ती प्राध्यापकाच्या गतीत संवाद फेकत होता.त्यामुळे पाठांतर व संवादाची फेक यात लवचिक व समयसूचक संगत साधण्यात भावनिर्मिती थोडीफार..

रंगमंचावर फिरताना प्रत्येक स्थळ आपली जागा निश्चित दर्शविते मात्र मध्यभागी असलेल्या मंचावर बरेचसे सादरीकरण पावसाची खिडकीपण व कारपण चालली.अर्थात नेपथ्याचे महत्व वेळ,स्थिती,स्थळ दाखवताना किचनमध्ये पिंजरा, कपाट(अडगळ) रचना तर सन्मुख स्वप्नातील इमले,विमान,यशस्वी जीवनाचे चित्रण होते.फोन प्रॉपर्टी वापरात नाही.तिचा अभिनय प्रसंगप्रसंगी जाणवत होता जसे स्वयंपाक करणे,चप्पल काढणे,पावसात गाडीत बसताना छत्री किंवा ओले होताना सांभाळ दिसला नाही व ती मध्यम कुटुंबातील सौभाग्यवती पायात जोडवे नसल्याने विहरत होती. एकंदर नाटक दर्शकांना बरे वाटले असले तरी त्यातील काही जागी अतिरंजकपना दिसत होता.जिथे समाजाचे मध्यम कुटुंबातील स्थान निश्चित करण्याचा, सकारात्मक हट्टाहास दाखवता आला असता.जसे पाळणाघरचे वास्तव.दंगल प्रसंगीची अमानुषता आणि गर्भपात व पिझ्झा स्वाद यावर गांभीर्य दर्शवत काळजाचे लचके इतर विचारांपेक्षा वेळोवेळी प्रायोगिक, मोलोड्रामा सारखे प्रसंग सांगण्यात नाटक गेले.तरी! प्रकाश संगीत (कार दार चालू बंद वेळी बीप लक्षवेधी) स्थितीजन्य होते.

तो हर्षल ससाणे,ती रंजना शिरभाते प्रमुख भूमिकेत असताना रेवनाथ पागरूत,सोहम गादेकर, मुक्ता जोशी, आकांक्षा धंदर, वेदांत याउल यांनी टोमणे,द्वेष मत्सर,श्वापदे, बिभीत्स रस निर्माणकर्ते अमूर्त चेहरे मांडले.नेपथ्य निकष देशमुख,पार्श्वसंगीत अभंग व्यवहारे,प्रकाश योजना गणेश देशमुख यांनी केले.एकंदर नाटक रंगविण्याचा प्रयत्न जवळपास छान होता. बारकाईने बघितले तर सामाजिक वस्तुस्थितीचे दर्शन हृदयापर्यंत पोहचवणे आणखी बाकी आहे.एकटक नाटक बघताना कामगार कल्याण मंडळ हौशी कलावंताना स्पर्धेच्या निमित्ताने दिलेल्या संधीचे लाभ घेतील अशी भूमिका घेते.सर्व दर्शकांना २९ मार्चपर्यंत एकापेक्षा एक अशी भारीभक्कम नाटके पाहण्याचे आवाहन.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# शासकीय जागेवरील अवैध बांधकामावर अखेर कारवाई!

## खंडारे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश ; नगर परिषदेकडून थांबवण्यासह पाडकामाचे आदेश

■ **प्रतिनिधी | पातूर** ■

नगर परिषद पातूर हद्दीतील झोपडपट्टी क्रमांक २ मधील शासकीय जागेवर सुरू असलेल्या अवैध बांधकामावर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. माजी नगरसेवक जगदीश आत्माराम खंडारे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नगर परिषद प्रशासनाने संबंधित बांधकाम तात्काळ थांबवण्याचे तसेच आवश्यकतेनुसार पाडण्याचे आदेश जारी केले आहेत.

नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिलेल्या अधिकृत नोटिशीत संबंधित जागा ही नगर परिषदेची शासकीय मालमत्ता असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, त्या ठिकाणी सुरू असलेले बांधकाम पूर्णतः नियमबाह्य व बेकायदेशीर असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे संबंधितांना त्वरित काम थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणात विशेष म्हणजे, प्रशासनाने बांधकाम अवैध असल्याचे मान्य केले असले तरी, माजी नगरसेवक खंडारे यांनी सातत्याने पाठपुरावा केला नसता तर ही मौल्यवान शासकीय जागा बळकावली गेली असती, अशी चर्चा शहरात रंगू लागली आहे. खंडारे यांनी २२ जानेवारी २०२६ पासून या प्रकरणी प्रशासनाकडे वारंवार लेखी तक्रारी, स्मरणपत्रे देत पाठपुरावा केला होता.

त्यांच्या चिकाटीमुळेच प्रशासनाला अखेर कारवाई करावी लागल्याचे नागरिकांत बोलले जात आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे पातूर शहरात एकच खळबळ उडाली असून, शासकीय मालमत्तेच्या संरक्षणासाठी पुढाकार घेतल्याबद्दल नागरिकांकडून जगदीश खंडारे यांचे कौतुक होत आहे.

# पोपटखेड येथे स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेची मागणी

## शासकीय इमारत उपलब्ध करून देण्याची विद्यार्थ्यांची निवेदनाद्वारे विनंती



■ **प्रतिनिधी | अकोट** ■

तालुक्यातील पोपटखेड येथील विद्यार्थ्यांनी गावात स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करण्यासाठी शासकीय इमारत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गावात स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी शांत व योग्य वातावरण असलेले अभ्यासाचे ठिकाण उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर अनेक विद्यार्थी पुढील शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यास उत्सुक आहेत. तसेच महाराष्ट्र पोलीस भरतीच्या शारीरिक चाचणीत गावातील अनेक विद्यार्थी पात्र ठरले असून, पुढील लेखी परीक्षेच्या दृष्टीने अभ्यासासाठी सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

अभ्यासासाठी सध्या गावाबाहेर जावे लागत असल्याने वेळ व आर्थिक खर्च वाढत असल्याचीही विद्यार्थ्यांची तक्रार आहे. गावातील पाडिया किराणा परिसरातील व्यायामशाळेची इमारत अभ्यासिकेसाठी योग्य असून ती ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली आहे.

योग्य अभ्यासिका उपलब्ध झाल्यास गावातील विद्यार्थ्यांचे शासकीय सेवेत निवडीचे प्रमाण वाढेल व गावाची शैक्षणिक प्रगती होईल, असा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी अभ्यासिका सुरू करण्यास परवानगी देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. सदर निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना देण्यात आल्या आहेत. निवेदनावर कार्तीक सुरीत्ने, विशाल भास्करे, ओम मरस्कोळे, उज्वला मारकर, अजय बन्सोड यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांच्या सह्या आहेत.

# जिल्ह्यात १०० टक्के क्षयरोगमुक्त व्हावा - जिल्हाधिकारी

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

जिल्ह्यात २८२ ग्रा. पं. क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. आता संपूर्ण जिल्हा १०० टक्के क्षयरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवून प्रयत्न व्हावेत. त्यासाठी शासकीय प्रयत्नांबरोबरच लोकसहभाग मिळविण्याचीही गरज आहे. त्यादृष्टीने निक्षयमित्रांचे कार्य महत्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.



क्षयरोगमुक्त भारत अभियान-१०० मोहिम, तसेच निक्षयमित्रांचा गौरव सोहळा जिल्हाधिका-यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ, विनोद करंजीकर, जागतिक आरोग्य संघटनेतर्फे डॉ. सम्यक खैरे यांच्यासह मान्यवर निक्षयमित्र उपस्थित होते. जिल्ह्यात निक्षयमित्रांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले. क्षयरोगमुक्त भारत अभियानात निक्षयमित्रांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन श्रीमती मेश्राम यांनी केले.

**निक्षयमित्रांचा गौरव :** निक्षय मित्र योजनेद्वारे व्यक्ती, स्वयंसेवी संस्थांद्वारे टीबी (क्षयरोग) रुग्णांना दत्तक घेऊन त्यांच्या पोषण, निदान आणि उपचारांसाठी साह्य केले जाते.

# होली क्रॉस कॉन्व्हेंट २००१ बॅचचे 'बॅक टू स्कूल' संमेलन

## पुन्हा एकदा वाजणार शाळेची घंटा!

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

'टन! टन! टन! बेल वाजली...' ही ओळ वाचताच डोळ्यांसमोर उभी राहते ती आपली शाळा आणि मधल्या सुटीची ती लगबग! काळाच्या ओघात आयुष्याच्या वाटा जरी वेगळ्या झाल्या असल्या, तरी शालेय जीवनातील त्या सोनेरी आठवणी आजही काळजाच्या कोपऱ्यात ताज्या आहेत. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी होली क्रॉस कॉन्व्हेंट हायस्कूलच्या २००१ च्या बॅचचे एक अभूतपूर्व पुनर्मिलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



तब्बल पंचवीस वर्षांनंतर, जुने मित्र-मैत्रिणी पुन्हा एकदा आपल्या लाडक्या शाळेच्या प्रांगणात एकत्र येणार आहेत. केवळ औपचारिकता म्हणून नव्हे, तर पुन्हा एकदा विद्यार्थी होऊन शाळेतील ते वर्ग, व्हरांडे आणि लाडक्या बाकांवर बसण्याची ओढ प्रत्येक माजी विद्यार्थ्यामध्ये दिसून येत आहे. शाळेचा तो डबा, मधल्या सुटीतील दंगामस्ती आणि मित्र-मैत्रिणींसोबत घालवलेले ते क्षण पुन्हा एकदा जगण्याची ही अनोखी संधी आहे. या दोन दिवसांच्या कार्यक्रमात केवळ गप्पागोष्टीच नव्हे, तर जुन्या शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील त्या निरागस खोडकरपणाला उजाळा देणारे विशेष उपक्रमही राबवण्यात येणार आहेत.

येत्या २५ आणि २६ एप्रिल २०२६ रोजी अकोल्यात होणाऱ्या या आगळ्यावेगळ्या संमेलनात 'बॅक टू स्कूल' ही संकल्पना खऱ्या अर्थाने अनुभवता येणार आहे. या संमेलनाबाबत २००१ बॅचच्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, ज्याप्रमाणे शाळेत हजेरी अनिवार्य असायची, 'हजेरी न लावल्यास नाव ब्लॅकबोर्डवर लिहिले जाईल' अशा मजेशीर आणि काहीसा मिश्कील आग्रह धरत आयोजकांनी सर्व बॅचमेट्सना या सोहळ्यासाठी आमंत्रित केले आहे.

**( अधिक माहितीसाठी आणि नाव नोंदणीसाठी रहीम ढोडीया २५६७५७१०१९८४ (व्हॉट्सअॅप) व गिरीश भांगे ६१४११३०५१४४ (व्हॉट्सअॅप) यांच्याशी संपर्क साधावा.)**

---

### जाहीर सुचना

सर्वांना ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की श्री गजानन प्रभाकर तायडे, वय अं. ६३ वर्ष, रा. मुर्तीजापूर ता. मुर्तीजापूर जि. अकोला ह्यांनी खालील वर्णनाची मालमत्ता ईंडीया शेल्टर फायनान्स कार्पोरेशन लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे मुर्तीजापूर न.प. मुर्तीजापूर ता. मुर्तीजापूर जि. अकोला येथील नझुल प्लॉट क्र. १४/१ शिट क्र. ११-सी ज्याचे क्षेत्रफळ ५२.०४ चौ.मी. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : सुष्मा आष्टीकर चे घर पश्चिमेस : शौचालय व रस्ता, ऊत्तरेस : भगवंत नगर, दक्षिणेस : रस्ता

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे पुर्विचे मुळ खरेदीखत दस्त क्र. १३२६ दि. २८/१२/२०८८ रोजीचे हरविले/गहाळ झाले आहेत. त्याकरीता पो. स्टे. मुर्तीजापूर येथे दि. २३/०३/२०२६ नुसार तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ०३ (तीन) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन ईंडीया शेल्टर फायनान्स कार्पोरेशन लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन श्री गजानन प्रभाकर तायडे ह्यांना कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २४/०३/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र.प्रस्तु.-२/ना.तह./कावि-४३८/२०२६ — दिनांक २३/०३/२०२६

### जाहीरनामा

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म मृत्यु नोंदणी करीता अर्जदार सचिन जर्नाधन मालोकार, रा. विठ्ठल मंदिराजवळ, राम नगर, सुधीर कॉलनी, अकोला यांचा जन्म डॉ. कोठारी हॉस्पीटल अकोला येथे दिनांक १०.०७.१९८० रोजी झाला असून यांच्या जन्माची नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, महानगरपालीका अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, महानगरपालीका अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, सचिन जर्नाधन मालोकार, रा. विठ्ठल मंदिराजवळ, राम नगर, सुधीर कॉलनी, अकोला यांचा जन्माची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अकोला
दिनांक :-

शिक्का

**कुणाल झाल्टे**
**तहसिलदार अकोला**

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४२/२०२६ — प्रोसेस नं.३१२/२०२६
चौ.ता. २२/०४/२०२६ — दिनांक : १०/०३/२०२६

**अर्जदार :** १. बाबर खान रियासत खान वय ६५ वर्ष धंदा - शेती २. जावेद खान रियासत खान वय ६३ वर्ष धंदा - शेती ३. साबीर खान रियासत खान वय ६१ वर्ष धंदा - शेती १ ते ३ रा. कासीदपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : रियासत खान जहांगीर खान
**पत्ता :-** रा. पातुर ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रियासत खान जहांगीर खान यांचा मृत्यु दि.२०/१२/२००५ रोजी पातुर ता. पातुर जि. अकोला येथे झाला. मयत यांची पत्नी नामे साईदा खातुन रियासत खान हया पाच वर्षापुर्वी मयत झाल्या. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सदरहु जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येत आहे की, आमचे पक्षकार सौ. मिना शंकर राऊत रा. धामणगांव रेल्वे ता.धामगांव जि. अमरावती यांना दि. ०३/०७/२०१० दस्त क्रं. २८५३/२०१० नुसार रजि. मुत्यपत्राव्दारे श्रीमती राधाबाई श्रीकृष्ण उपरीकर यांचे कडुन मिळालेल्या मालमत्तेचे वर्णन म.न.पा.र.स.डी. र. डी. अकोला चे हद्दीतील गांव मौजे - उमरी प्र. ता. जि. अकोला येथील विठ्ठल फैल म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या विभागातील गट नंबर ४२ / ३, पृष्ठ क्रं. १७ पावती क्रं. ५८ नुसार म.न.पा. मध्ये नोंद दर्ज असलेली याचा जुना वार्ड नंबर ४६ नझुल शिट नं. ७६ - सी नझुल शिट नं. ३२ मधील जागा व त्यावरील घर त्याचे माप पुर्व-पश्चिम- १३.६ फुट उत्तर - दक्षिण ६० फुट त्याचे एकुण क्षेत्रफळ ८१६ चौ.फुट ७५.८३ चौ.मी. येणे प्रमाणे सदरहु वरील स्थावर माल श्रीमती राधाबाई श्रीकृष्ण उपरीकर हिने १) श्रीमती तुळसाबाई जद सुखदेवराव साहारे २) सुभाष देविदास साहारे यांचे कडुन रजि. दस्त क्रं.४४४/१९९५ दि.०६/०२/१९९५ प्रमाणे खरेदी हक्काने विकत घेतली होती, सदरहु मालमत्ता तुळसाबाई साहारे यांना विकण्याकरीता दि. ३१/१२/१९९५ रोजी मयत सुखदेव साहारे यांचे इतर वारसांनी संमत्तीपत्र लिहुन दीले होते. वरील मालमत्ता २०१० पासुन माझ्या ताब्यात असुन मी तेथे राहत आहे. सदरहु मालमत्तेबाबत कुठलाही वाद नसुन, कुठल्याही न्यायालयात सदरहु मालमत्तेबाबत कोणतेही प्रकरण दाखल किंवा प्रलंबीत नाही. तसेच सदरहु मालमत्तेबाबत भविष्यात कुठलाही मालकीहक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्याकरीता आमचे पक्षकार हे पुर्णपणे जबाबदारी राहील.

सदरहु मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, ताबा, ईसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार किंवा हितसंबध असल्यास त्यांनी सदरहु नोटीस प्रसिध्दी पासुन १० दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रासह हरकत नोंदवावी त्यानंतर आमचे पक्षकार वरील मालमत्तेचे खरेदी खत नोंदवुन घेतील व मुदतीनंतर कोणाचाही कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क व उजर चालणार नाही कृपया याची नोंद घ्यावी, करीता जाहीर नोटीस.

अकोला
दि. २४/०३/२०२६

**पक्षकाराकरीता अधिवक्ता**
**अॅड. धिरज पांडे**
कार्या.पत्ता सुशीला अपार्टमेंट, रत्नाळीकर हॉस्पीटल समोर बिर्ला रोड, जठारपेठ, अकोला ता.जि. अकोला
मो. ९९२२४२०९०७

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४३/२०२६ — प्रोसेस नं.३१४/२०२६
चौ.ता. २३/०४/२०२६ — दिनांक : ११/०३/२०२६

**अर्जदार :** १. गजानन डिगांबर खाकरे वय ४७ वर्ष धंदा - मजुरी रा. कार्ला ता.पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : डिगांबर शंकर खाकरे
**पत्ता :-** रा. कार्ला ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत डिगांबर शंकर खाकरे यांचा मृत्यु दि. २२/१०/२०२५ रोजी कार्ला ता. पातुर जि. अकोला येथे झाला. मयत यांची पत्नी नामे लक्ष्मी डिगांबर खाकरे हया दिनांक २३/१२/२०१९ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मयत झाल्या. मयत यांची आई नामे भागाबाई शंकर खाकरे हया अंदाजे ४० वर्षापुर्वी मयत झाल्या. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

### जाहीर नोटीस

**लवाद अधिकारी अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**

( मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीज अॅक्ट २००२ आणि आर्बिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये )

जा. क्र. २५९३ — दि. २४/०३/२०२६

**रेणूका भवन**
रेणूका भवन, २ मजला सर्वे नं ३५ / २अ - २ब पुष्पक हॉटेल जवळ
पाईप लाईन रोड सावेडी अ. नगर
अहमदनगर ४१४००१
श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट
सोसायटी लि., अहमदनगर

**विरूध्द** — **अर्जदार**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक / सामनेवाला यांचे नाव व पत्ता |
|---|---|
| १८०८/२०२६ | **कर्जदार -** १. श्री / श्रीमती केतकी गोविंद चिवरकर मु. पो. शंकर नगर जठारपेठ अकोला ता अकोला जि अकोला<br>**जामीनदार -** २. श्री / श्रीमती अतिश गजानन लामतुरे मु. पो. गुरुदेव नगर महाकाली मंदिर च्या जवळ मोठी उमरी अकोला ता अकोला जि अकोला<br>**जामीनदार -** ३. श्री / श्रीमती अभिषेक सुनील संभारे मु. पो. मोठी उमरी विठ्ठल नगर उमरी अकोला ता जि अकोला |
| १८४६/२०२६ | **कर्जदार -** १. श्री / श्रीमती प्रवीण सुरेश पवार मु.पो. न्यू अशोक वाटिका नगर शिवानी अकोला अकोला ता जि अकोला<br>**जामीनदार -** २. श्री / श्रीमती तेजेस्वीनी सोळंके मु.पो. न्यू अशोक वाटिका नगर शिवानी अकोला ता अकोला जि अकोला<br>**जामीनदार -** ३. श्री / श्रीमती शुभम पुंडलिक पवार मु. पो. सुंदर नगर शिवणी अकोला ता अकोला जि अकोला |
| १८५६/२०२६ | **कर्जदार -** १. श्री / श्रीमती आर के कॉटन अशपाक हुसैन इरफान हुसेन मु. पो. २१६ नाजुका नगर मेहता मिल रोड लक्कड गज मासूमशा अकोला अकोला ता जि अकोला<br>**जामीनदार -** २. श्री / श्रीमती नसीर हुसैन रहेमत खान पो. २९६ नाजुका नगर मेहता मिल रोड लक्कड गज मासूमशा अकोला अकोला ता जि अकोला<br>**जामीनदार -** ३. श्री / श्रीमती फिरोज खान रहेमत खान पो. २९६ नाजुका नगर मेहता मिल रोड लक्कड गज मासूमशा अकोला अकोला ता जि अकोला |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की अर्जदार यांनी तुमचेविरुध्द वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कमी आपण दिनांक ११/०४/ २०२६ रोजी ठिक सकळी ११.०० वा. लवाद कार्यलयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी / एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

शिक्का

**अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकरी**

### Change In Name

I Have Changed My Name From
**NASEEMA KHATOON SADAT KHAN**
- TO -
**NASIMA BI SHAIKH MAHEBOOB**
My Residential Address in:-Aman Nagar Paras TQ. Balapur Akola 444109

### Change In Name

I have Changed My Name Form
**SHEKH IRFAN SHEKH ISMAIL**
- TO -
**SHAIKH IRFAN SHAIKH ISMAIL**
My residential Address in Indra Nagar, Near Yusuf Ali Anjaan Chowk Akot Fail, Akola 444003

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४५९/२०२६ — प्रोसेस नं.४०५९/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : २३/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती अर्चना प्रशांत देशमुख २. स्वरा प्रशांत देशमुख दोन्ही रा. प्लॉट नं. ३०, कुलर कारखान्याजवळ, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रशांत मार्तंडराव देशमुख
**पत्ता :-** रा. प्लॉट नं. ३०, कुलर कारखान्याजवळ, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रशांत मार्तंडराव देशमुख यांचे दि. २८/०५/२०२३ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

एस. आर. एन. क्र. AKL/35160/18/25 फेरफार अहवाल /अर्ज क्र. ५४/२०२५ कलम -१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** श्री रुद्रनाथ संस्थान नरसीपूर तालुका तेल्हरा जिल्हा अकोला बाबत।

**न्यासाचा पत्ता :-** देशमुख निवास, नरसीपूर तेल्हरा, नियर पोस्ट ऑफिस तालुका तेल्हरा जिल्हा अकोला, अकोला, तेलहारा, नरसिपुर

**अर्जदार :-** जी एन देशमुख,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Membership fees | 707.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.७०७/- मात्र (अक्षरी रुपये सात शे सात मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NARSIPUR TAALUKA TELHARA JILHA AKOLA | MALMATTA KRAMANK 548 S KHULI JAGA 830 FOOT VAR.C.C | EKUN SHETRA FAL 165X665 | JAGECHYA CHATURSIMA PURVES SHETI PACCHIMES- ROA | 5 | 500000.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ५०००००.००/- मात्र (अक्षरी रुपये पाच लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २२/०५/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३९३/२०२६ — प्रोसेस नं.३५५३/२०२६
चौ.ता. २७/०४/२०२६ — दिनांक : १३/०३/२०२६

**अर्जदार :** १. त्रिवेणी शंकर गुडदे २. भिमराव शंकर गुडदे दोघेही रा. किसान नगर, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शंकर सोनाजी गुडदे
**पत्ता :-** रा. शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंकर सोनाजी गुडदे यांचे दि. १३/०१/२०२६ रोजी शिवणी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ७६८/२०२६ — दिनांक १८/०३/२०२६
अर्ज क्रमांक :-४४/२०२६ कलम -२२ — नेमता तारिख - १६/०४/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री. संत गजानन महाराज भक्तीधाम संस्थान ट्रस्ट, सिरसो, ता.मुर्तिजापुर जि.अकोला. नोदणी क्रमांक. ई.१२६३ - बाबत

**अर्जदार :-** श्री.दिपक गुलाबराव मेहरे

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, धर्मादाय उप आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** काहि नाहि

**आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** अकोला मौजे सिरसो ता. मुर्तिजापुर जि.अकोला. येथील ग्रामपंचायत सिरसो शेत जमीन गट क.४०५/१ क्षे.०.२५ हे आर पुर्ण शेत जमिणी मधील पुर्व पश्चिम वाटणीची उत्तर भागातील पुर्वेकडून ०.०४ आर शेती जमिन सालीम झाडाझुडपासह चतुः सिमा येणे प्रमाणे :- पुर्वेस :- गट क्र. ४०६ पश्चिमेस :- यातील माझी उर्वरीत शेतजमिन. उत्तरेस :- मेन रोड. दक्षिणेस :- यातील माझी उर्वरीत शेतजमिन चतुसिमा किंमत अदाजे २ लक्ष रूपये. वीना मोबदला दानपत्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्कयानीशी आज दिनांक १८.०३.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ७७३/२०२६ — दिनांक १८/०३/२०२६
अर्ज क्रमांक :-४५/२०२६ कलम -२२ — नेमता तारिख - १६/०४/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री. संत गजानन महाराज भक्तीधाम संस्थान ट्रस्ट, सिरसो, ता.मुर्तिजापुर जि.अकोला. नोदणी क्रमांक. ई.१२६३ - बाबत

**अर्जदार :-** श्री.दिपक गुलाबराव मेहरे

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, धर्मादाय उप आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** काहि नाहि

**आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** मौजे सिरसो ता.मुर्तिजापुर जि.अकोला येथील ग्रामपंचायत सिरसो शेत जमीन गट क.४०५/१ क्षे.०.२५ हे आर पुर्ण शेत जमिणी मधील पुर्व पश्चिम वाटणीची उत्तर भागातील पुर्वेकडुन ०.०४ आर शेती जमिन सालीम झाडाझुडपासह चतुःसिमा येणे प्रमाणे :- पुर्वेस :- यातील माझी उर्वरीत शेतजमिन. पश्चिमेस :- गट क.४०५/१ उत्तरेस :- मेन रोड. दक्षिणेस :- यातील माझी उर्वरीत शेतजमिन किंमत अदाजे २ लक्ष रूपये वीना मोबदला दानपत्र .

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्कयानीशी आज दिनांक १८.०३.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १११**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### पहिल्या पिढीने माणसाच्या वेदनांना शब्द दिले-प्रा.डॉ. सिद्धार्थ भगत

**वर्धा-** शिक्षणाचे महत्त्व ओळखलेल्या पहिल्या पिढीने माणसाला केंद्रस्थानी ठेवत कवितेतून वेदना आणि विद्रोह व्यक्त केला. त्यामुळे 'माणसाने माणसाच्या कविता लिहिल्या' ही ओळख निर्माण झाली, असे प्रतिपादन प्रा. डॉ. सिद्धार्थ भगत यांनी केले. ते पथदर्शी साहित्य संघ, विदर्भ प्रांत आयोजित 'पथदर्शक साहित्य पुरस्कार २०२५' वितरण सोहळ्यात बोलत होते. बजाज वाचनालय येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांनी आंबेडकरी साहित्याच्या पुनर्रचनेवर भाष्य करत ज्यांना आवाज लाभला त्यांनी मूक न राहता सजगतेने बोलले पाहिजे, असा संदेश दिला.यावेळी मार्शल धम्मा कांबळे यांनी भारत राष्ट्र समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर उभे असल्याचे अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. अरविंद पाटील यांनी साहित्याचे अंतिम ध्येय मानवी कल्याण असावे, असे सांगितले. या वेळी 'दिवान-ए-सिराज' व 'कोंडमारा' या साहित्यकृतींना प्रत्येकी १० हजार रुपयांचा 'पथदर्शक साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास साहित्यिक व वाचकांची मोठी उपस्थिती होती.

### बैलगाडी चालकास मारहाण

**देवळी–**रस्त्यावरून जाण्याच्या क्षुल्लक कारणावरून वाद होऊन बैलगाडी चालकास मारहाण करण्यात आल्याची घटना देवळी तालुक्यातील भिडी येथे घडली. मुकुंद मधुकर गोडे हे बैलगाडीने शेताकडे जात असताना रस्त्यावर दुचाकी उभी करून मोबाईलवर बोलणाऱ्या व्यक्तीमुळे अडथळा निर्माण झाला. वाहन बाजूला करण्यास सांगितल्यावरून वाद निर्माण झाला. हा वाद इतका वाढला की कपिल व शरद गावंडे यांनी मिळून मुकुंद गोडे यांना मारहाण केली. या घटनेत गोडे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. प्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरकोळ कारणांवरून होणाऱ्या वादाचे गंभीर परिणाम होत असल्याने नागरिकांनी संयम बाळगावा, असे पोलिसांनी सांगितले आहे.

### विद्युत तारा काढल्याने वाद

**समुद्रपुर–**शेतातील विद्युत खांबावरील तारा काढल्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन मारहाण झाल्याची घटना गणेशपूर परिसरात घडली. या घटनेत नरेश मोतीराम मारवाडे हे जखमी झाले आहेत. वाद वाढत जाऊन आरोपींनी त्यांच्यावर हल्ला केला, अशी माहिती तक्रारीत नमूद आहे. जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी नरेश मारवाडे यांच्या तक्रारीवरून बादल पवार व सुरज पवार यांच्याविरुद्ध समुद्रपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पुढील तपास सुरू केला आहे. वाद टाळण्यासाठी संवाद साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### युद्ध थांबविण्यासाठी १८ गावांतील मुलांचे खुले पत्र

**रोहणा-** जगभर सुरू असलेल्या युद्धांच्या सावटाखाली बालपण होरपळत असल्याची तीव्र जाणीव व्यक्त करत वर्धा जिल्ह्यातील किशोर-किशोरींनी जागतिक शांततेसाठी हृदयस्पर्शी साद घातली आहे. स्वराज्य किशोर-किशोरी संघा'च्या पुढाकारातून जागतिक वन दिनाचे औचित्य साधून सर्व राष्ट्रप्रमुखांना खुले पत्र पाठवत युद्ध थांबवण्याची मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील १८ गावांतील मुलांचा मेळावा झाला. यावेळी युद्धग्रस्त देशांतील मुलांच्या वेदनांवर चर्चा करताना, आम्ही सुरक्षित आहोत म्हणून आमचे हक्क मागू शकतो, पण जिथे बॉम्ब पडत आहेत, तिथल्या मुलांचे शिक्षण आणि बालपण कोण जपणार असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.मुलांनी पत्रातून अनेक गंभीर मुद्दे मांडले आहेत. युद्धामुळे निर्माण होणारे अनाथपण, भूक व कुपोषण, तसेच पर्यावरणाची होणारी हानी याकडे त्यांनी लक्ष वेधले. तुमच्या एका सहीत युद्ध थांबवण्याची ताकद आहे, असा विश्वास व्यक्त करत सत्तेचा सकारात्मक वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले.६९ किशोर-किशोरींच्या फेडरेशनने हे पत्र तयार केले असून संमेलनात युद्धात मृत बालकांना श्रद्धांजली अर्पण केली जाणार आहे. शिक्षण, पोषण, प्रेम आणि सन्मान हे प्रत्येक बालकाचे हक्क आहेत, असा ठाम संदेश देत वर्ध्यातील या चिमुकल्यांनी जगाला शांततेचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

# कुलूपबंद कारखाना उपाशीपोटी कामगार!

## सी-डेटमध्ये सात दिवसांपासून लॉकआउट; संतप्त कामगारांचा इशारा 'न्याय नाही तर उपोषण'

**तळेगाव (श्या.पं.)/जनमाध्यम**
उद्योगाच्या धुराड्यांतून धूर निघणं थांबलं, आणि कामगारांच्या चुलीही विझण्याची वेळ आलीष्ठ तळेगाव येथील सी-डेट कंपनीत गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर लॉकआउटमुळे कामगारांमध्ये प्रचंड संताप उसळला आहे. अन्यायाच्या या काळ्या सावलीत, कामगारांनी काळ्या फिती लावून आपला निषेध नोंदवत व्यवस्थापनाविरोधात तीव्र आवाज उठवला.

प्रहार सी-डेट कामगार संघटनेच्या पत्रकार परिषदेत अध्यक्ष कुरवाडे यांनी भावनिक शब्दांत परिस्थिती मांडताना सांगितले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे झाली, पण आम्ही अजूनही गुलामीचे जीवन जगतो आहोत. कंपनीने कोणतेही ठोस कारण न देता मुख्य गेटला कुलूप ठोकून कामगारांना कामापासून दूर ठेवले, असा गंभीर आरोप त्यांनी केला.कामगारांच्या मते, काही महिला व पुरुषांनी आपल्या मागण्यांचे निवेदन माजी मंत्री बच्चू कडू यांच्या हस्ते दिल्यानंतर कंपनीने रागातून ही कारवाई केली.



एवढेच नव्हे, तर काही कामगारांना कामावरून कमी करण्यात आले असून महिलांकडून कंपनीचा गणवेश परत मागविण्यात आला आहे. अपूर्ण प्रशिक्षण असूनही महिलांना मशीनवर बसविण्याचा दबाव टाकला जात असल्याचेही धक्कादायक आरोप करण्यात आले.दरम्यान, कामगार आयुक्त कार्यालयात बैठक होऊनही तोडगा न निघाल्याने कामगारांची नाराजी आणखी तीव्र झाली आहे. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास अन्नत्याग उपोषण करू, आणि तरीही न्याय न मिळाल्यास कुटुंबासह आंदोलन उभारू, असा इशारा कुरवाडे यांनी दिला.या वेळी प्रहार संघटनेचे आर्वी विधानसभा अध्यक्ष जय बेलखडे उपस्थित होते. त्यांनी आमदार सुमित वानखेडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. वानखेडे यांनी कामगार मंत्र्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असले, तरी उपोषणाचा मार्ग टाळावा, असे आवाहनही त्यांनी कामगारांना केले.सध्या या प्रकरणामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी एकमुखी मागणी कामगारांकडून होत आहे. कारखान्याच्या बंद दरवाज्यांआड दडलेले प्रश्न आता रस्त्यावर येऊ लागले आआहे, आणि उत्तर मिळेपर्यंत हा संघर्ष थांबणार नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

## वृद्धावर चाकू हल्ला; दोन अज्ञातांवर गुन्हा

**पुलगाव** - दुचाकीवरून जात असलेल्या वृद्धावर दोन अज्ञातांनी पाठलाग करून चाकू हल्ला केल्याची धक्कादायक घटना पुलगावजवळील आपटी फाटा परिसरात घडली. या हल्ल्यात राजेंद्रप्रसाद कुरमवंशी (७१) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. हल्लेखोरांनी वृद्धाचा काही अंतरापर्यंत पाठलाग करून त्यांना गाठले आणि धारदार शस्त्राने वार केले, अशी माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पुलगाव पोलिस ठाण्यात दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास केला जात आहे. नागरिकांनी संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बाप-लेकास वीट मारून जखमी

**सेलू-**किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून बाप-लेकास वीट मारून जखमी करण्यात आल्याची घटना सेलू येथील देवकारे ले-आऊट परिसरात घडली. अंगावर पाणी का फेकले, अशी विचारणा केल्याने वाद चिघळला आणि त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. या घटनेत दोघांनाही दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले.

प्रकरणी हेमंत विठ्ठल कांबडे यांच्या तक्रारीवरून माला जीवन वाघमारे यांच्याविरुद्ध सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. किरकोळ कारणावरून वाढणारे वाद गंभीर रूप घेत असल्याने नागरिकांनी संयम राखावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# व्यस्त जीवनात आरोग्याचे भान जपा

## यशवंत महाविद्यालयात वैद्यकीय तपासणी शिबीर

**सेलू /जनमाध्यम**
धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी नियमित तपासणी आणि जागरूकता आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संदीप काळे यांनी केले. येथील यशवंत महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागातर्फे तसेच तालुका आरोग्य सेवा रुग्णालय, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय परिसरात वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संदीप काळे यांच्या अध्यक्षतेखाली व तालुका आरोग्य सेवा अधिकारी डॉ. राम वरठी यांच्या प्रमुख उपस्थितीत




झाले. उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. काळे यांनी सांगितले की, प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने नियमित आरोग्य तपासणी करून निरोगी जीवनशैली अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे. व्यस्त दिनचर्येत स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.शिबिरात तालुका आरोग्य रुग्णालयातील तज्ज्ञ डॉ. ऋतुजा घरघाटे, आरोग्य सेवक गोपीकिशन सोनटक्के, कांचन श्रीनाथे, शुभम निमसडे आदींच्या पथकाने उपस्थित कर्मचाऱ्यांची तपासणी केली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबीन, वजन आदी विविध चाचण्या करण्यात आल्या. तसेच गरजेनुसार औषधोपचार व वैद्यकीय सल्लाही देण्यात आला.या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. शिबिरामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. अर्चना फाळके (डाहाणे) यांनी तालुका आरोग्य विभागाचे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## महिलायोगाच्या नियुक्त्यांत राजकारणाला आळा घाला-डॉ.अंजली साळवे

**नागपूर/जनमाध्यम**
महिलायोगाच्या नियुक्त्यांमध्ये राजकीय पुनर्वसनाचा वाढता हस्तक्षेप थांबवून, केवळ कायदेशीर निकष पूर्ण करणाऱ्या महिलांचीच निवड करावी, अशी ठाम मागणी डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात सादर केलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, महिलायोगासारख्या संवेदनशील व जबाबदारीच्या संस्थांमध्ये नियुक्ती करताना संबंधित क्षेत्राचा अनुभव, सामाजिक जाण आणि कायद्याचे भान असणे अत्यावश्यक आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी यंत्रणेसोबत काम करण्याचा अनुभव नसलेल्या महिलांची केवळ राजकीय समतोल राखण्यासाठी नियुक्ती होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.अशा प्रकारच्या नियुक्त्यांमुळे महिलायोगाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत, साळवे यांनी महिलायोग कायद्यातील पात्रता व अटींचे काटेकोर पालन करण्याची गरज अधोरेखित केली. तसेच, संपूर्ण नियुक्ती प्रक्रिया पारदर्शक व न्याय्य पद्धतीने राबवून, पात्र आणि अनुभवी महिलांनाच संधी देण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या मागणीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देत योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## तिरळे कुणबी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा २८ मार्चला

**हिंगणघाट/जनमाध्यम**
तिरळे कुणबी समाजाच्या युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा आणि विवाहासाठी सुसंवादी वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने हिंगणघाट येथे वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तिरळे कुणबी समाज मंडळ, हिंगणघाट-समुद्रपूर विभागाच्या वतीने २८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अनुसया पॅलेस, शहलंगडी रोड येथे हा मेळावा पार पडणार आहे.या उपक्रमातून युवक-युवतींना एक व्यासपीठ उपलब्ध करून देत समाजातील विवाह प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सहभागी वधू-वरांनी आपले परिचयपत्र व दोन पासपोर्ट साइज फोटो सोबत आणावेत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आ. डॉ. वसंतराव बोंडे यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख अतिथी म्हणून राज्यमंत्री पंकज भोयर, खा.अमर काळे, आ.दादाराव केचे, आ.सुमित वानखेडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

समाजाच्या विविध मंडळांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कारंजा शहरात एकाच रात्री दोन घरफोडी

## चोरीची मालिका सुरूच, नागरिक दहशतीखाली

**कारंजा (घाडगे)/जनमाध्यम**
कारंजा शहरात २२ मार्च रोजी एका रात्री दोन घरफोडीच्या घटना घडल्या. याशिवाय आणखी दोन घरांमध्ये चोरीसाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. दोन दिवसांपूर्वीच मार्केटमधील एका किराणा दुकानाचे कुलूप चोरांनी फोडले होते. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शहरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शहरातील वार्ड नंबर १६ मधील रहिवासी शिक्षक सत्यनारायण आघाव हे गावात गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप फोडले. घरातील साहित्य अस्ताव्यस्त करून लहान मुलाची बचत केलेली अंदाजे सहा हजार रुपये नगद चोरल्या गेल्या.त्याच रात्रीच कॉलनीतील राहुल देशमुख यांचे घरही चोरांनी फोडले. घरातील साहित्य नासधूस करून अंदाजे आठ हजार रुपये नगद चोरले गेले.राजेश खवशी आणि राजेंद्र शिरपूरकर यांच्या घरांमध्येही चोरीसाठी प्रयत्न झाला. शिरपूरकर यांच्या पत्नीला रात्री झोपेत असताना बाहेरून दार ठोकण्याचा आवाज ऐकू आला. किचनच्या खिडकीतून पाहिल्यावर तिला दोन अज्ञात चोरटे दिसले एक घराच्या दाराजवळ, तर दुसरा रस्त्यावर उभा होता. चोरांनी काही सेकंदात पोबारा करून पळ काढला.नागरिकांचे म्हणणे आहे की चोरटे दिवसा बंद घरांची पाहणी (रेक्की) करतात आणि रात्री डल्ला मारतात. ज्येष्ठ नागरिक राहत असलेल्या घरांना आणि कामानिमित्त बाहेर गेलेल्या कुटुंबांच्या घरांना त्यांचे मुख्य लक्ष्य आहे.शहरात चोरीच्या घटनांची पुनरावृत्ती होत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन त्यांना पकडणे आणि नागरिकांसाठी भयमुक्त वातावरण निर्माण करणे ही पोलिसांची प्राथमिक जबाबदारी बनली आहे.



## तळेगावातील घरफोडीचा छडा

**तळेगाव(श्या.पं.)-** रामदरा परिसरातील घरफोडी प्रकरणाचा तळेगाव पोलिसांनी वेगाने तपास करत उलगडा केला असून नागपूरमधील एका सराईत आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र, या गुन्ह्यातील अन्य दोघे साथीदार अद्याप फरार असल्याने त्यांचा शोध सुरू आहे. रामदरा येथील रहिवासी मंगेश निळकंठ ठाकरे (४७) यांच्या घरात १८ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास घरफोडीची घटना घडली होती. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळासह परिसरातील तसेच विविध टोलनाक्यांवरील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. कारंजा (घाडगे), गौंडखरी आणि नांदगाव पेठ येथील टोलनाक्यांवर संशयित चारचाकी वाहनांच्या हालचाली आढळल्याने तपासाला दिशा मिळाली. गोपनीय माहितीदारांच्या मदतीने नागपूर येथील रेकॉर्डवरील आरोपी असलम अब्दुल शरीफ खान (२३, रा. हमीद नगर) याला ताब्यात घेतले. २१ मार्च रोजी चौकशीदरम्यान त्याने घरफोडीची कबुली दिली.या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक आशिष सिंह ठाकूर यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. या गुन्ह्यातील उर्वरित दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध पोलिसांची घेत आहेत.

# पवनारच्या शिवारात मृत्यूची सावली

## शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा/जनमाध्यम**
सकाळच्या धुक्यात हरवलेल्या पवनारच्या शिवारात एक हृदय पिळवटून टाकणारी घटना उघडकीस आली. साटोडा परिसरातील रोडलगतच्या शेतात ५० वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. सतीश किरडे (रा. पवनार) असे मृताचे नाव आहे.

पहाटेच्या सुमारास शेताकडे जाणाऱ्या काही नागरिकांच्या नजरेस झाडाला लटकलेला मृतदेह पडताच एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला.सतिश किरडे यांनी टोकाचे पाऊल का उचलले, यामागचे कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिस या घटनेचा सर्व अंगांनी तपास करीत आहेत.दरम्यान, गावात मात्र हळहळ व्यक्त होत असून, हसत-खेळत जगणारा माणूस असा अचानक निघून जाईल, यावर विश्वास बसत नाही, अशा भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहेत. पवनारच्या मातीत आजही त्या घटनेची वेदना दरवळत आहे.

# गहू पिकावर उंदरांचा कहर; शेतकऱ्यांच्या तोंडचा घास धोक्यात

## वन्यप्राण्यांसोबतच नव्या संकटाने वाढली डोकेदुखी

**साहूर/जनमाध्यम**
रब्बी हंगामातील गहू पीक जोमात असतानाच साहूर परिसरात उंदरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. उभ्या पिकात उंदरांनी बीड तयार करून गव्हाच्या उंब्या कुरतडण्यास सुरुवात केल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अनेक शेतकऱ्यांनी कीटकनाशके व उंदीरनाशक औषधांचा वापर करूनही हा उपद्रव थांबण्याचे नाव घेत नसल्याने संकट अधिकच गडद



झाले आहे. सध्या गहू पीक अंतिम टप्प्यात असताना अशा प्रकारची नासाडी होत असल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.याशिवाय रानडुक्कर, रोही हरणे व माकडांच्या कळपांकडूनही पिकांची तुडवण सुरूच आहे. दिवस-रात्र शेतात घुसून ही वन्यप्राणी उभ्या पिकांचा फडशा पाडत असल्याने शेती करावी तरी कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. भुईमूग पिकालाही या उपद्रवाचा फटका बसत आहे.पिकांचे संरक्षण करण्यासाठी बुजगावणे, प्लास्टिक तोरणे, साड्यांचे कुंपण, तसेच आवाज करणारे भोंगे यांसारखे उपाय करूनही फारसा फायदा होत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करतात.दरम्यान, वन विभागाने तातडीने उपाययोजना करून वन्यप्राणी व उंदरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ११७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# शिक्षकांवर ऑनलाईन कामाचा वाढता ताण

## 'मोबाईल माझा, डेटा माझा-शासनाचा त्यात वाटा नाही'

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शिक्षकांवर दिवसेंदिवस ऑनलाईन कामाचा ताण वाढत असून, यासाठी वैयक्तिक मोबाईलचा सक्तीने वापर करावा लागत असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने या संदर्भात शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आंदोलनाचा इशारा दिला आहे.वरीष्ट अधिकारी एसीत बसुन नवनविन उपक्रम राबवत आहे.याचा त्रास मुख्याध्यापक,शिक्षक यांना होत आहे.

निपुण चाचणीपासून सुरू झालेली मोबाईल वापराची सक्ती आता 'स्कॉफ' (SCAF) माहिती भरण्यापर्यंत वाढली असून, प्रत्येक शिक्षकाला स्वतःच्या मोबाईलमध्ये विविध ॲप डाउनलोड करून त्यावर काम करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेत गुगल ड्राईव्हवर फोटो अपलोड करणे, त्याच्या लिंक तयार करून ॲपमध्ये पेस्ट करणे, तसेच १२८ प्रकारच्या प्रश्नांची माहिती व संबंधित कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात अपलोड करणे अशी अनेक अतिरिक्त कामे शिक्षकांवर टाकण्यात आली आहेत.शिक्षकांनी व्यक्त केलेल्या नाराजीनुसार, वैयक्तिक मोबाईलमध्ये बँकिंग, कौटुंबिक माहिती व खाजगी डेटा साठवलेला असतो. अशा

### महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा इशारा




परिस्थितीत शासनाच्या विविध ॲप्सचा वापर करण्याची सक्ती ही गोपनीयतेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. तसेच, ऑनलाईन कामासाठी लागणारा डेटा खर्च, साधनसामुग्री व तांत्रिक सुविधा शासनाकडून उपलब्ध करून दिल्या जात नसल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली आहे.

याबाबत राज्य नेते उदय शिंदे राज्याध्यक्ष विजय कोंबे राज्य सरचिटणीस राजन कोरगांवकर,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, 'ऑनलाईन कामासाठी आवश्यक सुविधा व साधने उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शिक्षकांच्या वैयक्तिक मोबाईलवर सक्ती करणे अन्यायकारक असून, ही दादागिरी यापुढे सहन केली जाणार नाही.'

तसेच, शाळा स्तरावर उपलब्ध असलेले पुरावे प्रत्यक्ष तपासणीद्वारे पडताळता येऊ शकतात, असे असताना सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्यामागील उद्देश काय, असा सवालही संघटनेने उपस्थित केला आहे.शिक्षक समितीने शासनाकडे मागणी केली आहे की, ऑनलाईन कामासाठी स्वतंत्र यंत्रणा, अधिकृत साधने व इंटरनेट सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अन्यथा, या सक्तीविरोधात राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही राज्य शाखेकडून देण्यात आला असल्याचे राज्य प्रसिध्दीप्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले आहे.

# वडद येथे जल महोत्सव

## 'पाणी अडवा, पाणी जिरवा' उपक्रम उत्साहात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

'जल जीवन मिशन' अंतर्गत वडद (अंजनगाव बारी) परिसरात 'जल महोत्सव' निमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले. या कार्यक्रमात 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मुख्य संदेशावर भर देत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. कार्यक्रमात आदिवासी बांधवांनी सादर केलेल्या पारंपरिक नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. जल संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅलीत विद्यार्थी, महिला बचतगट, ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन घोषणाबाजी केली. गावातील जलस्रोत स्वच्छ ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पावसाच्या पाण्याची सोपी साठवणूक पद्धत आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपविभागीय अभियंता आर. जी.कांबळे, सरपंच शोभा खडसे,



ग्रामविकास सचिव विनोद इसळ, जगदीश अंबाडकर, ग्रामपंचायत सदस्य, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.या वेळी जल संरक्षक म्हणून योगदान देणाऱ्या नागरिकांना गौरवपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी पाणी पुरवठा अभियंता नकुल शेंडे, मीनल कारस्कर, हर्ष हागोने आणि ऋतुजा भाकरे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. जल जीवन मिशन कक्षातील सचिन बानस्कर यांच्यासह आरोग्यसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि बचत गटांनी गटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ग्रामपंचायत अधिकारी विनोद इसळ यांनी या सोहळ्याचे निटनेटके नियोजन केले. गावातील शिक्षक आणि ग्रामस्थांच्या एकजुटीने हा जल महोत्सव खऱ्या अर्थाने यशस्वी ठरला. कार्यक्रमात तज्ञांनी सांगितले की, 'पाणी हे अमूल्य संपत्ती असून प्रत्येकाने पाणी वाचवण्याचा संकल्प करणे अत्यावश्यक आहे. पावसाळ्यापूर्वी गावातील नाल्या, विहिरी, पाणवठे स्वच्छ करण्याचे आवाहनही करण्यात आले.

## संक्षिप्त



### जागतिक चिमणी दिवस साजरा

**कुऱ्हा-**जागतिक चिमणी दिनाच्या दिवशी चेतन संजय चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पशु पक्ष्यांसाठी दाना पाण्याची व्यवस्था केली, पक्ष्यांसाठी जनजागृती चे त्याचं हे ९ वे वर्ष आहे. चेतन व सहकार्याने गावातील विविध ठिकाणांहून जूने माती मटके गोळा करून गावातील विविध भागात म्हणजेच ज्या ठिकाणी पाणी नाही अशा ठिकाणी पशु पक्षांकरिता दाणा व पाण्याची व्यवस्था करून पशु पक्ष्यांची तहान भागवत आहे.या दाणा पाण्यावर विविध पशु पक्षी जसे चिमणी,कावळा, बुलबुल, खारू, गायी, वासरे, खंडोबा, असे अनेक पक्षी येते आणि तहान भूक मिटवते. गेल्या आठ वर्षापासून एकटाच हा विद्यार्थी हे कार्य करीत होता. यावर्षीपासून अनेकांचे सहकार्य त्याला मिळाले त्यामध्ये दीपक पोकळे, सागर माकोडे, हर्षल दारोकार, रंजन शेंडे, अजित मुरायते,मंगेश चौधरी, अक्षय चिरडे, शुभम बडे,मोहन ठोंबरे, सचिन निस्ताने, समीर मस्करे, नितीन चिरडे, इत्यादी सहकारी गावातील ठिक ठिकाणी पशु पक्षांकरिता दाणा पाण्याची व्यवस्था करताना दिसून येते आहे.

### श्रीराम नवमी महोत्सवाचे आयोजन

**अमरावती-** प्रभात कॉलनी, शिलांगण रोड येथील श्री सद्गुरु गजानन महाराज मंदिरात २६ मार्च रोजी 'श्रीराम नवमी महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या महोत्सवात दररोज सकाळी ५.३० ते ७ वाजेपर्यंत काकडा आरती होणार असून विविध महिला भजनी मंडळांच्या माध्यमातून दररोज दुपारी भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच १९ ते २५ मार्चदरम्यान दररोज सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत नागपूरच्या अनुपमा देशकर यांचे कीर्तन होणार आहे. महोत्सवाची सुरुवात गुढीपाडव्याच्या दिवशी कलश स्थापनेने झाली. सप्ताहात प्रभात कॉलनी व अमरावतीतील विविध महिला भजनी मंडळांचा सहभाग राहणार आहे.दि. २६ मार्च रोजी श्रीराम नवमी निमित्त सकाळी ७ ते ९ अभिषेक, स्तोत्रपठण व आरती होणार आहे. त्यानंतर सकाळी १० ते १२.३० या वेळेत श्रीराम जन्मोत्सव पाळणा व आरती कार्यक्रम पार पडणार असून, या वेळी अमरावतीचे कीर्तनकार श्री ऋग्वेद महाराज पांडे यांचे कीर्तन होईल. दुपारी १२.३० ते २.३० दरम्यान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ७.३० वाजता आरतीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.मंदिर समितीने सर्व भाविकांना सप्ताहभर चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात सक्रिय सहभाग घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.



# लोकशाही सक्षम करण्यासाठी ग्रामसभा प्रभावी होणे आवश्यक- डॉ.हर्षवर्धन देशमुख

**अमरावती/का.प्र.**

जर या देशाची लोकशाही सक्षम करायची असेल, तर ग्रामसभा सक्षम असणे अत्यंत आवश्यक आहे.जोपर्यंत गावातील प्रत्येक नागरिकाला ग्रामसभेचे महत्त्व उमजत नाही, तोपर्यंत खऱ्याअर्थाने ग्रामीण विकास साधला जाणार नाही, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी केले.याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरूजी, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.



विद्या शर्मा, जेष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना संस्थापक अध्यक्ष गजानन बोंडे, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना अध्यक्ष राजेंद्र कराळे व संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते.

कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी केली.ते पुढे म्हणाले, अधिकारांसोबत सरपंच व नागरिकांनी जबाबदारीची जाणीव सुद्धा ठेवली पाहीजे, त्यामुळे सरपंचांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे. गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार ग्रामविकास करणे ही प्रत्येक पदाधिकाऱ्याची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. सतिश तराळ म्हणाले, संत गाडगे बाबांनी समाजाला दिलेली दशसूत्री केवळ आध्यात्मिक उपदेश नसून तो ग्रामविकासाचा एक परिपूर्ण कृती आराखडा आहे.जोपर्यंत गावातील शेवटच्या माणसापर्यंत या दशसूत्रीचा लाभ पोहोचत नाही, तोपर्यंत ग्रामविकास अपूर्ण आहे.गाडगे बाबांनी हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा मंत्र दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महारांनी ग्रामगीतेतून ग्रामविकासाठी संकल्पना मांडली.आजच्या सरपंचांनी आणि युवकांनी केवळ सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता श्रमदानातून गावे स्वच्छ आणि सुंदर करावीत. विद्यापीठ जेव्हा अशा कार्यशाळा घेते, तेव्हा त्याचा उद्देश केवळ चर्चा करणे नसून, इथून जाणारा प्रत्येक प्रतिनिधी आपल्या गावात 'गाडगे बाबा व राष्ट्रसंतांचे विचार' प्रत्यक्ष राबवेल हा असावा.त्यांनी शिक्षण, व्यसनमुक्ती आणि आरोग्य या त्रिसूत्रीवर भर देऊन ग्रामविकासाचे मॉडेल उभे करण्याचे आवाहन केले. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमामध्ये संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभार अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी,तर गजानन बोंडे यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. संचालन डॉ. राजेश मिरगे यांनी केले. कार्यशाळेला विदर्भातील सरपंच तसेच विद्यापीठाचे अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. दुपारच्या सत्रात ग्रामपंचायतीमध्ये नियुक्त झालेल्या प्रशासकाची जबाबदारी व भूमिका यावर लिना तुरकर यांनी, तर शासकीय योजना राबवितांना येणाऱ्या अडचणी यावर प्रा. राजेंद्र कराळे यांनी माहिती दिली. याप्रसंगी याचिकाकर्ते अरविंद दळवी यांचा सत्कार व मार्गदर्शन तसेच ॲड. देवा पाच वे अनिल उर्फ अण्णा पाटील यांनी उपस्थितांचे निराकरण केले.

# ८९ हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ आरोग्य शिबीराचा लाभ

**अमरावती/का.प्र.**

सेवा, त्याग आणि समर्पणाच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (विश्व हिंदू परिषद/ भारतीय जनता युवा मोर्चा/बजेरंग दल) संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीर म्हाडा कॉलनीतील हनुमान मंदिराच्या जवळ यशस्वीरित्या झाले.

या शिबिरात परिसरातील ८९ हून अधिक रहिवाशांनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला. डॉ. प्रियंका भन्साळी (नेत्र तपासणी), डॉ. विशाल भन्साळी (बालरोगतज्ज्ञ) यांसारख्या तज्ज्ञ डॉक्टरांनी सल्ला दिला, तर डॉ.



पल्लवी कटाई (दंत तपासणी), डॉ. साक्षी चिंचुरकर, सुभाष चंद्र वास्निक आणि डॉ. रश्मी मोरखाडे यांनी सामान्य आरोग्य तपासणी आणि होमिओपॅथी सेवा पुरवल्या. व्हॉट्सॲपद्वारे मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले.याप्रसंगी जैन संत निलेशचंद्र मुनी महाराज आणि विश्व हिंदू परिषदेचे विजयजी शर्मा यांनी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाला शोभा वाढवली. सर्व पाहुण्यांनी या लोककल्याणकारी उपक्रमाचे कौतुक केले आणि समाजात आरोग्याविषयक जागरूकता वाढवण्याच्या महत्त्वावर भर दिला.चंद्रकुमार जाजोदिया (लप्पीभैया) आणि त्यांच्या टीमने कार्यक्रमाच्या आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, तर प्रकल्प अध्यक्ष म्हणून डॉ. साक्षी जिंतुरकर आणि प्रकल्प अध्यक्ष म्हणून राजन आदतिया यांनी शिबिर यशस्वीपणे पार पाडले.शेवटी, आयोजकांनी सर्व डॉक्टर, सहकारी आणि नागरिकांचे आभार मानले आणि भविष्यातही असे सेवाकार्य सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले.सूरज चेचारे, अनिकेत जोशी, उत्कर्ष लांडे, अभि म्हळे, रुद्रेश चेचारे, पुष्पलता चेचारे, डॉ. बधापूर, अनिल नंदनवन आणि अमित अढाऊ या सर्वांनी या कार्यक्रमाच्या यशात मोलाचे योगदान दिले.

## संत गाडगे महाराज महाविद्यालयात पदवी वितरण

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगाव येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश निचित यांच्या अध्यक्षतेखाली पदवीदान कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी डॉ. मनोज पिंगळे महात्मा ज्योतिबा फुले, भातकुली हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. यावेळी सर्व मान्यवर व विद्यार्थी यांनी उभे राहून गीत म्हटले. या पदवीदान कार्यक्रमाला महाविद्यालयातील सन २०२४-२०२५ मध्ये मानव विद्या शाखेतील विद्यार्थी व वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.



महाविद्यालयामधून एकून ८० विद्यार्थी पदवीसाठी प्राप्त होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# पाईपलाईन बिघाडामुळे पाणीपुरवठा विस्कळीत?

## ग्रामस्थांची चौकशीची मागणी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरातील मस्जिद अलीकडील वडरपूरा (वार्ड क्रं. २ व ४ ) येथे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पाणीटंचाईच्या तीव्र समस्येबाबत ग्रामस्थांनी ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे. असह्य झालेल्या पाणीस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये मोठा संताप निर्माण झाला आहे.

निवेदनानुसार, वडरपूरा वस्तीमध्ये सार्वजनिक नळांचे कनेक्शन पूर्वी नियमितपणे सुरू असले तरी सध्या अनेक नळ बंद आहेत. मुख्य पाण्याच्या टाकीतून होणारा पुरवठा अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने, दररोज पाण्याच्या एका वेळच्या सोडतीनंतरही पाणी घरापर्यंत पोहोचत नाही. नळांच्या तोंडाशी केवळ थेंबथेंब पाणी येते, काही घरांना तर बिलकूल पाणी मिळत नाही.पाण्याच्या कमतरतेमुळे महिलांना लांब अंतरावरून पाणी आणावे लागत असून,




विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांवरही परिणाम होत आहे. शेती व जनावरांसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची टंचाई तीव्र झाली आहे. दिवसेंदिवस समस्या वाढत असून, प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे रोजचे जीवन विस्कळीत झाले आहे, असे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.ग्रामस्थांच्या मते, सध्या वस्तीतील पाण्याच्या टाकीपर्यंत पुरेसे पाणी येत नाही. मोटारींची क्षमता कमी आहे की पाईपलाईनमध्ये बिघाड आहे, याची चौकशी होणे आवश्यक आहे. नियमित पाणी येत नसल्याने ग्रामस्थांना ३-४ दिवसांचा पाणीसाठा करण्यासाठीही अडचणी येत आहेत. 'टँकरची सुविधाही वेळेवर मिळत नसल्याने आम्ही पूर्णपणे पाण्याविना अडकलो आहोत,' अशी व्यथा त्यांनी व्यक्त केली.

## निधन

### दौलतराव धूर्वे

**कुऱ्हा-**मारडा (ता. तिवसा) येथील वयोवृद्ध जेष्ठ नागरिक तथा जिल्हा परिषद सेवानिवृत्त मुख्याध्यापक दौलतराव बकाराम धूर्वे (गुरूजी) यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने २३ मार्च २०२६ ला पहाटे ४ वा. निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुली, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. दौलतराव धुर्वे (गुरुजी) यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक गावकरी उपस्थित होते.यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.



### सचिन अजमिरे

**कुऱ्हा-**मारडा येथील तरूण युवा नागरिक सचिन बबनराव अजमिरे यांचे वयाच्या ४२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी,एक मुलगा, आई वडील, असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. सचिन अजमिरे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातवाईक, गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.



# पारंपारिक काढणीला प्राधान्य; चारा व रोजगार

## परंपरा जपत गव्हाची काढणी

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

भातकुली तालुक्यातील आष्टी परिसरातील शेतकरी विजय दहातोंडे यांनी आधुनिकतेसोबत परंपरेचा समतोल साधत गव्हाच्या काढणीचे एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे. त्यांनी १ एकर क्षेत्रामध्ये गव्हाची पेरणी केली होती. पीक काढणीच्या टप्प्यावर आल्यानंतर गव्हाच्या पेंड्या (पिंडी) बांधण्यासाठी लागणारे चिरे स्थानिक बाजारात उपलब्ध नसल्याने अडचण निर्माण झाली.

अशा परिस्थितीत त्यांनी हार न मानता मित्रांच्या मदतीने धामणगाव रेल्वे येथून चिरे उपलब्ध करून घेतले. तसेच अनुभवी मजूर चिंतामण झिंगळे



यांच्या मार्गदर्शनाखाली गव्हाच्या पेंड्या बांधण्याचे काम सुरळीत पार पडले. आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात हार्वेस्टरद्वारे गहू काढणी करणे सोयीचे असले, तरी त्यामुळे स्थानिक मजुरांना रोजगार मिळत नाही आणि जनावरांसाठी आवश्यक कुटारही कमी प्रमाणात उपलब्ध होते.

याची जाणीव ठेवत विजय दहातोंडे यांनी पारंपारिक पद्धतीने चिरे बांधून साध्या यंत्राच्या साहाय्याने गहू काढणी करण्याचा निर्णय घेतला.

या पद्धतीमुळे स्थानिक मजुरांना रोजगार मिळाला असून जनावरांसाठी आवश्यक चाऱ्याचीही उपलब्धता झाली आहे.

'परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल राखत शेती करणे गरजेचे आहे,' असे मत सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय दहातोंडे यांनी व्यक्त केले.

### आठवडी बाजारातील रस्ते झाले मोकळे

**बेलोरा-**चांदूरबाजार येथे दर रविवारी भरत असलेल्या आठवडी बाजारात यावेळी शिस्तबद्धता पाहायला मिळाली. यापूर्वी व्यापारी आपली दुकाने नियोजनाशिवाय कुठेही लावत असल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना व ग्राहकांना मोठा अडथळा निर्माण होत होता. मात्र, ठाणेदार सागर भामरे यांच्या पुढाकाराने पोलीस प्रशासन व नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी संयुक्त कारवाई करत बाजारात शिस्त लावली. या मोहिमेत पंकज वाट, अकलेश थोरात, उमेश सराटे तसेच नगरपरिषद चांदूरबाजारचे कर्मचारी सहभागी झाले होते. व्यापाऱ्यांना ठराविक लाईनमध्येच दुकाने लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे बाजारातील सर्व रस्ते मोकळे दिसू लागले आणि वाहनचालक तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना कोणताही त्रास झाला नाही. नवीन ठाणेदार, नगरपरिषद कर्मचारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# मेळघाटच्या नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणार- जिल्हाधिकारी

## बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी तगादा लावू नये

### २२ गावांच्या विजेच्या प्रश्न, केंद्रीय वन्यजीव मंडळाला प्रस्ताव

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटात रस्ते, पाणी, दळणवळण, आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. नागरिकांना या सोयी चांगल्या दर्जाच्या मिळण्यासाठी यंत्रणांचा समन्वय असणे आवश्यक आहे. येत्या काळात प्रत्येक क्षेत्राचा विचार करून मेळघाटच्या नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज मेळघाटातील विविध समस्यांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, मुख्य कार्यकारी



अधिकारी संजीता महापात्र, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

शासनाने दोन लाख रूपयांपर्यंतची कर्जमाफी केली आहे. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी तगादा लावू नये. यासाठी अग्रणी बँकेनी इतर बँकांसोबत संपर्क साधून सूचना द्याव्यात. मनरेगा अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी दहा गावांचे एकत्रितरित्या पाच वर्षांचे नियोजन करून कामे करण्यात ☞(पान २ वर)

# जुन्या वादातून संतोषी नगरात तरुणावर जीवघेणा हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीतील संतोषी नगर परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात मयूर किशोर सोळंके (वय २०, हनुमान मंदिर जवळ, खत्री कॉम्प्लेक्स) गंभीर जखमी झाला आहे. माहिती नुसार मयूर सोळंके हा आपल्या दोन मित्रांसोबत दुचाकीने जिमवर गेला होता. जिमवरून परत येत असताना संतोषी नगर गार्डनजवळ ३-४ अज्ञात युवकांनी त्यांच्या दुचाकीवर दगडफेक केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे घाबरून मयूर आणि त्याचे मित्र दुचाकी सोडून पळू लागले. दरम्यान,



हल्लेखोरांपैकी एका आरोपीने मयूरवर चाकूने अनेक वार करत त्याला रक्तबंबाळ केले. जखमी अवस्थेत मयूरला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी गाडगे नगर पोलीसांनी सुनील विष्णू राठोड, अनूपसह इतरांवर गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरू आहे. माहितीनुसार जखमी मयूर सोळंके तडीपार आहे. तडीपारी आदेशाचे उल्लंघन करून तो शहरात फिरत होता. अशात त्याच्यावर प्राणघातक ☞(पान २ वर)

# श्रीराम नवमी निमित्य निघणार भव्य शोभायात्रा

## समिती अध्यक्ष रोहित देशमुख, कार्याध्यक्ष चंद्रकुमार जाजोदिया

### विविध देखावे ठरणार आकर्षणाचे केंद्र

**अमरावती/प्रतिनिधीः-** विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने श्री रामनवमी निमित्य भव्य शोभायात्रा उद्या गुरुवार २६ मार्च रोजी बालाजी प्लॉट येथील सिताराम बाबा मंदिर प्रांगणातून सायंकाळी ६ वाजता काढण्यात येणार आहे.शोभायात्रा निघण्यापूर्वी पाच वाजता श्रीराम पूजन आणि आरती केली जाणार



आहे. पूजेचे मुख्य यजमान श्यामा व भगीरथ अहरवार, सरोज व केशव कुशवाह राहणार आहेत. विविध देखावे आकर्षणाचे केंद्र ठरणार असल्याची माहिती आज मंगळवार २४ मार्च रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की यावेळी जितेंद्रनाथ महाराज, स्वामी राजेश्वराचार्य, महंत मनमोहनदास, डॉ. संतोष नवलानी, सचिनदेव महाराज, श्यामसुंदर निचित, रामप्रिया माई, कवर राजेश साई, मोहन बाबा कारंजेकर मार्गदर्शन करणार आहे. बालाजी प्लॉट येथून निघणारी शोभायात्रा राजापेठ, राजकमल चौक, श्याम चौक होत गांधी चौक मध्ये जय फोटो स्टुडिओ जवळ यात्रेचे समापन होणार आहे. उत्कृष्ट देखाव्याला ☞(पान २ वर)

# नगरसेवक सय्यद राशिद अली यांना ठार मारण्याची धमकी

### एमआयएमची पोलीस आयुक्तालयावर धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक प्रभाग क्र. १५ छाया नगर - पठाणपुरा येथील नगरसेवक सय्यद राशिद अली यांना जीवाने ठार मारण्याचे धमकी दिल्याची घटना आज मंगळवार २४ मार्च रोजी समोर आली आहे. या प्रकरणात संतापलेल्या एमआयएम नगरसेवकांनी गटनेता शेख हमीद शेख वाहेद यांच्या नेतृत्वात पोलीस आयुक्तालयावर धडक दिली आणि दोषी आरोपीवर



कारवाई करण्यासह नगरसेवक राशीद अली यांना सुरक्षा देण्याची मागणी केली. पोलीस आयुक्त राकेश ओला आणि उपायुक्त गणेश शिंदे यांना सांगण्यात आले की, नगरसेवक सय्यद राशिद अली प्रभागातील जनतेचे काम करीत आहे. काही समाजकंटक द्वेष भावनेतून☞(पान २ वर)

# सुपर हॉस्पिटलमधील एमआरआय मशीन तत्काळ करा सुरू



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी आलेली एमआरआय मशीन स्थालांतरित करून सुपर स्पेशालिटी रुग्णालयमध्ये लावण्यात आली. गेल्या आठ महिन्या पासून ही मशीन बंद पडलेली आहे. यामुळे रुग्णांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. ही मशीन

### प्रहार जनशक्ती पक्षाची मागणी

तात्काळ सुरू करण्यात यावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने जिल्हा शलचिकित्सक यांना आज मंगळवार २४ मार्च रोजी दिलेल्या निवेदनातून प्रहारने केली ☞(पान २ वर)

# परतवाडा शहरातील गुजरी बाजारात व्यावसायीकावर हल्ला

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील अतिव्यस्त गुजरी बाजार परिसरात २४ मार्च रोजी दुपारी सुमारे ३ वाजता एका भंगार विक्रेत्याने जुन्या वादविवादावरून दोन व्यापाऱ्यांवर लोखंडी रॉडने हल्ला करत दुकानाची तोडफोड केल्याची घटना घडली. या घटनेमुळे शहरातील व्यापारी वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज बुक सेंटरचे संचालक अरुण खंडेलवाल व राज खंडेलवाल यांच्यावर रियाज बेग नुरु बेग (वय ४०) याने



अचानक रॉडने हल्ला केला.

या हल्ल्यात दोघेही जखमी झाले असून त्यांच्यावर☞(पान २ वर)

# अवैधरित्या गॅस रिफिलिंग करणारे दोघे ताब्यात

### गुन्हे शाखेची लालखडीमध्ये धाड

**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैधरित्या एलपीजी गॅस रिफिलिंग करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्या कडून २ लाख ५ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शेख फरीद शेख नजीर (वय ४६,रा.भिवंडी वॉटर सप्लाय जवळ लालखडी) व मोहम्मद सलमान शेख हमीद (२४, रा.लालखडी ) असे अटक आरोपींचे नाव



आहे. माहितीनुसार गुन्हे शाखेचे पथक नागपूरी गेट हद्दीत☞(पान २ वर)

# ग्रामीण भागात अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

## -एकाच दिवशी चार ठिकाणी धडक मोहीम, -लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैधारित्या रेतीची चोरी थांबवण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी २३ मार्च २०२६ रोजी मोठी कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गस्त घालत गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. चार ठिकाणी धाडसत्र राबवून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करून, आरोपींना ताब्यात घेतले.

या सर्व प्रकरणांत भारतीय न्याय संहिता, मोटार वाहन अधिनियम आणि पर्यावरण



संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

**ब्राम्हणवाडा थडी येथे हायवा जप्त-** ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हिरादेही-चिचकुंभ मार्गावर नाकाबंदी करून टाटा कंपनीचा हायवा (एमएच २७ डीटी ७७९२) पकडण्यात आला. तपासणीदरम्यान ७ ब्रास रेती (किंमत सुमारे ७० हजार रुपये) आढळली. चालक पवन नांदणे व क्लीनर भगवान गिरी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून वाहन मालक मोहीत लांडे फरार आहे. या कारवाईत एकूण २५.७० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.☞(पान २ वर)

# शिवटेकडी विकासासाठी महापालिकेचे मोठे पाऊल

## नागरिकांना आधुनिक सुविधा, पर्यटनाला चालना

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या शिवटेकडी (मालटेकडी) व्यवस्थापन समितीची विस्तृत आणि महत्त्वपूर्ण सभा महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शहराच्या मध्यवर्ती भागात वसलेले शिवटेकडी हे निसर्गसंपन्न आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असल्यामुळे त्याच्या सर्वांगीण विकासासाठी या बैठकीत सखोल चर्चा करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.



शिवटेकडी हे अमरावतीकरांसाठी केवळ एक पर्यटन स्थळ नसून, ते ऐतिहासिक व सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक मानले जाते. येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पूर्णाकृती पुतळा नागरिकांमध्ये प्रेरणा जागवतो. याच परिसरात साकारत असलेली 'शिवसृष्टी' ही संकल्पना शहराच्या सांस्कृतिक वारशाला अधोरेखित करणारी ठरणार असून, या प्रकल्पाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाच्या नियोजन, अंमलबजावणी आणि गुणवत्तेवर विशेष भर देण्याची गरज सभेत अधोरेखित करण्यात आली.

बैठकीत शिवटेकडी परिसराच्या सौंदर्यीकरणात अधिक भर घालण्याबाबत विविध प्रस्ताव मांडण्यात ☞(पान २ वर)

# महानगरपालिकेत २०२६-२०२७ अर्थसंकल्पावर स्थायी समितीची बैठक

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासनाने सादर केलेल्या सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी मंगळवार, दिनांक २४ मार्च २०२६ रोजी स्व. सुदामकाका देशमुख सभागृह येथे स्थायी समितीची सविस्तर बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर होते.

बैठकीदरम्यान आगामी आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित



बजेटमधील विविध तरतुदींवर सखोल चर्चा करण्यात आली. प्रारंभी सभापती अविनाश मार्डीकर यांनी बजेटमधील प्रत्येक विषयाचा बारकाईने आढावा घेऊन नागरिकांच्या अपेक्षांनुसार आणि शहराच्या गरजांनुसार अर्थसंकल्प ☞(पान २ वर)

# जनता दरबार ठरतोय प्रभावी व्यासपीठ

## १९१ तक्रारी; १६६ निकाली, २५ प्रलंबित

अमरावती/प्रतिनिधीः-

शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या जनता दरबार उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत एकूण १९१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १६६ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून उर्वरित २५ तक्रारींची तपासणी सुरू आहे. या तक्रारींमध्ये फसवणूक, सायबर गुन्हे, महिला छळ यांसारख्या गंभीर प्रकारांचा समावेश असल्याचे समोर आले आहे.

शहर पोलीस आयुक्तालयात ७ फेब्रुवारीपासून जनता दरबाराची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला दर शनिवारी आयोजित होणारा हा उपक्रम अलीकडे बदल करून दर मंगळवारी घेण्यात येत आहे. मंगळवार, २४ मार्च रोजी झालेल्या जनता दरबारात सुमारे ३५ तक्रारी नोंदवण्यात आल्या, ज्यावर तातडीने☞(पान २ वर)

# धोकादायक केबल्स हटविण्याची महापालिकेची मोहीम सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील वाढत्या नागरीकरणामुळे इंटरनेट सेवा, केबल नेटवर्क व इतर तांत्रिक सुविधांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. मात्र, अनेक ठिकाणी खराब, नादुरुस्त तसेच लोंबकळणाऱ्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेतर्फे उपयोगात नसलेल्या व धोकादायक केबल्स हटविण्याची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शहरातील केबल व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीनंतर संबंधित केबल ऑपरेटर, इंटरनेट सेवा पुरवठादार व संस्थांना☞(पान २ वर)

